इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक –१९१ ■ वर्ष – ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

महासत्ता

कोल्हापूर – सांगली – सातारा – बेळगांव

शुक्रवार,ता.१३ नोव्हेंबर २०२६ | कार्तिक शु.४ | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२+४=१६ | किंमत ₹ ५.००

रशिया–युक्रेन युध्द संपवण्यासाठी अमेरिकेची धडपड

अबूधाबी,ता.१२–

रशिया आणि युक्रेन यांच्यात गेल्या जवळपास पाच वर्षांपासून सुरू असलेले भीषण युद्ध थांबवण्यासाठी पुन्हा एकदा प्रयत्नांना वेग आला आहे. संयुक्त अरब अमिरातीची राजधानी अबूधाबी येथे दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांमध्ये सलग दोन दिवस चर्चा झाली.

या चर्चेनंतर लगेचच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे दोन विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि जेरेड कुशनर हे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या भेटीसाठी क्रेमलिनमध्ये दाखल झाले. चर्चेच्या माध्यमातून युद्ध संपवण्याच्या दिशेने नवी पहल करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे. यासाठी अमेरिकेचे विशेष दूत प्रथम पुतिन आणि त्यानंतर युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांची भेट घेणार आहेत. अबू धाबी येथे झालेली चर्चा ही तब्बल नऊ महिन्यांनंतर रशिया आणि युक्रेनच्या अधिकाऱ्यांमध्ये झालेली पहिली थेट चर्चा होती.

भाजप,संघाचे सोनियांवरील आरोप निराधार– प्रियांका


■ नवी दिल्ली,ता.१२–

काँग्रेसच्या खासदार



प्रियांका गांधी–वाड्रा यांनी गुरुवारी त्यांची आई आणि काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांची जोरदार पाठराखण केली.

सोनिया गांधी यांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'बिलिविंग' या आत्मचरित्रावरून भाजपने केलेल्या टीकेला (पान २ वर)



दार्जिलिंग,सिलिगुडीसह उत्तर बंगालमध्ये भूकंपाचे धक्के

■ कोलकाता,ता.१२–

दार्जिलिंग आणि सिलिगुडीसह उत्तर बंगालच्या मोठ्या भागाला गुरुवारी पहाटे भूकंपाचा धक्का बसला.

राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या माहितीनुसार, पहाटे ४:३० च्या सुमारास भूकंप झाला आणि त्याचे धक्के दार्जिलिंग (पान २ वर)



विमान अपहरण धमकी प्रकरणी एकास अटक

■ कोलकाता,ता.१२–

कोलकाता ते मुंबई एअर इंडियाच्या विमान अपहरणाच्या धमकीप्रकरणी एका प्रवाशाला ताब्यात घेऊन विमानतळ पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळाने जारी केलेल्या एका प्रसिध्दीपत्रकातून याला दुजोरा देण्यात आला. (पान २ वर)

पंतप्रधान आज कर्नाटक दौऱ्यावर

■ नवी दिल्ली,ता.१२–

पंतप्रधान मोदी येत्या १३ आणि १४ नोव्हेंबर रोजी कर्नाटक आणि गुजरात राज्यांच्या दौऱ्यावर जाणार आहेत.



१३ नोव्हेंबर रोजी सकाळी पावणे अकरा वाजता पंतप्रधान प्रशांती कुटीरमध्ये सुवर्ण महोत्सवी (पान २ वर)

सोने प्रति तोळा	चांदी प्रति किलो
१३८८०० रु.	१५५००० रु.

अंडी ७१० रुपये शेकडा

हास्यतुषार



कबूतर गायब करून स्वत:ला मोठा जादूगर समजतो... याला काय माहित आपण तर मोठ मोठे पूल, रस्ते, विहिरी गायब केल्या आहेत!

राष्ट्रवादीत फूट पडणार नाही

सुनेत्रा पवारांच्या नेतृत्वाखाली पक्ष एकसंघ–ना.मुश्रीफ

■ कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)–

राष्ट्रवादी काँग्रेसचे २० ते २२ आमदार फुटणार असल्याच्या चर्चा निराधार आहेत. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे सर्व आमदार एकसंघ असून एकही आमदार पक्ष सोडून जाणार नाही. तसेच पक्षात स्वतंत्र गट निर्माण होण्याची शक्यताही नाही, असा ठाम विश्वास वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी गुरुवारी व्यक्त केला. कोल्हापूरात ते प्रसारमाध्यमांशी ते बोलत होते.



राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत घडामोडींवर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाष्य करण्याची गरज नाही. त्यांनी आपल्या पक्षातील खासदार आणि आमदारांच्या संख्येबाबत बोलावे. आमच्या पक्षात नाक खुपसू नये, असा टोला मुश्रीफ यांनी लगावला.

शिवसेना नेते संजय शिरसाट यांनी राष्ट्रवादीत तिसरा गट निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केल्याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली.

राऊत,शिरसाट यांना प्रत्युत्तर; एकनाथ शिंदेंनी आपल्या नेत्यांना समज द्यावी

महायुतीतील तिन्ही पक्षांच्या समन्वय समितीच्या बैठकीत एकमेकांच्या पक्षांवर सार्वजनिक टीका करायची नाही, असे ठरले आहे. काही तक्रारी असल्यास त्या वरिष्ठ नेत्यांच्या कानावर घालाव्यात. मात्र, काही नेते सातत्याने बिनबुडाची वक्तव्ये करीत आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या नेत्यांना कडक शब्दांत समज द्यावी आणि महायुतीत वाद निर्माण होणार नाहीत (पान २ वर)

रागाच्या भरात 'ते' वक्तव्य-मुश्रीफ

गोकुळच्या निवडणुकीमुळे सतेज पाटील यांच्याशी दुरावा निर्माण झाल्याच्या प्रश्नावर मुश्रीफ म्हणाले,अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली आम्ही महायुतीत सहभागी झालो, त्याचवेळी आमचे राजकीय मार्ग वेगळे झाले होते.राजकारणात कोणी कोणाचा कायमचा शत्रू नसतो. आम्ही दोघेही कोल्हापुरातच राहणार आहोत. आम्ही एकमेकांचे जानी दुश्मन नाही. समोरासमोर आल्यास नमस्कार-चमत्कार होणारच, असे त्यांनी सांगितले.

गोकुळ दूध संघाच्या अध्यक्ष निवडीवेळी रागाच्या भरात माझ्या तोंडून ते वक्तव्य गेले. वास्तविक, ते वक्तव्य झाले नसते तर बरे झाले असते, अशा शब्दांत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिलगिरी व्यक्त केली. गोकुळच्या निवडणुकीनंतर संघर्ष आता थांबवून संघाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

गोकुळच्या अध्यक्ष निवडीवेळी आपण आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलेल्या वक्तव्यांवर होत (पान २ वर)

गोकुळच्या कारभाराची सूत्रे नव्या संचालक मंडळाकडे

अध्यक्ष राजेश पाटील उद्या पदभार स्वीकारणार



■ कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)–

अध्यक्षपदाची निवडणूक पार पडल्यानंतर आता गोकुळमधील सत्तांतराची प्रक्रिया पूर्णत्वाकडे जात आहे. नूतन अध्यक्ष राजेश पाटील शनिवारी (ता. १४) अधिकृतपणे पदभार स्वीकारणार असून, त्याच दिवशी त्यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची पहिली बैठक होणार आहे. त्यामुळे गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेल्या प्रशासकीय कारभाराची जागा आता लोकनियुक्त संचालक मंडळ घेणार आहे.

गोकुळच्या मागील संचालक मंडळाची मुदत संपल्यानंतर संघाचा कारभार प्रशासकांच्या माध्यमातून सुरू होता. या काळात संचालक मंडळाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. निवडणुकीनंतर नव्या संचालक मंडळाची स्थापना झाली असली, तरी अध्यक्षपदाच्या निवडीवरून निर्माण झालेल्या राजकीय संघर्षामुळे प्रत्यक्ष कामकाजाची सुरुवात लांबली होती. अखेर १० नोव्हेंबरला झालेल्या (पान २ वर)

दोन्ही शिवसेना एकत्र आल्यास आनंद होईल–खासदार ओमराजे

राजकारणात कधीही काही घडू शकते – गोगावले

■ मुंबई,ता.१२ –

एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची चर्चा सुरू असतानाच आता दोन्ही शिवसेना पक्षाच्या विलिनीकरणाचीही चर्चा पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वी दोन्ही शिवसेना एकत्र आल्यास आनंद होईल, असे धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी म्हटले होते. आता, पुन्हा एकदा ओमराजेंनी दोन्ही शिवसेना एकत्र आल्यास मलाच सर्वाधिक आनंद होईल असे म्हटले आहे.



दुसरीकडे मंत्री भरत गोगावले यांनीही आत्ताचं भवितव्य आणि भविष्य जे काही दिसतंय त्यावरून आम्हाला असे काही वाटत नाही. मात्र, राजकारणात कधीही काही घडू शकते, सकाळचा संध्याकाळी आणि संध्याकाळचा सकाळी कुठे. त्यामुळे राजकारणात काय घडेल सांगू शकत नाही.

खासदार ओमराजे निंबाळकर यांनी पुढे म्हटले की, दोन्ही शिवसेना एकत्र आल्या तर माझ्यापेक्षा जास्त आनंदी माणूस दुसरा कोणीही नसेल. मात्र हा सर्व वरिष्ठ नेतृत्वाचा निर्णय आहे, माझ्यासारखा सामान्य माणूस फक्त इच्छा व्यक्त करू शकतो, भावना मांडू शकतो. मात्र याबाबत सर्वोतपरी निर्णय वरिष्ठच घेऊ शकतात. माझी भावना मी आधीच मांडली आहे. दोन्ही शिवसेना जर एकत्र आल्यास माझ्याएवढा (पान २ वर)

नगरसेवक योगेश पाटलांचा जातीचा दाखला रद्द

■ इचलकरंजी,ता.१२–



इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ३–ब मधून इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) या आरक्षित जागेवरून निवडणूक लढवून विजयी झालेले भाजपा नगरसेवक योगेश चांगदेव पाटील यांचा जातीचा दाखला कोल्हापूर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने रद्द ठरविला आहे.

या निर्णयामुळे योगेश पाटील यांच्या नगरसेवकपदाच्या भवितव्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार गटाचे उमेदवार शिवाजी उत्तम शिंदे यांनी तक्रार केली होती.

इचलकरंजी महानगरपालिकेच्या पहिल्या निवडणुकीसाठी सादर केलेल्या जात प्रमाणपत्राच्या वैधतेबाबत शिवाजी शिंदे यांनी आक्षेप घेत कोल्हापूर जिल्हा जात पडताळणी समितीकडे तक्रार दाखल केली होती.

योगेश पाटील यांनी जात प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सादर केलेली कागदपत्रे दिशाभूल करणारी असून, त्यामध्ये विसंगती असल्याचा मुद्दा तक्रारदार शिवाजी शिंदे यांनी पुराव्यांसह समितीसमोर मांडला होता.

जिल्हा जात पडताळणी समितीने प्रकरणातील कागदपत्रे व पुराव्यांची तपासणी करून योगेश चांगदेव पाटील यांचे जात प्रमाणपत्र रद्द करण्याचा निर्णय दिला आहे. या

पद धोक्यात; शिवाजी शिंदे यांची तक्रार

निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे योगेश पाटील विजयी झाले होते. पाटील यांनी निवडणुकीसाठी सादर केलेल्या जात प्रमाणपत्राच्या वैधतेबाबत शिवाजी शिंदे यांनी आक्षेप घेत कोल्हापूर जिल्हा जात पडताळणी समितीकडे तक्रार दाखल केली होती.

योगेश पाटील यांनी जात प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सादर केलेली कागदपत्रे दिशाभूल करणारी असून, त्यामध्ये विसंगती निर्णयामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून योगेश पाटील यांच्या नगरसेवकपदावर गदा येण्याची शक्यता आहे. जात प्रमाणपत्र रद्द झाल्याने संबंधित निवडणूक कायद्यानुसार त्यांच्या नगरसेवकपदा बाबत पुढील कायदेशीर कार्यवाही होण्याची शक्यता आहे. तक्रारदार शिवाजी शिंदे यांच्यातर्फे ॲड.जी.आर. कागवाडे व ॲड. दीपक सुतार यांनी कायदेशीर बाजू मांडली.

स्वच्छ सर्वेक्षणात विटा नगरपरिषद देशात प्रथम

राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनात गौरव

■ विटा,ता.१२(प्रतिनिधी)–

स्वच्छ सर्वेक्षण २०२५–२६ मध्ये २५ ते ५० हजार लोकसंख्या गटात स्वच्छतेच्या बाबतीत देशात प्रथम क्रमांक पटकावून विटा शहराने राष्ट्रीय स्तरावर आपला डंका वाजविला आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल नवी दिल्ली येथील राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विटा शहराचा सन्मान करण्यात आला.



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सन्मान स्वीकारताना नगराध्यक्ष काजल म्हेत्रे, उपनगराध्यक्ष अमोल बाबर, सभापती भालचंद्र कांबळे, मुख्याधिकारी विक्रमसिंह पाटील.

नगराध्यक्षा सौ. काजल म्हेत्रे, उपनगराध्यक्ष अमोल बाबर, आरोग्य सभापती भालचंद्र कांबळे, मुख्याधिकारी विक्रमसिंह पाटील यांनी हा सन्मान स्विकारला. देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदावरील व्यक्तींच्या हस्ते झालेला हा गौरव विटा शहरासह संपूर्ण सांगली जिल्ह्याच्या अभिमानात भर घालणारा ठरला आहे.

विटा नगरपरिषदेने स्वच्छतेला केवळ दैनंदिन काम न मानता शहराच्या सर्वांगीण विकासाचा आणि नागरिकांच्या आरोग्याचा केंद्रबिंदू बनविले. स्वच्छतेच्या प्रत्येक घटकाचे सूक्ष्म नियोजन, प्रत्यक्ष अंमलबजावणी, नियमित देखरेख आणि नागरिकांचा सहभाग या चतुःसूत्रीवर आधारित कामकाजामुळे विटा (पान २ वर)

सोलापूर विमानतळावर शिकाऊ विमान धावपट्टीवरून घसरले

■ सोलापूर,ता.१२–

सोलापूर विमानतळावर गुरुवारी दुपारी उड्डाणाचा सराव करत असताना एक शिकाऊ विमान धावपट्टीवरून घसरून बाजूला गेले.

या घटनेमुळे विमानतळ परिसरात एकच खळबळ उडाली. सुदैवाने, विमानाचे नियंत्रण करणाऱ्या महिला प्रशिक्षणार्थी वैमानिकाला कोणतीही गंभीर दुखापत झाली नसून त्या सुखरूप आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, नियमित प्रशिक्षणाचा भाग म्हणून महिला (पान २ वर)

सांगली जिल्हा बँक अध्यक्ष निवड १८ नोव्हेंबरला



निवडणूक अधिकाऱ्यांकडून सभेची नोटीस

■ सांगली,ता.१२(प्रतिनिधी)

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाच्या निवडी दि. १८ नोव्हेंबर रोजी होणार आहेत.

याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सुनिल चव्हाण यांनी संचालक मंडळाच्या सभेसाठी गुरुवारी नोटीस काढली. अध्यक्षपदासाठी काँग्रेसचे महेंद्र लाड, आ. विश्वजीत कदम आणि शरद पवार राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष देवराज पाटील यांची नावे शर्यतीत आहेत. तर उपाध्यक्षपद शिवसेना अथवा शरद पवार राष्ट्रवादीला मिळण्याची शक्यता आहे. सेनेकडून तानाजी पाटील तर (पान २ वर)

चंद्रशेखर-ओवेसी यांची आघाडी

●चंद्रशेखर आझाद मुख्यमंत्रीपदाचा चेहरा घोषित ●उत्तर प्रदेशात ४० टक्के दलित–मुस्लिम मते



■ लखनौ,ता.१२–

उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नव्या राजकीय समीकरणाची घोषणा झाली आहे. असदुद्दीन ओवेसी यांच्या नेतृत्वाखालील ऑल इंडिया मजलिस–ए–इत्तेहादुल मुस्लिमीन (एआयएमआयएम) आणि चंद्रशेखर आझाद यांच्या आझाद समाज पक्षाने (एएसपी) एकत्र येत निवडणूक लढवण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

उत्तर प्रदेशमध्ये मुस्लिम लोकसंख्या १९ टक्के आणि दलित लोकसंख्या २१ टक्के आहे. आघाडीचे लक्ष या ४० टक्के लोकसंख्येच्या मतांवर आहे. या आघाडीचा थेट परिणाम समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्षाच्या मतांवर होऊ शकतो.

या युतीमुळे उत्तर प्रदेशातील राजकीय वातावरणात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. दोन्ही पक्षांनी 'सामाजिक परिवर्तन मोर्चा' स्थापन करण्याची घोषणा केली असून, आगामी विधानसभा निवडणुकीत सर्व ४०३ जागांवर उमेदवार उतरवण्याची भूमिका घेतली आहे. या नव्या आघाडीत चंद्रशेखर आझाद हे मुख्यमंत्रीपदाचे प्रमुख चेहरे असतील, असे असदुद्दीन ओवेसी यांनी स्पष्ट केले आहे. असदुद्दीन ओवेसी यांनी या आघाडीबाबत सांगितले की, उत्तर प्रदेशात भाजपला (पान २ वर)

आक्रमण,बचाव दोन्ही आघाड्यांवर सज्ज रहावे

हवाई दलाच्या कमांडर्स परिषदेत राजनाथ सिंह यांचे वक्तव्य

■ नवी दिल्ली,ता.१२–

आधुनिक युध्दाचे बदलते स्वरूप आणि वेगाने विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानामुळे निर्माण होणाऱ्या पारंपरिक तसेच नव्या धोक्यांचा सामना करण्यासाठी संरक्षण दलांनी आक्रमण आणि बचाव या दोन्ही आघाड्यांवर सज्ज राहावे. शत्रूला अनपेक्षित धक्का देण्याची क्षमता विकसित करण्यावरोबरच ती कायम टिकवून ठेवणे आवश्यक आहे, असे आवाहन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केले.

नवी दिल्ली येथे आयोजित हवाई दलाच्या कमांडर्स परिषदेत बोलत होते. गुगघर आणि टेहळणी यंत्रणा अधिक सक्षम करणे, विविध यंत्रणांमध्ये समन्वय वाढविणे आणि संभाव्य धोके निर्माण होण्यापूर्वीच त्यांचा अंदाज घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.



आपल्या संरक्षण दलांनी अशा क्षमता आणि कार्यपध्दती विकसित केल्या पाहिजेत की शत्रूला विचार करण्याची किंवा सावरण्याची संधी मिळणार नाही, त्याचवेळी शत्रूच्या अनपेक्षित हालचालींमुळे आपणही बेसावध राहता कामा नये, असे त्यांनी सांगितले.

आजचे युध्द केवळ पारंपरिक रणांगणापुरते मर्यादित राहिलेले नाही.क्षेपणास्त्रे, ड्रोन आणि अत्याधुनिक (पान २ वर)

पारंपरिक युध्द पध्दती बरोबरच इलेक्ट्रॉनिक माध्यमांचाही वापर करून शत्रूला अनपेक्षित धक्का देता येतो. यासाठी गुगचर आणि टेहळणी यंत्रणा अधिक मजबूत करणे गरजेचे आहे. आपले जवान कोणत्याही नव्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी सतर्क, तत्पर आणि सज्ज असले पाहिजेत, असे संरक्षणमंत्री म्हणाले.

महासत्ता

शुक्रवार,ता.१३ नोव्हेंबर २०२६

(पान १ वरून)

सोनियांवरील आरोप निराधार

प्रत्यूत देताना त्यांनी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर खोटा प्रचार केल्याचा आरोप केला. प्रियांका म्हणाल्या की, सोनिया गांधी यांच्याबद्दल भाजप आणि संघाने आयुष्यभर खोटा प्रचार केला आहे. भारतात आपल्या आईने आयुष्याचा मोठा काळ व्यतित केला.या काळात भाजप, संघ आणि अन्य लोकांनी त्यांच्याबद्दल अनेक निराधार आरोप केले. काल्पनिक गोष्टी रचून त्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न झाला. मात्र, या सर्व काळात सोनिया गांधी शांत राहिल्या. आता त्या स्वत:ची बाजू मांडत असून, त्यांना आपली कहाणी सांगण्याचा पूर्ण अधिकार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. सोनिया गांधी यांच्या पुस्तकावर भाजपने केलेल्या टीकेसंदर्भात पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना प्रियांका वाड्रा म्हणाल्या, इतक्या वर्षांपासून ते माझ्या आईबद्दल खोटे बोलत आले आहेत. आता त्या सत्य सांगत आहेत, तर ते त्यालाही खोटेच म्हणणार, हे साहजिक आहे. याशिवाय ते दुसरे काय बोलू शकतात? मात्र, ते त्यांचे पुस्तक वाचत आहेत, याचा मला खूप आनंद आहे. दरम्यान, भाजपने सोनिया गांधी यांच्यावर त्यांच्या 'बिलीगिंग' या पुस्तकातून १९७५ मध्ये देशात लागू करण्यात आलेल्या आणीबाणीचे समर्थन करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला होता. तसेच, १९८४ मधील शीखविरोधी दंगलींच्या प्रकरणात त्यांचे दिवंगत पती आणि माजी पंतप्रधान राजीव गांधी यांना निर्दोष ठरवण्याचा प्रयत्न पुस्तकातून करण्यात आल्याचा दावाही भाजपने केला होता.भाजपने सोनिया गांधी यांच्या पुस्तकाच्या शीर्षकावरही टीका केली होती. 'बिलीगिंग'ऐवजी या पुस्तकाचे नाव 'व्हाईटवॉशिंग' म्हणजेच चुका आणि गैरकृत्यांवर पांघरूण घालणे, असे असायला हवे होते, अशी टिप्पणी भाजपने केली होती. सोनिया गांधी यांच्या आत्मचरित्रावरून काँग्रेस आणि भाजप यांच्यातील राजकीय आरोप-प्रत्यारोपांना पुन्हा धार आली असून, प्रियांका वाड्रा यांच्या वक्तव्यामुळे या वादाला नवे वळण मिळाले आहे.

फूट पडणार नाही– ना.मुश्रीफ

याची काळजी घ्यावी, असे मुश्रीफ म्हणाले.दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चेवर बोलताना ते म्हणाले, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी योग्य वेळ आल्यानंतर याबाबत माहिती देऊ, असे स्पष्ट केले आहे. सुनेत्रा पवार आणि जयंत पाटील हे दोघे मिळून याबाबत निर्णय घेतील. सुनेत्रा पवार जो निर्णय घेतील, त्यामागे आम्ही सर्वजण ठामपणे उभे राहू.शरद पवार यांच्या भेटीसाठी राष्ट्रवादीच्या काही आमदारांनी वेळ मागितल्याच्या चर्चेबाबत आपल्याला कोणतीही माहिती किंवा निरोप मिळालेला नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. पक्षाला कमकुवत करण्याचे काहींचे प्रयत्न सुरू असले तरी ते यशस्वी होणार नाहीत. सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस आगामी काळात चांगली कामगिरी करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.संजय राऊत यांनी आपल्यासह चंद्रकांत पाटील यांना 'सत्तेतील वठ्ठू' म्हटल्याबाबत विचारले असता, बाहेरील नेत्यांकडून सातत्याने कोल्हापूर जिल्ह्याचा अपमान करणारी वक्तव्ये केली जात आहेत, असे मुश्रीफ म्हणाले. संजय राऊत असोत किंवा रवींद्र धंगेकर, त्यांचा या विषयाशी काय संबंध? पक्षांतर्गत प्रश्न आम्ही आमच्या पातळीवर सोडवू. त्यामध्ये इतरांनी हस्तक्षेप करण्याची गरज नाही, असेही त्यांनी सुनावले.

उत्तर बंगालमध्ये भूकंपाचे धक्के

कालिम्पोंग आणि जलपाईगुडी जिल्ह्यांमध्ये स्पष्टपणे जाणवले. सिक्कीम, बिहार, नेपाळ आणि भूतानच्या काही भागांमध्येही भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपाचा केंद्रबिंदू सिक्कीमला लागून असलेल्या नेपाळमध्ये होता. भूकंपाची खोली सिक्कीमच्या युक्सोमपासून वायव्येस सुमारे ४० किलोमीटर असल्याचे सांगण्यात आले. परिणामी, सिक्कीमच्या मोठ्या भागात, तसेच पश्चिम बंगालच्या दार्जिलिंग आणि कालिम्पोंग या दोन डोंगराळ जिल्ह्यांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. अचानक आलेल्या भूकंपाच्या धक्क्याने लोक घाबरले आणि जीव वाचवण्यासाठी घराबाहेर धावले. मोठ्या परिसरात भूकंपाचे धक्के जाणवले असले तरी, नेपाळमधील भूकंपामुळे कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे मोठे नुकसान झाल्याचे अधिकृत वृत्त नाही.उत्तर बंगालचा हा प्रदेश भूकंपप्रवण आहे. या वर्षाच्या सुरुवातीला, जूनमध्ये, भूतानमध्ये झालेल्या ५.८ तीव्रतेच्या भूकंपाने उत्तर बंगालला हादरवले होते. भूकंपाचा केंद्रबिंदू भूतानची राजधानी थिम्पूपासून सुमारे २२ किलोमीटर अंतरावर होता आणि त्याचा परिणाम भारत, चीन, बांगलादेश आणि नेपाळच्या अनेक सीमावर्ती भागांमध्ये जाणवला होता.

धमकी प्रकरणी एकास अटक

या घटनेप्रकरणी या प्रवाशाला ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी एनएससीबीआय विमानतळ पोलीस ठाण्यात सोपवण्यात आले. एअर इंडियाचे विमान एआय २७७२ बुधवारी सकाळी कोलकाताहून मुंबईसाठी उड्डाण करणार होते. उड्डाणाच्या अगदी आधी, शौचालयात अपहरणाच्या धमकीशी संबंधित एक संदेश प्राप्त झाला. सकाळी सुमारे १०:३७ वाजता केबिन क्रूच्या लक्षात हा संदेश आला. सुरक्षा प्रोटोकॉल तात्काळ सक्रिय करण्यात आले आणि विमानाचे उड्डाण रद्द करून ते एका विलगीकरण कक्षात नेण्यात आले.विमानातील सर्व १०५ प्रवाशांना खाली उतरवण्यात आले. त्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी विमान, प्रवासी आणि त्यांच्या सामानाची कसून तपासणी केली. तपासणीदरम्यान कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. सर्व आवश्यक सुरक्षा प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर, विमानाला उड्डाणासाठी परवानगी देण्यात आली.

नियोजित वेळेपेक्षा सुमारे सात तासांच्या विलंबाने, विमान सायंकाळी ५:३८ वाजता मुंबईसाठी रवाना झाले. एका प्रवाशाला अटक करून त्याला विमानतळ पोलिसांच्या ताब्यात दिल्यामुळे आता तपासाला नवीन वळण लागले आहे. तथापि, जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात प्रवाशाची ओळख किंवा धमकीमागील त्याच्या कथित भूमिकेबद्दल कोणताही तपशील देण्यात आलेला नाही.

दोन्ही आघाड्यांवर सज्ज रहावे

शस्त्रप्रणालींचा वापरामुळे प्रत्यक्ष संपर्काशिवाय लढल्या जाणाऱ्या युध्दाचे महत्त्वही वाढत आहे, असे राजनाथ सिंह यांनी नमूद केले. आत्मघाती ड्रोन, टेहळणी आणि ड्रोनविरोधी मोहिमा यांसारख्या नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कमांडर्सनी पूर्णपणे सज्ज राहावे, असे त्यांनी सांगितले.

इलेक्ट्रॉनिक युध्द, सायबर आणि अवकाश या नव्या क्षेत्रांतील आव्हानांचा विचार करून भारतीय हवाई दलाने त्यासाठी स्वतंत्र कार्यनीती आणि यंत्रणा विकसित कराव्यात, असे आवाहन संरक्षणमंत्र्यांनी केले. या क्षेत्रांतील तयारी मजबूत केल्यास भविष्यातील आव्हानांचा सामना करणे अधिक सोपे होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या परिषदेत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते भारतीय हवाई दलाच्या डिजिटायझेशन, ऑटोमेशन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि ॲप्लिकेशन नेटवर्किंग युनिटच्या कृत्रिम बुध्दीमत्ता उत्कृष्टता केंद्राने विकसित केलेल्या विविध ॲप्लिकेशन्सचे लोकार्पण करण्यात आले. हवाई दलाच्या सुरक्षित नेटवर्कवर कार्यान्वित करण्यात आलेल्या या ॲप्लिकेशन्समुळे हवाई मोहिमा, प्रशासकीय कामकाज आणि हवाई क्षेत्राच्या सुरक्षिततेशी संबंधित कामे स्वयंचलित होतील आणि ती अधिक वेगाने पूर्ण करता येतील.

रागाच्या भरात 'ते' वक्तव्य केले-मुश्रीफ

(पान १ वरून)

असलेल्या टीकेबाबत मुश्रीफ म्हणाले, विरोधकांनी काढलेल्या संघर्ष मोर्चातील काही कृती आणि वक्तव्यांमुळे कार्यकर्ते संतप्त झाले होते. मोर्चात मुख्यमंत्री यांची अवमानकारक छायाचित्रे लावण्यात आली होती. तीन मंत्री,तीन खासदार आणि दहा आमदारांबाबत बदनामीकारक उल्लेख करण्यात आले होते.

मोर्चात मोठे पायताण आणून त्यावर 'कोल्हापुरी बाणा पायताण हाणा' असे लिहिले होते. याशिवाय यम आणि रेडाही आणण्यात आला होता. 'विरोधकांना रेडा दाखवूया' अशी वक्तव्ये करण्यात आली. या प्रकारांमुळे लोकांमध्ये चीड निर्माण झाली. चंद्रकांतदादांनाही विरोधकांची काही वक्तव्ये आणि कृती पटली नव्हती. त्यामुळे तेही काही बोलले असतील. माझाही तोंडून रागापोटी ते बाबय गेले. ते गेले नसते तर बरे झाले असते, असे मुश्रीफ यांनी स्पष्ट केले.

गोकुळच्या अध्यक्षपदाची निवड झाली आहे. त्यामुळे आता हा विषय संपवावा. गेल्या दीड-दोन महिन्यांत गोकुळचा विषय प्रसारमाध्यमांनी देशभर पोहोचवला आहे.आता संघ कसा चांगला चालेल, त्याची वाढ कशी होईल आणि अमूलशी कशी स्पर्धा करता येईल, यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे ते म्हणाले.

गेल्या सहा महिन्यांत प्रशासकीय मंडळाच्या काळात गोकुळचे दूध संकलन घटले असून पशुखाद्य विभागातही तोटा झाला आहे. या काळात घेतलेल्या चुकीच्या निर्णयांचा फेरविचार करून आवश्यक बदल करावेत.

अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कारवायांमुळे मुंबईसह विविध बाजारपेठांमध्ये दर्जेदार दुधाची मागणी वाढली आहे. मुंबई,पुण्यासह अन्य बाजारपेठांमध्ये अधिक दूध पाठविण्यासाठी संकलन वाढविण्याची गरज आहे. सर्व संचालकांनी एकत्र बसून दूध संकलनाचा टप्पा ३० लाख लिटरपर्यंत नेण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन मुश्रीफ यांनी केले.

के डीसीसी बँकेकडून हरियाणा, मुरा आणि मेहसाणा जातींच्या दुधाला म्हशी खरेदीसाठी सध्या १० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. हे अनुदान २० हजार रुपये करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. राज्यात कोरडचा दुष्काळाची परिस्थिती असली तरी कोल्हापूर जिल्ह्यात पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे रब्बी पिकांसह जनावरांसाठी चारा उत्पादन वाढवावे. दूधाल म्हशींची खरेदी केल्यास दूध उत्पादन वाढेल. आगामी काळात दुधाला सोन्याचा भाव मिळण्याची अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

केडीसीसी बँकेच्या आगामी निवडणुकीत समझोता होणार का, या प्रश्नावर तो आजचा विषय नसून योग्य वेळी सर्व नेते एकत्र बसून निर्णय घेतील, असे मुश्रीफ यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधान कर्नाटक दौऱ्यावर

(पान १ वरून)

सोहळ्यात सहभागी होतील. वावेळी ते उपस्थितांनाही संबोधितही करतील. दुपारी १२.४५ वा. पंतप्रधान तवरेकेरे ते आयआयएम बंगळूरु मेट्रो स्थानकादरम्यान मेट्रो प्रवासी सुविधेचा प्रारंभ करतील तसेच स्वतः मेट्रोने प्रवास करतील. त्यानंतर दुपारी १ वाजता पंतप्रधानांच्या हस्ते बंगळूरमध्ये विविध विकास प्रकल्पांचे भूमिपूजन, उदघाटन होईल. या राष्ट्रार्पण होईल. या सोहळ्यातही पंतप्रधान उपस्थितांना संबोधित करणार आहेत.

त्यानंतर पंतप्रधान मैसुरूला जाणार आहेत.तेथून दुसऱ्या दिवशी ते १४ नोव्हेंबर रोजी गुजरातच्या बनासकांठा जिल्ह्यातील प्रसिद्ध अंबाजी मंदिरात दर्शन आणि पूजा करतील. अंबाजी मंदिर हे ५१ पवित्र शक्तीपीठांपैकी एक मानले जाते.

विलास जाधव यांचे निधन

■ इचलकरंजी, ता.१२



कोल्हापूर नाका, साईनगर येथील प्रतिष्ठित नागरिक विलास यशवंत जाधव यांचे मंगळवार दि. १० रोजी निधन झाले. ते ६१ वर्षांचे होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

गोकुळच्या कारभाराची सूत्रे नव्या संचालक मंडळाकडे

(पान १ वरून)

निवडणुकीत राजेश पाटील यांची अध्यक्षपदी निवड झाली. या पार्श्वभूमीवर शनिवारी गोकुळच्या मुख्य कार्यालयात पदभार स्वीकारण्याचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर संचालक मंडळाची बैठक घेण्यात येईल. अध्यक्ष म्हणून राजेश पाटील यांच्यासाठी ही पहिलीच बैठक असल्याने संघाच्या आगामी कामकाजाच्या दृष्टीने तिचे महत्त्व आहे.

प्रशासकीय काळात सुरू असलेले निर्णय, दूध उत्पादकांच्या समस्या, दूध संकलन आणि विक्रीचा व्यवस्था, संस्थांचे प्रश्न तसेच संघाच्या आर्थिक व प्रशासकीय कामकाजाचा आढावा नव्या संचालक मंडळासमोर महत्त्वाचा ठरणार आहे. निवडणुकीदरम्यान विविध राजकीय गटांकडून मांडण्यात आलेल्या भूमिका आणि दूध उत्पादकांना दिलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबतही नव्या नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची असेल.अध्यक्षपदाच्या निवडीसाठी झालेला राजकीय संघर्ष आता संपला असून, गोकुळचा कारभार सुरळीत चालविण्याची जबाबदारी नव्या संचालक मंडळावर आली आहे. शनिवारी होणाऱ्या पहिल्या बैठकीतून नव्या नेतृत्वाच्या कामकाजाची दिशा समोर येणार आहे.

दोन्ही शिवसेना एकत्र आल्यास आनंद होईल

(पान १ वरून)

आनंदी कोणी नसेल,' असे ते म्हणाले.ओमराजेंच्या या विधानामुळे ठाकरे गट आणि शिंदे गटाच्या संभाव्य एकत्रीकरणाच्या चर्चेला पुन्हा एकदा राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र, दोन्ही गटांच्या एकत्र येण्याबाबत प्रत्यक्षात काही राजकीय हालचाली होणार का? याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

सांगलीत भितीवर डोके आपटून युवकाचा खून

■ सांगली,ता.१२(प्रतिनिधी)–

माजी नगरसेवकाच्या हॉटेलवर झालेल्या वादातून सांगलीवाडीत दोघा पोलिस भावांसह

दोघे पोलिस जुळे भाऊ

राम–लखन या टोपण नावाने ओळखले जाणारे सुशिल व सुमित हे दोघेजण पोलिस कर्मचारी आहेत. २००८ मध्ये पोलिस भरती झाले आहेत. एकजण नवी मुंबईत तर एकजण कळंबोली येथे कार्यरत आहे. दोघेजण वादविवासाठी सांगलीत आले होते. वादविवासाची पार्टी करत असताना हॉटेलमध्ये सुरू असलेल्या वादातून त्यांनी विजय पाटील याचा खून केल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे.

तघांनी बेदम मारहाण करून भितीवर डोके आपटून विजय वसंत पाटील (वय ३६,रा.अमर चौक,सांगलीवाडी) या युवकाचा खून केला. मंगळवारी मध्यरात्रीनंतर साडे बाराच्या सुमारास हा प्रकार घडला. खुनानंतर पसार झालेल्या पोलिस कर्मचारी सुशिल भीमराव सरगर, सुमित भीमराव सरगर (रा.अभ्यनगर, मूळ रा.तळेवाडी,ता.आटपाडी) यांच्यासह त्यांच्या साथीदाराचा पोलीस शोध घेत आहेत.

तीन मारेकऱ्यांचा शोध सुरू

मयत विजय पाटील हा शेती करत होता. मंगळवारी रात्री तो मित्र विशाल काटकर याच्याबरोबर ईश्वरपूर रस्त्यावरील हॉटेल अनुयशमध्ये जेवायला गेलेला होता. ते हॉटेल माजी नगरसेवक हरिदास पाटील यांच्या मालकीचे आहे. रात्री साडेबाराच्या सुमारास विजय आणि हरिदास यांच्यात कोणत्यातरी कारणावरून वाद झाला. हरिदास हे विजयला शिवीगाळ करत होते. त्याचवेळी हॉटेलमध्ये पोलिस कर्मचारी सुशिल व सुमित हे दोघे भाऊ आणि त्यांचा साथीदार जेवायला बसले होते. मयत विजय आणि हरिदास यांच्यात वाद सुरू असताना पोलिस कर्मचारी सुशिल व सुमित आणि साथीदाराने उठून विजयला लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरू केली. तेवढ्यात विजयचा भाऊ विशाल हा त्याचे मित्र प्रकाश मारूती भानुसे, पवन कोळी यांच्याबरोबर जेवायला आला होता. भाऊ विजयला मारहाण सुरू असल्याचे पाहून तो मित्रांसह सोडवायला पुढे गेला. परंतु लाथाबुक्क्यांनी विजयला मारहाण करून भितीवर आणि लोखंडी शटरवर डोके आपटल्यामुळे तो बेशुद्ध होऊन खाली पडला होता. विजयला वाचवण्यासाठी प्रकाश भानुसे याने पाण्याचा जग उचलून हल्लेखोरांना फेकून मारला. हल्ल्यानंतर तिघेजण तेथून पळाले. बेशुद्ध विजय याला शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्यावेळी डॉक्टरांनी

सीसीटीव्हीमध्ये थरार कैद

हॉटेल अनुयशमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा बसवलला आहे. त्यामध्ये विजय पाटील याला झालेल्या मारहाणीचा थरार चित्रीत झाला आहे. त्यामध्ये दोघे पोलिस भाऊ व साथीदार विजयला मारहाण करत असल्याचे चित्रीत झाले आहे. पोलिसांनी फुटेज ताब्यात घेतले आहे.

विजय मयत झाल्याचे घोषित केले. सांगली शहर पोलिसांना माहिती मिळताच सहायक निरीक्षक संदीप कांबळे यांच्यासह पथकाने घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी मयत विजयचा भाऊ विशाल याने फिर्याद दिली आहे. दरम्यान, विजय पाटील याचा खून होण्यापूर्वी हॉटेल मालक तथा माजी नगरसेवक हरिदास पाटील यांच्याबरोबर वाद झाला होता. पोलिसांनी दाखल केलेल्या फिर्यादीमध्ये यासंदर्भात नोंद घेतली आहे.त्यामुळे खुनानंतर हरिदास पाटील यांची पोलिसांकडून चौकशी केली जात आहे.

सांगली जिल्हा बँक अध्यक्ष निवड १८ नोव्हेंबरला

(पान १ वरून)

राष्ट्रवादीकडून वैभव शिंदे आणि संभाजी कचरे यांच्या नावे चर्चा आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत २१ पैकी १५ जागा बिनविरोध झाल्या होत्या, तर उर्वरित ६ जागांच्या मतमोजणीत राजकीय दिग्गजांची चर्चेच्या राखेले. निवडणूक निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत अध्यक्षांची निवड करणे प्रशासकीयदृष्ट्या बंधनकारक असल्याने १८ नोव्हेंबरला नवीन अध्यक्षांची निवड होणार आहे. त्यासाठी संचालक मंडळाची सभा होणार असून त्यामध्ये अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची निवड होईल. या पार्श्वभूमीवर राजकीय हालचाली गतिमान झाल्या आहेत.

संचालक मंडळामध्ये सर्वाधिक काँग्रेसचे सहा संचालक आहेत. त्यामुळे पहिल्यांदा अध्यक्षपद जवळपास काँग्रेसकडे जाणार असल्याचे संकेत आहेत. अध्यक्षपदाच्या शर्यतीत काँग्रेसचे महेंद्र लाड, आमदार विश्वजीत कदम तर शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष देवराज पाटील यांची नावे सध्या आघाडीवर आहेत. उपाध्यक्षपद शरद पवार राष्ट्रवादी किंवा शिवसेनेकडे जाण्याची शक्यता आहे. सेनेकडून तानाजी पाटील तर राष्ट्रवादीकडून वैभव शिंदे आणि संभाजी कचरे यांच्या यांची नावे पुढे येत आहेत. मात्र, संचालक मंडळातील बदलले क्या समीकरणांमुळे ही निवड सर्वसंमतीने होणार की राजकीय संघर्षातून, याबाबत उत्सुकता ताणली गेली आहे. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी अध्यक्षपदाचा निर्णय काँग्रेस, राष्ट्रवादी, भाजप आणि शिवसेना यांच्या सर्वपक्षीय समन्वयातून व एकमताने घेतला जाईल अशी भूमिका मांडली आहे.

शिकाऊ विमान घसरले

(पान १ वरून)

प्रशिक्षणार्थी वैमानिक उड्डाणाचा सराव करत होता. वावेळी विमान वेग घेत असताना अचानक धावपट्टीवरून घसरून बाजूला गेले. या अनपेक्षित घटनेमुळे विमानतळ प्रशासनाची धावपळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच विमानतळ प्रशासन, अग्निशमन दल, रुग्णवाहिका, वैद्यकीय पथक आणि पोलीस अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. खबरदारीचा उपाय म्हणून विमानतळ परिसरातील सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

दरम्यान, शिकाऊ विमान धावपट्टीवरून घसरण्यामागे तांत्रिक बिघाड होता की अन्य काही कारण, याचा तपास सुरू करण्यात आला आहे. विमानाचे नेमके किती नुकसान झाले, याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही.

राज्यस्तरीय कोळी समाज वधू-वर मेळावा

■ इचलकरंजी,ता.१२–

येथील मधु-स्वप्न कोळी समाज वधू-वर सूचक केंद्राच्या वतीने राज्य स्तरीय कोळी समाज वधु वर मेळावा आयोजित करण्यात आला आहे. रविवार दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी एक वाजता रोटरी दगडूलाल मर्दा मानव सेवा केंद्र रिंग रोड निरामय हॉस्पिटल जवळ इचलकरंजी येथे संपन्न होत आहे.अशी माहिती शशिकांत कोळी सर यांनी एका पत्रकाद्वारे दिली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून कोळी समाज वधू-वर मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. त्याला दरवर्षी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ना पैशासाठी ना नावासाठी हा मेळावा फक्त समाजासाठी हे ब्रीदवाक्य घेऊन हा मेळावा पार पडतो. यासाठी महाराष्ट्र सह कर्नाटक राज्यातूनही अनेक इच्छुक वधू वर सहभागी होतात. समाजातील उपवर मुला-मुलींच्या लग्नकार्यात सहकार्य लाभावे, मुला मुलींना योग्य स्थळ मिळून विवाह सोहळा पार पडावा, हाच या वधू-वर मेळाव्याचा उद्देश आहे. तेव्हा कोळी समाज बांधवांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

शासननियुक्त चार संचालकांच्या मतांमुळे सत्तेचे गणित बदलले

■ कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)–

संचालक मंडळाच्या निवडणुकीपासून सुरू असलेल्या सत्तासंघर्षानंतर अखेर गोकुळ दूध संघाच्या अध्यक्षपदावर महायुतीने वर्चस्व मिळवले. मंगळवारी झालेल्या निवडीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे माजी आमदार राजेश पाटील यांनी समविचारी आघाडीचे उमेदवार शशिकांत पाटील-चुयेकर यांचा १६ विरुध्द १३ मतांनी पराभव केला.

निवडून आलेल्या २५ संचालकांमध्ये समविचारी आघाडीचे १३, तर महायुतीचे १२ संचालक असताना शासन नियुक्त चार संचालकांच्या मतदानामुळे सत्तेचे गणित बदलले. या विजयामुळे चंदगड तालुक्याला प्रथमच गोकुळच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला. १८ ऑक्टोबरला झालेल्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत समविचारी आघाडीने २५ पैकी १३ तर महायुतीला १२ जागा मिळाल्याने अध्यक्षपदाच्या निवडीत समविचारी आघाडीचे पारडे जड होते.

२९ ऑक्टोबरला झालेल्या पहिल्या निवड सभेला महायुतीचे १२ संचालक अनुपस्थित राहिल्याने कोरम पूर्ण झाला नाही. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सभा तहकूब केली. त्यानंतर

राजेश पाटील म्हणाले, महायुतीच्या नेत्यांनी गोकुळच्या अध्यक्षपदाची मोठी जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करताना गोकुळचे शिल्पकार स्वर्गीय आनंदराव पाटील चुयेकर आणि ज्येष्ठ नेते अरुण नरके यांनी दिलेल्या विचारांनुसार संघाचा कारभार करू. झाले गेले विसरून सर्व २५ संचालकांनी एकदिलाने दूध उत्पादकांच्या हितासाठी काम करावे.

समविचारी आघाडीच्या १३ संचालकांनी स्वतंत्र बैठक घेऊन शशिकांत पाटील-चुयेकर यांची अध्यक्षपदी निवड झाल्याचे जाहीर केले. मात्र, गोकुळ प्रशासनाने या निवडीला मान्यता दिली नाही. परिणामी, हा वाद उच्च न्यायालयात पोहोचला.

दरम्यान, राज्य सरकारने गोकुळच्या संचालक मंडळावर चार शासननियुक्त संचालकांची नियुक्ती केली. त्यांच्या मतदानाच्या अधिकारावर समविचारी आघाडीने न्यायालयात आक्षेप घेतला.९ नोव्हेंबरच्या सुनावणीनंतर न्यायालयाने निवडणुकीला स्थगिती न दिल्याने अध्यक्षपदाच्या निवडीचा मार्ग मोकळा झाला. न्यायालयाच्या निर्देशानुसार निवडून आलेल्या २५ संचालकांची आणि शासननियुक्त चार संचालकांची मते स्वतंत्र मतपेट्यांमध्ये घेऊन मोजण्याची व्यवस्था करण्यात आली.

मंगळवारी गोकुळ शिरगाव येथील मुख्य कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी मौसमी चौगुले यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली. महायुतीकडून राजेश पाटील, तर समविचारी आघाडीकडून शशिकांत पाटील-चुयेकर यांनी उमेदवारी दाखल केली. प्रथम २५ निवडून आलेल्या संचालकांच्या मतांची मोजणी करण्यात आली. त्यात शशिकांत पाटील-चुयेकर यांना १३, तर राजेश पाटील यांना १२ मते मिळाली. त्यानंतर शासननियुक्त चार संचालकांच्या मतमोजणीत चारही मते राजेश पाटील यांच्या पारड्यात पडली. त्यामुळे त्यांची एकूण मतसंख्या १६ झाली आणि त्यांनी अध्यक्षपद पटकावले.

निवड प्रक्रियेदरम्यान शासननियुक्त संचालकांना मात दिवसांची नोटीस देण्याचा आदेश होती का, असा आक्षेप अभिजित तावशेटे, बयाजी शेळके आणि प्रा.किसन चौगुले यांनी घेतला. गोकुळच्या उपविधीतील नोटीस देण्याच्या तरतुदीचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. मात्र, निवडणूक प्रक्रिया पुढे सुरू ठेवण्यात आली.अध्यक्षपदाची निवड पूर्ण झाली असली, तरी शासननियुक्त संचालकांच्या नियुक्तीची वैधता आणि त्यांच्या मतदानाच्या अधिकारासंबंधीचा न्यायालयीन वाद कायम आहे. त्यामुळे या प्रकरणातील पुढील न्यायालयीन निर्णयाकडे दोन्ही गटांचे लक्ष लागले आहे.

चंद्रशेखर-ओवेसी यांची आघाडी

(पान १ वरून)

सलग तिसऱ्यांदा सत्तेवर येण्यापासून रोखण्यासाठी सामाजिक परिवर्तन मोर्चा एक मजबूत पर्याय ठरू शकतो. दलित आणि मुस्लिम समाजाला राजकीय सत्तेत समान सहभाग प्रतिनिधित्व मिळावे, हा या आघाडीमागील महत्त्वाचा उद्देश असल्याचेही त्यांनी नमूद केले. तर आझाद समाज पक्षाचे प्रमुख चंद्रशेखर आझाद यांनी या नव्या आघाडीला केवळ तिसरा पर्याय न म्हणता, पहिला मजबूत पर्याय म्हणून उभे करण्याचा निर्धार व्यक्त केला. राजकारणात सामाजिक वंचित घटकांचा अपमान आणि त्यांच्या हक्कांकडे दुर्लक्ष आता सहन केले जाणार नाही, असा ठाम संदेश त्यांनी दिला.

उत्तर प्रदेशात दलित आणि मुस्लिम मतदार हे अनेक विधानसभा मतदारसंघांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. अशा परिस्थितीत ओवैसी आणि चंद्रशेखर आझाद यांची युती कितपत प्रभावी ठरते, याकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे.या आघाडीमुळे भाजपसमोरच नव्हे, तर समाजवादी पक्ष आणि काँग्रेससारख्या विरोधी पक्षांसमोरही नवे राजकीय आव्हान उभे राहू शकते. मात्र, प्रत्यक्ष निवडणुकीत मतदारांचा प्रतिसाद,उमेदवारांची निवड,स्थानिक संघटनात्मक ताकद आणि मतांचे होणारे विभाजन हे निर्णायक मुद्दे ठरणार आहेत.या युतीचे महत्त्व केवळ दोन राजकीय पक्ष एकत्र येण्यापुरते मर्यादित नाही. दलित आणि मुस्लिम समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा मुद्दा केंद्रस्थानी आणण्याचा हा प्रयत्न आहे.

मात्र, केवळ घोषणा आणि राजकीय समीकरणे यामुळे निवडणुकीत यश मिळत नाही. बूथ स्तरावरील संघटन, विश्वासार्ह नेतृत्व, स्थानिक प्रश्नांवरील ठोस भूमिका आणि सर्व समाजघटकांना सोबत घेण्याची क्षमता या बाबी महत्त्वाच्या ठरणार असल्याने मत राजकीय विश्लेषकांनी व्यक्त केले आहे.

विटा नगरपरिषद देशात प्रथम

(पान १ वरून)

शहराने राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. विटा शहराला मिळालेला हा राष्ट्रीय बहुमान म्हणजे केवळ एका संस्थेचा पुरस्कार नाही, तर शहरासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या प्रत्येक हाताचा सन्मान आहे.

पहाटेपासून शहरातील रस्ते, गटारे, सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्यासाठी घाम गाळणारे स्वच्छता कर्मचारी, स्वच्छता निरीक्षक, पर्यवेक्षक, वाहनचालक, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे फलित आहे. लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, व्यापारी आणि जागरूक नागरिकांनी दिलेल्या सहकार्याचाही या यशात महत्त्वाचा वाटा आहे.स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ मधील देशातील प्रथम क्रमांक आणि राष्ट्रपती भवनातील सन्मान यामुळे विटा शहाराच्या विकासप्रवासाला राष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळाली आहे. स्वच्छतेच्या बाबतीत सातत्य, गुणवत्तापूर्ण कामकाज, आधुनिक कचरा व्यवस्थापन आणि लोकसहभाग यांचा समन्वय साधल्यास लहान शहरदेखील देशपातळीवर आपला ठसा उमटवू शकते, हे विटा शहराने दाखवून दिले आहे.

चारित्र्याच्या संशयावरून पत्नीसह दोघांना मारहाण

पतीसह दोघांवर गुन्हा

इचलकरंजी,ता.१२-

चारित्र्याच्या संशयावरुन पत्नीच्या माहेरी घरात घुसून शिवीगाळ करत पतीने केलेल्या बेदम मारहाणीत तिघेजण जखमी झाले. या प्रकरणी स्वप्निल रंगराव माने (वय २७) व सितेराम पप्पु माने (वय ६० दोघे रा.इंदिरानगर कोरोची) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून प्राजक्ता स्वप्निल माने (वय २६ रा. इंदिरानगर कोरोची) हिने शहापूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी, प्राजक्ता माने ही माहेरी असताना १० नोव्हेंबर रोजी पती स्वप्निल माने याने चारित्र्याच्या संशयावरुन तिला अर्वाच्च शिवीगाळ करत वाद सुरु केला. त्यावेळी प्राजक्ताचा मामेभाऊ आमन हेगडे वाद मिटविण्याचा प्रयत्न केला असता त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. त्यानंतर पुन्हा दुसऱ्या दिवशी मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमारास स्वप्निल माने व सितेराम माने हे दोघे पाठीमागील दरवाजाचा कडी तोडून घरात घुसले. दोघांनी काठीने प्राजक्ता, तिची आई विजया चंद्रकांत आवळे (वय ४२) व भाऊ प्रणव चंद्रकांत आवळे (वय २४) यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यामध्ये विजया यांच्या खांद्याला फॅक्चर झाले असून तिघेही जखमी झाले.

वस्त्रनगरीत पाडवा, भाऊबीजेला कोट्यवधीची उलाढाल

दागिने,वाहने,फ्लॅट खरेदीकडे मोठा कल

इचलकरंजी,ता.१२ -

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या दिवाळी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर इचलकरंजी शहरातील बाजारपेठेत ग्राहकांचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. वस्त्रनगरीत स्वप्नातील घरांपासून ते चारचाकी वाहनांपर्यंत आणि गृहोपयोगी वस्तूंपासून स्मार्ट डिजिटल गॅझेट्सपर्यंत खरेदीला उधाण आले होते. सकाळपासूनच खरेदीसाठी नागरिकांनी गर्दी केल्याने संपूर्ण बाजारपेठ गजबजून गेली होती. सुवर्णपेढी, इलेक्ट्रॉनिक्स, वाहन आणि कापड बाजारपेठेत कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाली आहे.



साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असलेल्या दीपावली पाडव्याला मे. पुरुषोत्तम नारायण गाडगीळ सराफी पेढीमध्ये खरेदीसाठी ग्राहकांनी गर्दी केली होती.

पाडव्यानिमित्त सोने-चांदी खरेदीला ग्राहकांनी विशेष पसंती दिली. शहरातील प्रमुख सराफ पेढ्यांमध्ये पारंपरिक दागिन्यांसह आधुनिक डिझाईनच्या दागिन्यांना मोठी मागणी होती. त्याचबरोबर दुचाकी आणि चारचाकी वाहनांच्या शोरूममध्येही वाहने घरी नेण्यासाठी ग्राहकांची लगबग होती. अनेक नागरिकांनी बुकिंग केलेल्या वाहनांची डिलिव्हरी मुहूर्तावर घेतली. सणासुदीनिमित्त विविध कंपन्यांनी दिलेल्या आकर्षक सवलतींमुळे टीव्ही,फ्रीज, वॉशिंग मशीन आणि मोबाईल खरेदीकडे ग्राहकांचा कल अधिक दिसून येत होता. वस्त्रनगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इचलकरंजीतील कापड दुकाने आणि रेडिमेड कपड्यांच्या दालनांमध्येही खरेदीसाठी मोठी गर्दी झाली होती. वंदाच्या दिवाळी पाडव्याने बाजारपेठेतील मंदीचे सावट दूर करत व्यापाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून आले.

पानशॉप चालकावर प्राणघातक हल्ला

कोरोची,ता.१२(वार्ताहर) -

कोरोची येथे दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याच्या कारणावरून एका पानशॉप व्यावसायिकावर जीघेपेण हल्ला करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. पंकज माने याने फारुख सनदी याच्या डोक्यात व हातावर दगडाने वेदम मारहाण करून गंभीर जखमी केले. या प्रकरणी शहापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी फारुक मुबारक संनदी (वय ३२, रा. कोरोची) यांचे कोरोची येथील पाण्याच्या टाकीजवळ मुबारक पान शॉप नावाचे दुकान आहे. ८ रोजी रात्रीच्या सुमारास संशयित आरोपी पंकज सर्जेराव माने (रा. कोरोची) हा दुकानासमोर आला.त्याने फारुक सनदी यांच्याकडे पैशांची मागणी केली. फारुख याने ७ हजार रूपयाची मागणी केली मात्र, रक्कम देण्यास स्पष्ट नकार दिल्याने पंकजने दगडाने फारुखला मारहाण केली.मारहाणीत फारुख याचा उजवा हात फ्रॅक्चर झाला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार कांबळे करीत आहेत.

तळंदगेच्या उपसरपंचपदी विरेंद्र रुग्गे

हुपरी, ता. १२ (वार्ताहर)-

तळंदगे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी विरेंद्र रुग्गे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीनंतर त्यांच्या समर्थकांनी जल्लोष साजरा केला.

तळंदगे ग्रामपंचायतीवर गेली अनेक दिवस प्रशासक राज होते. राजकीय घडामोडीनंतर ग्रामपंचायत प्रशासनाच्यावतीने उपसरपंच निवडीसाठी ग्रामपंचायत सभागृहात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेच्या अध्यक्षस्थानी निवडणूक अधिकारी एन. आर. रामण्णा हे होते.

निवड प्रक्रियेदरम्यान उपसरपंच पदासाठी विरेंद्र रुग्गे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला होता. निवडणूक अधिकारी एन. आर. रामण्णा यांनी विरेंद्र रुग्गे यांची उपसरपंचपदी निवड झाल्याची अधिकृत घोषणा केली. या निवड सभेप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य दीपक सलगर, रंगराव घनगर, विवेकानंद शिंगाडे, सदस्या वर्षा भोजकर, अर्चना माळी, सविता चौगुले यांच्यासह सनतकुमार भोजकर, सागर चौगुले, मोहन भंडारे, भूपाल चौगुले, दीपक मोरे, आकाश येताळे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कुंथूगिरीत फेब्रुवारीमध्ये पंचकल्याण महोत्सव

कुंथुसागर महाराज

हातकणंगले,ता.१२ (प्रतिनिधी)-

आळते (ता . हातकणंगले) येथील श्री क्षेत्र कुंथूगिरी येथे ८ फ्रेब्रुवारी ते १७ फेब्रुवारी दरम्यान पंचकल्याण प्रतिष्ठा व महामस्तकाभिषेक , विश्व शांती महायज्ञ महोत्सव साजरा होत आहे.

यानिमित ध्वजारोहण, गर्भकल्याण, पूर्वाध - उत्तरार्ध, जन्मकल्याण , दिक्षा तप कल्याण, ज्ञान कल्याण , मोक्ष कल्याण , आणि १५ ते १७ फेब्रुवारी असे सलग तीन दिवस महामस्ताकाभिषेक धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत . अशी माहिती जगतगुरू गणाधिपती गणधराचार्य कुंथुसागरजी महाराज यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भगवान १००८ श्री पार्श्वनाथ यांचा पंचकल्याण, भगवान बाहूबली यांच्या ३१ फूट उंचीच्या मूर्तीची प्रतिष्ठापणा, अभिषेक , २३ पार्श्वनाथ भगवान यांच्या मूर्तीची स्थापना, लघू सम्मेद शिखरजी स्थित २४ जिन प्रतिमांचा अभिषेक ,कैलास पर्वत स्थित भगवान आदिनाथजी यांचा महामस्ताकाभिषेक,३१ फूट उंचीच्या मानस्तंभाचा भव्य अभिषेक आणि आचार्य भगवंत प्रतिमांची स्थापना यासह अन्य धार्मिक कार्यक्रम मोठ्या भक्ती भावाने आणि लोक सहभागाने साजरे केले जाणार आहेत. यासाठी संपूर्ण देशातून लोक येणार आहेत अशी माहिती कुंथुसागर महाराज यांनी दिली.



पंचकल्याण व महामस्ताभिषेक महोत्सवाची माहिती देताना कुंथुसागर महाराज , प्रकाश आवाडे, अरुणराव इंगवले ,भट्टारक महास्वामीजी.

वायवळी पंचकल्याण महोत्सव समितीचे स्वागताध्यक्ष प्रकाश आवाडे म्हणाले , कुंथु सागर महाराज यांच्या दिव्य सानिध्यात विश्व शांतीचा विचार घेऊन देशातील सर्वात मोठा महोत्सव साजरा होत आहे. दुष्काळी परिस्थितीची जाणिव ठेऊन हे सर्व कार्यक्रम काटकसरीने साजरे केले जातील व वातून बचत झालेला निधी दुष्काळ ग्रस्तासाठी शासनास दिला जाईल .

वायवळी जेष्ठ नेते अरुणराव इंगवले , दिपक पंडित, जिनसेन भट्टारक स्वामीजी, लक्ष्मी सेन भट्टारक स्वामीजी, धर्मसेन भट्टारक स्वामीजी यांनी ही धार्मिक कार्यक्रम चांगल्या पद्धतीने साजरा करू असे अश्वस्त केले. वायवळी जयश्री दीदी, राष्ट्रीय अध्यक्ष विजय शहा, नीलमजी अजमेरा, महावीर कासलीवाल, सुधीर पाटील, धनंजय टारे, सचिन पाटील, अनिल जमगे, रविंद्र देवमोरे, बाबूभाई गांधी ,माणिक संकाणा, दिपक पंडीत, सुरेश मोघे,राजेश दोषी, शेषराज पाटणी, गजराज पाटणी, ओमजी पाटणी बाळगोंडा पाटील, माणिक संकांणा ,सुभाष करके , भाऊसो पाटील, संजय पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

औरवाडमध्ये युवकाची आत्महत्या

बुबनाळ ता.१२ (वार्ताहर) -



औरवाड(ता.शिरोळ) येथील सौरभ भारत माने (वय२४) या युवकाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवारी उघडकीस आली.याबाबत रविंद्र लिंगाप्पा माने यांनी कुरुंदवाड पोलिसांना वर्दी दिली आहे.सौरभ याने राहत्या घरातील लोखंडी अँगलला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतल्याचे पोलिसांनी सांगितले.याप्रकरणी कुरुंदवाड पोलिस ठाण्यात गळफास घेऊन मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

ज्ञानगंगा एज्युकेशन सोसायटी, संचलित

न्यू व्हिजन विद्या मंदीर, इचलकरंजी

शिक्षक/शिक्षिका पाहिजेत

अ.क्र.	विषय	पात्रता	संख्या
१	मराठी, इंग्रजी गणित, विज्ञान, शा.शिक्षण	H.S.C.,D.Ed B.Sc., B.Ed. B.A., B.Ed. B.A., B.P.Ed.	०५
२	शिपाई	H.S.C.	०१

टिप : इच्छुक उमेदवारांनी अर्जासोबत रविवार, दि. १५/११/२०२६ रोजी सकाळी १० वाजता मुलाखतीस उपस्थित रहावे.

संपर्क : मोबा.नं. 9011952097

पत्ता : जुना चंदूर रोड, दुर्गामाता चौक, इचलकरंजी.

संधीवाताच्या रुग्णांसाठी सुपरस्पेशालिटी सेवा इचलकरंजी येथे रविवारी



डॉ. वसीम काझी

M.D.(Med.), P.G.D.G.M., D.N.B.(RHEUMATOLOGY)



सालील लक्षणे असल्यास संधीवात तज्ज्ञांची भेट घ्यावी

- सांधे दुखणे
- सकाळी उठल्यानंतर सांधे अवघड होणे
- स्नायूंची सूज-दुखणे आणि दुर्बलता (मायोसायटीस)
- डोळे व तोंडातील चुप कोरडेपणा जाणवणे
- सोरायसिस असलेल्या रुग्णांनी सांधेदुखी होणे
- व्यायामानुसार होणारी छातीची ज्वीन (अस्टिओआथ्रायटीस)
- येरझेगळ्या प्रसरणी स्वयंप्रतिकारी सुज (Vasculitis)
- सांधेदाना सूज येणे
- कमी वयात पाठ दुखणे व ताठरपणे
- उन्हात गेल्यावर चेहरा लाल होणे
- दुर्धक ॲसिडमुळे संगार संधीवात (Gout)
- त्वचा घनव्रावासरखी जाड होणे (Scleroderma)
- स्नायुपात दात

इचारी सर्व रुग्णांनी सांधेविकार तज्ञांकडून तपासून घेण्य ते निदान व उपचार करावा.

प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या रविवारी ■ दि.: 15 नोव्हेंबर 2026 वेळ : रु. 09 ते रु.12

स्थळ: डॉ.बाफनाज् सुपरस्पेशालिटी क्लिनिक

जवाहरनगर,इचलकरंजी ✆ 0230-2441052, 7507860077

KOLHAPUR RHEUMATOLOGY CENTER

कोल्हापूर ह्युमॅटोलॉजी सेंटर

163A,प्लॉट क्रमांक 132, ई वॉर्ड, शिवाजी विद्यापीठ फाक्या,ऐरी गल्ली, राजारामपुरी.

हार्दिक शुभेच्छा!



मा. आमदार आमदार मा.मंत्री

उपमहाराष्ट्र केसरी





मा.श्री. सुरेशराव हाळवणकर साहेब

मा.श्री. राहुल आवाडे



मा.श्री. प्रकाशआण्णा आवाडे



मा.श्री. महावीरआण्णा गाट



सौ. तेजश्री अमृत भोसले
नगरसेविका
इचलकरंजी महानगरपालिका



सौ. ज्योती नागेश पाटील
नगरसेवक
इचलकरंजी महानगरपालिका



श्री. संतोष शेळके
नगरसेवक
इचलकरंजी महानगरपालिका



श्री. राजू पुजारी
नगरसेवक
इचलकरंजी महानगरपालिका

आमचे मार्गदर्शक, उपमहाराष्ट्र केसरी,

मा.श्री. अमृतमामा भोसले

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!

पैलवान अमृतमामा भोसले युवाशक्ती

दुर्गामाता चॅरिटेबल ट्रस्ट जुना चंदूर रोड, इचलकरंजी

व्यंकोबा मैदान कुस्ती संकुल सर्व पैलवान

फुलांचा हार नको, सत्काराचा थाट नको... गरजूंना धान्य द्या, माणुसकीचा हात द्या...!

मा.श्री. अमृतमामा भोसले

खजिनदार- महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ

* टिप :- दुष्काळाच्या पार्श्वभुमीवर सामाजिक बांधिलकी जपत पैलवान अमृतमामा भोसले यांनी यंदा वाढदिवसानिमित्त कोणताही सत्कार स्विकारणार नसल्याचा निर्णय घेतला आहे. तरी शुभेच्छा देऊ इच्छिणाऱ्या सर्व हितचिंतकांनी पुष्पगुच्छ किंवा भेटवस्तू ऐवजी जुना चंदूर रोडवरील दुर्गामाता मंदिर येथे धान्य स्वरूपात भेट देऊन सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन पैलवान अमृतमामा भोसले युवाशक्तीच्यावतीने करण्यात आले आहे.

* पै. अमृतमामा भोसले परगावी गेलेने शुभेच्छा स्विकारणेस उपस्थित राहणार नाहीत.

■ संपादकीय ■

'मधुजाला'चा विळखा

कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी लागणाऱ्या अत्याधुनिक चिपच्या निर्मितीत आघाडीवर असलेल्या एन्व्हिडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जेन्सेन हुआंग यांच्यासमोर गंभीर संकट उभे राहिले आहे. विवाहबाह्य संबंधांची कबुली दिल्यानंतर त्यांच्याविषयी चिनी गुप्तचर यंत्रणेशी संबंधित संशय व्यक्त करण्यात आला आहे. हुआंग हे परदेशी गुप्तचर मोहिमेचे लक्ष्य असल्याच्या वृत्तांची चौकशी सुरू करण्यात येत असल्याचे कंपनीने जाहीर केले आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर एन्व्हिडियाच्या समभागांत लक्षणीय घसरण झाली. हुआंग यांचे ॲलिस हुआंग नावाच्या महिलेशी विवाहबाह्य संबंध असल्याचे समोर आले आहे. या महिलेचा चीनच्या गुप्तचर यंत्रणेशी संबंध असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे हे प्रकरण आता वैयक्तिक आयुष्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. कंपनीची गोपनीय माहिती, राष्ट्रीय सुरक्षा आणि नेतृत्वावरील विश्वास असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या संकटातून हुआंग आपले पद वाचवू शकतील का, याकडे तंत्रज्ञान क्षेत्राचे लक्ष लागले आहे. सामाजिक मानसशास्त्रज्ञ एडविन हॉलॅंडर यांनी ९९५० मध्ये मांडलेल्या 'इडिओसिंक्रसी क्रेडिट्स' नावाची एक संकल्पना मांडली होती. त्यानुसार एखादी व्यक्ती सातत्याने चांगली कामगिरी करते, समूहाच्या अपेक्षा पूर्ण करते आणि सहकाऱ्यांचा विश्वास संपादन करते, तेव्हा तिच्याविषयी सद्भावनेचा एक प्रकारचा संच किंवा साठा निर्माण होतो. साहजिकच, पुढे त्या व्यक्तीकडून चूक झाली किंवा तिचे वर्तन अपेक्षेपेक्षा वेगळे आढळले, तरी पूर्वीच्या कामगिरीमुळे तिला काही प्रमाणात सहानुभूती आणि दुसरी संधी मिळू शकते. जेन्सेन हुआंग यांनी १९९३ मध्ये एन्व्हिडियाची सहस्थापना केली. त्यानंतर तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी कंपनीचे नेतृत्व केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली एन्व्हिडियाने जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात महत्त्वाचे स्थान निर्माण केले. त्यामुळे कंपनीचे संचालक मंडळ, कर्मचारी आणि गुंतवणूकदार यांच्यात त्यांनी मिळवलेला विश्वास सध्याच्या संकटात उपयोगी पडू शकतो. मात्र, एखाद्या बिझनेस लीडरचे वर्तन स्वार्थी असल्याचे किंवा संस्थेच्या मूलभूत मूल्यांना धक्का देणारे असल्याचे आढळल्यास पूर्वीची विश्वासार्हता झपाट्याने कमी होऊ शकते, हे वास्तव आहे. हुआंग यांच्याबाबतीतही हाच प्रश्न निर्णायक ठरणार आहे. एन्व्हिडियामध्ये सुमारे ४२ हजार कर्मचारी कार्यरत असून, कंपनीत माहितीच्या सुरक्षेसाठी कठोर नियम लागू आहेत. अत्याधुनिक चिपच्या निर्यातीवर अमेरिकन सरकारचे नियंत्रण असल्याने कंपनीचे कामकाज राष्ट्रीय सुरक्षेशीही संबंधित आहे. त्यामुळे हुआंग यांना संबंधित महिलेच्या कथित गुप्तचर संबंधांची माहिती होती का आणि कंपनीची कोणतीही गोपनीय माहिती चीनपर्यंत पोहोचली का, हे चौकशीतून स्पष्ट होणे आवश्यक आहे. हुआंग यांची फसवणूक झाल्याचे सिद्ध झाले, तर त्यांच्या दीर्घकालीन कामगिरीचा फायदा त्यांना मिळू शकतो. तंत्रज्ञान क्षेत्रात वादग्रस्त प्रकरणांमुळे पद सोडावे लागलेल्या काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अन्य कंपन्यांमध्ये आपली कारकीर्द पुन्हा उभी केली आहे. उदाहरणार्थ, 'एचपी'चे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क हर्ड यांनी २०१० मध्ये एका कंत्राटदाराशी असलेले वैयक्तिक संबंध लपवण्यासाठी खर्चाच्या नोंदी चुकीच्या केल्याच्या प्रकरणानंतर राजीनामा दिला होता. त्यानंतर अवघ्या महिनाभरात ते ओरॅकलमध्ये दाखल झाले. मात्र, हुआंग यांची परिस्थिती वेगळी आहे. त्यांनी स्वतः स्थापन केलेल्या 'एन्व्हिडिया'चे तीन दशकांहून अधिक काळ नेतृत्व केले आहे. त्यामुळे कंपनी सोडून दुसरीकडे जाणे हा त्यांच्यासाठी तितकासा सोपा पर्याय नाही. दुसरीकडे, त्यांच्या जागी नवा मुख्य कार्यकारी अधिकारी निवडणेही एन्व्हिडियासाठी आव्हानात्मक ठरू शकते. हुआंग यांनी कंपनीत व्यवस्थापनाची तुलनेने सरळ रचना ठेवली आहे. सुमारे ६० वरिष्ठ अधिकारी थेट त्यांना अहवाल देतात. त्यामुळे त्यांचा स्पष्ट उत्तराधिकारी कोण, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. या प्रकरणानंतर हुआंग यांनी रविवारी कर्मचाऱ्यांना पाठवलेल्या ई-मेलमध्ये विवाहबाह्य संबंधांची कबुली दिली. पत्नी आणि मुलांच्या भावना दुखावल्याबद्दल त्यांनी माफी मागितली. माफी मागितल्याने झालेले नुकसान भरून निघणार नाही; मात्र कालांतराने कुटुंबाचा विश्वास पुन्हा मिळवता येईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. हुआंग यांच्या वैयक्तिक वर्तनाबाबत निर्माण झालेला वाद आणि कथित गुप्तचर संबंधांची चौकशी या दोन बाबींचे परिणाम वेगवेगळे असू शकतात. वैयक्तिक चुकीबद्दल माफी मागून विश्वास पुन्हा संपादन करण्याची संधी त्यांना मिळू शकते. मात्र, कंपनीच्या गोपनीय माहितीच्या सुरक्षेबाबत गंभीर निष्कर्ष समोर आल्यास संचालक त्यांच्यावर दीर्घकालीन नेतृत्वाची प्रतिष्ठाही अपुरी ठरू शकते.

दहशतवादाचे आव्हान कायम!

जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी कारवायांचे बदलते स्वरूप भारताच्या अंतर्गत सुरक्षेसमोर गंभीर आव्हान निर्माण करीत आहे. दहशतवाद्यांच्या हल्ल्याच्या पद्धती, त्यांना मिळणारी तांत्रिक मदत आणि सीमापार कार्यरत असलेल्या संघटनांच्या हातचली पाहता सुरक्षा यंत्रणांना सातत्याने आपली रणनीती बदलावी लागत आहे.

सीमेपलीकडून घुसखोरी करून हल्ले करण्याबरोबरच देशांतर्गत संपर्कजाळे तयार करणे, स्थानिक पातळीवर मदत मिळवणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सुरक्षा यंत्रणांना चकवा देणे, अशा अनेक मार्गांचा अवलंब दहशतवादी संघटना करीत आहेत. त्यामुळे दहशतवादीहातीतल लढाईत लष्करी सामर्थ्याइतकेच गुप्तचर यंत्रणांचे कार्य, तांत्रिक सज्जता आणि विविध सुरक्षा संस्थांमधील समन्वय महत्त्वाचा ठरणार आहे. जम्मू-काश्मीरमधील कुलगाम येथे केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या तळावर झालेल्या हल्ल्याने या आव्हानाची तीव्रता पुन्हा अधोरेखित केली आहे. तीन दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात पाच जवान जखमी झाले. सुरक्षा दलांनी तातडीने प्रत्युत्तर दिल्यामुळे हल्लेखोरांना मोठे नुकसान घडवून आणता आले नाही. मात्र, या घटनेतून दहशतवादी संघटनांच्या कार्यपद्धतीबाबत काही महत्त्वाचे संकेत मिळतात. अवघ्या १५ सेकंदांत सुमारे ३० गोळ्या झाडून हल्लेखोरांनी पळ काढल्याचे वृत्त आहे. अत्यंत कमी वेळेत हल्ला करून सुरक्षित ठिकाणी पसार होण्याची ही पद्धत सुरक्षा यंत्रणांसाठी चिंतेचा विषय आहे. दहशतवाद्यांचे मनुष्यबळ कमी झाले असले, तरी त्यांच्या हल्ला करण्याच्या क्षमतेकडे दुर्लक्ष करता येणार नाही. या हल्ल्याची जबाबदारी जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेने स्वीकारल्याचे वृत्त आहे. त्याचबरोबर पाकिस्तानमधील दहशतवादी संघटनांच्या बदलत्या रणनीतीकडेही लक्ष वेधले जात आहे. लष्कर-ए-तोयबाशी संबंधित कारवायांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढत असल्याची माहिती समोर येत आहे. दहशतवादी संघटनांना सीमापार मिळणारे प्रशिक्षण, शस्त्रास्त्रे आणि संपर्कव्यवस्था यामुळे त्यांचे कार्यक्षेत्र अधिक व्यापक होऊ शकते. भारताने दहशतवादी कारवाया करणाऱ्या देशांना जबाबदार धरण्याची भूमिका कठोर केली आहे. त्यामुळे दहशतवादी संघटनांना आपल्या कार्यपद्धतीत बदल करणे भाग पडत आहे. दहशतवादी संघटनेने स्वीकारल्याचे वृत्त आहे. त्याचबरोबर पाकिस्तानमधील दहशतवादी संघटनांच्या बदलत्या रणनीतीकडेही लक्ष वेधले जात आहे. लष्कर-ए-तोयबाशी संबंधित कारवायांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढत असल्याची माहिती समोर येत आहे. दहशतवादी संघटनांना सीमापार मिळणारे प्रशिक्षण, शस्त्रास्त्रे आणि संपर्कव्यवस्था



यामुळे त्यांचे कार्यक्षेत्र अधिक व्यापक होऊ शकते. भारताने दहशतवादी कारवाया करणाऱ्या देशांना जबाबदार धरण्याची भूमिका कठोर केली आहे. त्यामुळे दहशतवादी संघटनांना आपल्या कार्यपद्धतीत बदल करून पुन्हा सक्रिय होण्याचा प्रयत्न करीत असल्याचे या घटनावरून दिसते. विशेषतः मानवरहित हवाई उपकरणे म्हणजेच ड्रोनचा वाढता वापर हे गंभीर आव्हान आहे. ड्रोनच्या साहाय्याने सीमेपलीकडून शस्त्रास्त्रे, दारूगोळा आणि इतर साहित्य पोहोचवणे शक्य होते. त्याचप्रमाणे संवेदनशील ठिकाणांची टेहळणी करणे, सुरक्षा दलांच्या हालचालींची माहिती मिळवणे आणि विशिष्ट लक्ष्यांवर हल्ले करण्यासाठी ड्रोनचा वापर होऊ शकतो, या तंत्रज्ञानामुळे दहशतवाद्यांना प्रत्यक्ष सीमारेषा ओलांडण्याची गरज कमी होते. परिणामी, पारंपरिक सीमा सुरक्षा व्यवस्थेवरोबरच हवाई पाळत आणि ड्रोनविरोधी यंत्रणा अधिक सक्षम करणे आवश्यक बनले आहे. पाकिस्तानने लष्कर-ए-तोयबाशी संबंधित दहशतवाद्यांसाठी ५० हून अधिक विशेष ड्रोनविरोधी पथके तैनात केल्याची माहिती समोर आली आहे. नोव्हेंबरमध्ये आणखी २० पथके सहभागी करण्याची तयारी असल्याचेही सांगण्यात आले आहे. भारतीय ड्रोन आणि लष्करी पाळत यंत्रणांना निष्प्रभ करण्याच्या उद्देशाने ही तयारी सुरू असल्याचा दावा करण्यात येत आहे. दहशतवादी हल्ला झाल्यानंतर प्रत्युत्तर देण्यापेक्षा हल्ल्याची पूर्वकल्पना मिळवून तो रोखणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यासाठी स्थानिक पोलिस, केंद्रीय सुरक्षा दले, लष्कर आणि गुप्तचर संस्थांमध्ये सातत्यपूर्ण माहितीची देवाणघेवाण झाली पाहिजे. संशयास्पद हालचाली, आर्थिक व्यवहार, संपर्कव्यवस्था आणि सीमावर्ती भागातील घडामोडी यांचे एकत्रित विश्लेषण करण्याची

दैनंदिनी

क्षमता वाढवावी लागेल. जम्मू-काश्मीरसारख्या संवेदनशील प्रदेशात स्थानिक नागरिकांचा विश्वास मिळवणेही सुरक्षाव्यवस्थेसाठी अत्यावश्यक आहे. दहशतवादी संघटना अनेकदा स्थानिक परिस्थितीचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी नागरिक आणि सुरक्षा यंत्रणा यांच्यात विश्वासाचे संबंध असतील, तर संशयास्पद हालचालींची माहिती वेळीच मिळू शकते. स्थानिक जनतेला सुरक्षिततेची खात्री देणे, त्यांच्या अडचणी सोडवणे आणि दहशतवाद्यांच्या दबावापासून त्यांचे संरक्षण करणे, या गोष्टींना सुरक्षाविषयक धोरणात प्राधान्य दिले पाहिजे. पाकिस्तानमधील दहशतवादी संघटनांच्या हालचालींवर भारताने आंतरराष्ट्रीय पातळीवरही सातत्याने लक्ष वेधले पाहिजे. सीमापार दहशतवादाला मिळणारी मदत, प्रशिक्षण आणि आर्थिक पाठबळ रोखण्यासाठी राजनैतिक दबाव आवश्यक आहे. त्याचवेळी भारताच्या सीमावर्ती सुरक्षाव्यवस्थेत आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावी वापर करणे गरजेचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचर आधारित पाळत यंत्रणा, ड्रोनविरोधी उपकरणे, प्रगत संवेदक आणि वेगवान माहिती विश्लेषण यांमुळे संभाव्य हल्ल्यांची पूर्वकल्पना मिळण्याची क्षमता वाढू शकते. सुरक्षा यंत्रणांची खरी कसोटी हल्ल्यानंतरच्या कारवाईत नसून हल्ला होण्यापूर्वीच तो रोखण्याच्या क्षमतेत आहे. त्यासाठी सातत्यपूर्ण सतर्कता, आधुनिक तंत्रज्ञान, अचूक गुप्तचर माहिती आणि नागरिकांचा विश्वास या चारही घटकांना समान महत्त्व द्यावे लागेल.

यंदाही देशास फटाक्यांचा मोठा फटका

आगीत अनेकांचा मृत्यू: कोट्यवधीचे नुकसान: प्रदूषणातही कमालीची वाढ

मुंबईत दिवाळीच्या दिवशी एकूण १४२ कॉल अग्निशमन दलास आले. त्यापैकी १३७ आगी फटाक्यांमुळे लागल्याचे अग्निशमन विभागाच्या आकडेवारीत नमूद करण्यात आले. ६ ते ९ नोव्हेंबर या कालावधीत मुंबईत फटाक्यांशी संबंधित सुमारे २०० आगींची नोंद झाली. डोंगरी परिसरात अनेक दुकाने, गॅरेज आणि झोपड्यांना भीषण आग लागली. आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाला नऊ तासांहून अधिक काळ प्रयत्न करावे लागले. कुर्ला येथील सनराइज इस्टेटमधील गोदामाला लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवताना दोन अग्निशमन कर्मचारी जखमी झाले. या दुर्घटनांमुळे मुंबई अग्निशमन दलावर प्रचंड ताण आला. मागील दोन वर्षांच्या तुलनेत यंदा फटाक्यांमुळे लागलेल्या आगींची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. नवी मुंबईत दिवाळीच्या दोन दिवसांत ६२ आगींची नोंद झाली. कल्याण-डोंबिवली परिसरात ७० आगीच्या घटना घडल्या. त्यापैकी ६८ घटना फटाक्यांशी संबंधित होत्या. मीरा-भाईंदरमध्ये तीन दिवसांत १३७ आगींची नोंद झाली. वसई-विरारमध्ये ५५ आगीच्या घटना घडल्या. मुंबई महानगर प्रदेशात जवळपास ३९० आगींच्या घटना नोंदवल्या गेल्याचे वृत्त आहे.



पूर्वीच्या काळी मिळणारे फटाके हे मर्यादित आवाजाचे आणि मर्यादित धुराचे असायचे. आता मात्र फटाक्यांमध्येही नवनवीन प्रकार पाहायला मिळतात. बच्चे कंपनीसह मोठ्यांनी फोडायचे फटाके पूर्वकाळ प्रमाणात बाजारात येऊ लागले आहेत, ज्यामुळे लहानांसोबत तरुण मंडळीही मोठ्या प्रमाणात फटाके फोडताना दिसतात. परिणामी फटाके फोडण्याचे प्रमाण गेल्या काही वर्षांत कमालीचे वाढले आहे. गेल्या काही वर्षांत दिवाळीतील अन्य प्रथांचे महत्त्व कमी होऊन दिवाळी ही केवळ फटाक्यांची दिवाळी झाली आहे. फटाक्यांचे कानठळ्या बसवणारे आवाज, धुराचे लोट, आगीच्या दुर्घटना आणि निष्पाप जीवांची होणारी हानी हे दिवाळीचे विदारक वास्तव बनत चालले आहे.

या घटनांमध्ये काही ठिकाणी इमारती, दुकाने आणि वाहनांचे नुकसान झाले. पुण्यात यंदा फटाक्यांमुळे आग लागण्याच्या प्रमाणात गतवर्षीच्या तुलनेत दुपटीने वाढ झाली. नागपूरमध्ये फटाक्यांमुळे १०० हून अधिक नागरिक जखमी झाले असून त्यापैकी ३५ जणांच्या डोळ्यांना गंभीर दुखापत झाली आहे. धाराशिव जिल्ह्यात घराला लागलेल्या आगीत एका कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. दिल्लीत एका १० वर्षांच्या मुलाच्या पोटात फटाक्यातील रॉकेट घुसून त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. राजस्थानमधील पाली येथील फटाक्यांच्या दुकानाला आग लागून दोघांचा मृत्यू झाला. तामिळनाडूत फटाक्यांच्या कारखान्याला आग लागून २३ कामगारांचा मृत्यू झाला. तर गुजरातमधील कर्णावती येथील एका बेकायदेशीर फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट होऊन ९ कामगारांचा मृत्यू झाला. मध्य प्रदेशातील देवास येथील फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट होऊन तीन कामगारांचा मृत्यू तर २५ जण जखमी झाले.

फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण आणि अपघात लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी महत्त्वपूर्ण निर्बंध घातले आहेत. न्यायालयाच्या या भूमिकेमागे धार्मिक भावना दुखावण्याचा हेतू नसून नागरिकांचे आरोग्य, पर्यावरणाचे संरक्षण आणि सार्वजनिक सुरक्षितता यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न आहे. मात्र, न्यायालयाचे आदेश कागदावर राहून प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी होत नसेल, तर अशा निर्बंधांचा अपेक्षित परिणाम साध्य होणार नाही. दिवाळी खरेतर नातेवाईकांसोबत एकत्र साजरा करण्याचा सण; मात्र फटाक्यांचा जीवघेणा धूर आणि प्रदूषणामुळे अनेकांना श्वसनाचे त्रास सहन करावा लागतो. कुत्रे, मांजरी यांसारखे पाळीव प्राणी, पक्षी यांच्या आरोग्यावरही फटाक्यांचा विपरीत परिणाम होतो त्यामुळे ते भयभीत होऊन सैरावैरा धावू लागतात. भीतीमुळे अनेकदा हे प्राणी आणि पक्षी जीवसुद्धा गमावतात. सोलापूर जिल्ह्यातील चिंचणी नावाचे एक गाव आहे. या गावातील शेतकरी किरण जाधव यांच्या घरी पोमेरेनियन जातीचा भालू नामक पाळीव कुत्रा होता. जाधव यांच्यासह संपूर्ण गावाला भालूचा लळा लागला होता. १० वर्षांपूर्वी दिवाळीत फटाक्यांच्या आवाजाला घाबरून भालूने जीव सोडला.भालूच्या मृत्यूमुळे गावातील ४५० नागरिक हळहळले. भालूच्या मृत्यूमुळे ग्रामस्थांनी गावात फटाके बंदीचा निर्णय घेतला. तेव्हापासून आजपर्यंत दिवाळीच्या काळात गावातील कोणीच फटाके वाजवत नाहीत.परंपरागत पद्धतीनुसार दिवाळी साजरी करतात. भालूच्या स्मृतिप्रीत्यर्थ ग्रामस्थांनी गावात १० हजार झाडे लावली. त्यामुळे एकेकाळी ओसाड असलेले हे गाव आज हिरवळीने बहरले आहे.जी बाब चिंचणीसारख्या छोट्याशा गावातील लोकांच्या लक्षात आली ती शहरातील सुशिक्षित लोकांच्या केव्हा लक्षात येणार ?

वास्तविकतः दिवाळी हा दिव्यांचा सण. तिमिराकडून तेजाकडे जाण्याची शिकवण देणारा सण ; मात्र दिवाळीतील जीवघेण्या फटाक्यांमुळे आपला प्रवास तेजाकडून तिमिराकडे चालला आहे कि काय असे वाटू लागते. फटाक्यांमुळे क्षणिक सुख मिळते मात्र त्यापासून होणारे नुकसान कैकपटीने अधिक असते. केवळ दिवाळीच्या काळात अब्जावधी रुपयांच्या फटाक्यांचा निव्वळ धूर होतो.आज संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळाचा सामना करत आहे. उन्हाळ्यात राज्यात किती भीषण परिस्थिती ओढवेल याची कल्पनाही करता येत नाही. अशा परिस्थिती फटाके फोडण्यात होणारा पैसा हा पाण्याची किंमत जाणणाऱ्या अब्जावधी रुपये खर्च होत असतील तर ते राज्याला नक्कीच परवडणारे नाही. दरवर्षी दिवाळीच्या दरम्यान फटाक्यांमुळे होणारी वित्त आणि जीवित हानी, फटाक्यांच्या बाबतीत न्यायालयाला करावा लागणार हस्तक्षेप, या दिवसांत प्रशासनावर पडणारा अधिक भार या सर्व बाबी लक्षात घेऊन दिवाळीच्या काळात फटाके फोडण्याविषयी आता नागरिकांनीच सारासार विचार करण्याची वेळ आली आहे.

■ जगन घाणेकर

वाचकांचा पत्रव्यवहार

ज्येष्ठ नागरिकांचा वाली कोण?

वयाची सत्तरी ओलांडलेल्या लोकांची दाद कोण घेणार,खासदार,आमदार फोन उचलत नाहीत. डॉक्टर,अंथरुण सोडून जायचे नाही असे सांगतात. कलेक्टर आपला नंबर देत नाहीत. अशा परिस्थितीत आम्ही ज्येष्ठांनी दाद कोणाकडे मागायची? वयोश्री योजनसाठी सरकारने ३००० मंजूर केलेले फॉर्म भरुन घेतले यावाबतीत खास.संजय मंडलिक यांनी आवाज उठवला.पण तेही दुधाचे पुराने थंड बसले. अजूनही मंजूर पैसे खात्यावर नाहीत.काहीजणांच्या रकमा आलेल्या आहेत. पण अनेकांना न्याय मिळाला नाही.

■ गुरुनाथ म्हातुकडे,इचलकरंजी

अलीकडे भारतीय विद्यार्थ्यांचा परदेशी शिक्षणाचा ओघ ओसरला

गेल्या काही वर्षातील ट्रेंड पाहता भारतीय विद्यार्थी शिक्षणासाठी परदेशी कमी प्रमाणात जाऊ लागलेत असे दिसते. केंद्रीय मंत्रालयाने याबाबतीत एक आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २०२३ मध्ये ९.०८ लाख एवढी होती.ही संख्या घटून २०२४ मध्ये ७.७० लाख झाली.२०२५मध्येही संख्या ६.२६ लाखावर आली. केवळ दोन वर्षात २.८२ लाखांनी विद्यार्थ्यांची संख्या घटली याला अनेक कारणीभूत आहेत . अमेरिका व इराण ,तसेच युक्रेन व रशिया यांच्यातील युद्ध,अनेक देशांच्या विझ्या नियमामध्ये बदल,शिक्षणानंतर अनेक देशांनी नोकरीवर मर्यादा घातल्या आहेत.वाढता खर्च ही काही कारणे आहेत.आता अनेक विदेशी विद्यापीठांनी भारतात प्रवेश केला आहे.आता देशातील परिस्थिती सुधारली आहे. देशातील अनेक संस्थांचा विस्तार झालेला आहे.त्यामुळे विद्यार्थ्यांना विदेशात न जाता देशातच उच्च शिक्षण मिळू लागले आहे.

■ शांताराम वाघ

कोल्हापूरचा संघर्ष मोर्चा काँग्रेसला बळ देणारा

गोकुळमधील सत्ता बळकावण्यासाठी महायुतीने केलेल्या कुटील राजनीती विरोधात स्वाभिमानी दूध उत्पादक, शेतकरी आणि जनतेचा महामोर्चा काँग्रेसचे विधानपरिषद गटनेते सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखाली सकाराच्या विरोधात धडकी भरवणारा ठरला आहे. बंटी पाटील यांच्याकडे बहुमत असताना कोरमचा मुद्दा पुढे करुन सत्ता स्थापनेला महायुतीने अर्थात सरकारने सुरुंग लावून गोकुळची सत्ता हस्तगत केली आणि आपलाच अध्यक्ष बनविला. याच अनुषंगाने ९ नोव्हेंबर रोजी कोल्हापुरात विराट मोर्चा निघाला. तो निश्चितच काँग्रेस पक्षाला बळ देणारा ठरला आहे.महायुती सरकारने घेतलेला चुकीचा निर्णय कोणाला पचनी पडलेला नाही. त्यामुळे आगामी काळात पश्चिम महाराष्ट्रासह संपूर्ण राज्यात याचे पडसाद उमटणार आहेत. बंटी पाटील यांनी मोर्चातून सगळ्यांना विशेष करुन विरोधकांना दाखवून दिले आहे की, आगामी निवडणूक सोपी राहिलेली नाही. बंटींनी २९ मधील विधानसभेची साखर पेरणी केली आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. ठरल्याप्रमाणे १० नोव्हेंबर रोजी संपूर्ण प्रक्रिया पार पडली असली तरी अंतिम निकाल हा न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहिल असे न्यायालयाने म्हटले आहे त्यामुळे २५ नोव्हेंबरच्या निर्णयाकडे संपूर्ण राज्यासह राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांचे लक्ष लागले आहे.


■ राजू जाधव,मांगूर

कोल्हापूर पर्यटनात अव्वल

कोल्हापूर शहर व जिल्हा देशात पर्यटनात नेहमी अग्रेसर राहिला आहे.दक्षिण काशी म्हणून करवीर नगरी प्रसिद्ध आहे. तसेच जोतिबा,राधानगरी,दाजीपूर,आदमापूर, खिद्रापूर,नृसिंहवाडी, रामलिंग, बाहुबली, टोप,कणेरी मठ, आंबा, विशाळगड,पन्हाळगड, गगनबावडा, शाहवाडी, गडहिंग्लज,चंदगड इत्यादी पर्यटन स्थळ गर्दीने नेहमी फुललेले असतात. पर्यटन वाढीमुळे स्थानिक रोजगार वाढत आहे. त्यामुळे इतर पायाभूत सुविधा पर्यटकांना सेवा सवलती सोयी,यांची देखील दखल घेतली पाहिजे.

■ प्रशांत शहापूरे,जयसिंगपूर

दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)



शुक्रवार,ता.१३.११.२०२६,विक्रमसंवत २०८३,शिवशक ३५३, शालिवहन शके १९४८,पराभव नाम संवत्सरे, दक्षिणायणे, शरद ऋतो,कार्तिक मासे,शुक्ल पक्षे,चतुर्थी तिथी,२०.४३ नंतर पंचमी तिथी, मूळ नक्षत्र,१७.१७ नंतर पूर्वाषाढा नक्षत्र, धनु रास,धृति योग, २९.२३ नंतर शुल योग, वणिज करण,७.२५ नंतर विष्टी करण २०.४३ पर्वत, दिनमान ११.१५, सुर्योदय ६.४०, सुर्यास्त १७.५५ (कोल्हापूरचे) राहू काळ सकाळी १०.३० ते १२, विनायक चतुर्थी, दुर्वा गणपतीव्रत, भद्रा ७.२५ ते २०.४३.

ज्योःकेशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९

* राशीभविष्य *

मेष–घराच्या दृष्टीने केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरेल. व्यावसायिक स्तरावर जबाबदारीत वाढ होण्याची शक्यता. आपल्या वाटेत येणाऱ्या सर्वांशी अत्यंत नम्र, सौम्य आणि आकर्षकपणे वागा.

वृषभ–जे लोक बऱ्याच काळापासून आर्थिक तंगीमधून जात आहेत. त्यांना आज कुठून तरी धन प्राप्त होऊ शकते त्यामुळे जीवनाच्या बऱ्याच समस्या दूर होतील.तुमच्या पेक्षा कमी अनुभवी व्यक्तींबाबत धीर धरा.

मिथुन–कामाच्या ठिकाणी लोकांशी वागताना सावध रहा. हुशारी आणि संयम ध्यानात ठेवा.नशिबावर हवाला ठेवून न राहता, आपलं आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न करा.

कर्क–इतरांना मदत करण्यासाठी आपला वेळ आणि शक्ती खर्च करा, पण आपला काहीही संबंध नसताना इतरांच्या कामात लुडबुड करु नका.

सिंह–मुलांच्याबाबतीत सहनशीलता बाळगा. तुम्हाला आता तुमच्या कल्पनांची स्वप्ने पाहण्याची रात्र नाही, आज त्या कदाचित प्रत्यक्षात येणार आहेत.

कन्या–प्रवास केल्याने ताबडतोब निकाल मिळणार नाहीत परंतु त्यामुळे भविष्यातील चांगला नफा मिळेल.घराच्या दृष्टीने केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरेल.

तुळ–तुमची मुलं तुमच्या अपेक्षांवर पुरेपूर उतरल्याने तुमची स्वप्ने सत्यात उतरल्याची प्रचिती मिळेल.मुलांच्या बक्षिस समारंभाचे आमंत्रण हे तुमच्या आनंदाचे कारण ठरू शकते.

वृश्चिक–तुमची संवाद कौशल्ये आणि कामातील कौशल्ये प्रभावी ठरू शकतील. वादविवाद, इतरांमधील दोष शोधत राहणे टाळा.तुमच्या मेहनतीचे योग्य फळ तुम्हाला मिळेल.

धनु–काही जणांसाठी प्रवास केल्याने थकून जाल आणि तणाव वाढला तरी आर्थिकदृष्ट्या फायद्यात राहाल. आपल्या खाजगी आयुष्याबद्दल मित्र चांगला सल्ला देतील.

मकर–तुम्हाला भेडसावणारे गंभीर विषय हाताळण्यासाठी तुमचे बऱ्डया व्यक्तींशी असलेले संपर्क वापरा.आज तुमचे भाऊ बहीण तुमच्याकडून आर्थिक मदत मागू शकतात.

कुंभ–लोकांना वेळ देण्यापेक्षा स्वतःला वेळ द्या. तुमच्या अपेक्षेप्रमाणे काम न केल्यामुळे हाताखालच्या सहकाऱ्यांवर तुम्ही वैतागाल.

मीन–तुमच्या बुद्धिमत्तेचा वापर करून तुमच्या संकल्पना इतरांना पटविण्यात तुम्ही यशस्वी होऊ शकाल.अल्प परिचित लोकांशी तुमच्या खाजगी गोष्टी बोलू नका.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णजी दत्तवाडे यांनी तरुण आर्ट्स् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मॅचेस्टर भवन' ४४४/२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६०ं , पुणे - दूरध्वनी २४४९९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६३ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५.५* कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१* , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायदानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

'हालशुगर'कडून प्रतिटन ३७७० रु. पहिली उचल राज्यात पाच लाखावर बीपीएल रेशनकार्ड संशयास्पद

अण्णासाहेब जोल्ले; साखर दराच्या निश्चितीनुसार वाढीव दर देण्यासाठी कटिबद्ध

निपाणी,ता.१२(प्रतिनिधी)-

हालसिद्धनाथ को.ऑप शुगर फॅक्टरी सध्या प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे. कारखान्याची साखर उत्पादन क्षमता वाढवण्याबरोबर साखर उत्पादनाचा खर्च कमी करण्याच्या उद्देशाने विविध उपाययोजना राबवल्या जात असून उपाययोजना यशस्वी देखील ठरत आहेत.



यंदा परिसरात ऊस उत्पादन घटले आहे. यामुळे जास गाळप हंगाम ७० ते ८० दिवसांचा होईल असा अंदाज व्यक्त केला जात आहे.उपलब्ध दिवसांमध्ये कारखान्याचे गाळप उद्दिष्ट गाठण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवली आहे.ऊस उत्पादक शेतकरी व सभासदांचे हित लक्षात घेता यंदा कारखान्याकडून उसाला ३७७० रु. इतकी पहिली उचल दिली जाणार आहे. साखर उतारा आणि साखर दराच्या निश्चितीनुसार वाढीव दर देण्यासाठी कारखाना कटिबद्ध आहे.यासाठी अधिकाधिक ऊस उत्पादक शेतकरी व सभासदांनी कारखान्याला ऊस पाठवावा, असे आवाहन माजी खासदार, बेळगाव जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष तथा कारखान्याचे मार्गदर्शक अण्णासाहेब जोल्ले यांनी केले.

कारखाना कार्यस्थळी दीपावली पाडव्याचे औचित्य साधून श्री हालसिद्धनाथांचे पूजन व नव्या एफएफए तंत्रज्ञान युनिटचे पूजन मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. यानंतर कारखाना सभागृहात आयोजित पत्रकार बैठकीत ते बोलत होते. अण्णासाहेब जोल्ले पुढे म्हणाले,पहिली उचल ३७७० दिल्यानंतर गाळप हंगाम पूर्ण होताच कारखान्याचा साखर उतारा ११.५०% पेक्षा अधिक राहिल्यास प्रति टन शंभर रुपये अधिकचे दिले जाणार आहेत. येणाऱ्या वर्षभरात साखरेचा भाव सरासरी ५० रुपये पेक्षा अधिक राहिल्यास प्रति टन २०० रुपये, साखरेचा भाव सरासरी ५५ रुपये पेक्षा अधिक राहिल्यास प्रति टन ४०० रुपये तर साखरेचा भाव सरासरी ६० रुपयांपेक्षा अधिक राहिल्यास प्रति टन ६०० रुपये अधिकचे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिले जाणार आहेत.

कारखान्याच्या माध्यमातून वीज उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी आणि वीज उत्पादनाचा खर्च कमी करण्यासाठी नवे तंत्रज्ञान बसविले आहे याचा फायदा कारखान्याला होत आहे. एफएफए नव्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून साखर उत्पादन क्षमता वाढण्यास मदत होणार आहे त्याचबरोबर उत्पादन खर्च देखील कमी होणार आहे.येणारे दिवसात कारखान्याच्या माध्यमातून सल्फर मुक्त साखर उत्पादन करण्यासाठी नियोजन केले जात आहे. इथेनॉल निर्मितीसाठी पूर्वी कोल व बगॅसचा वापर केला जायचा पण कोलचा दर वाढल्याने उत्पादन खर्च वाढत होता हे लक्षात घेऊन फक्त बगॅसचा वापर करून इथेनॉल निर्मितीचे तंत्रज्ञान वापरले गेले आहे यामुळे इथेनॉल उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होत आहे, असे सांगितले.

यावेळी अध्यक्ष जयकुमार खोत, माजी उपनगराध्यक्ष सुनील पाटील, जयवंत भाटले, राजू गुदेशा, रावसाहेब पवाडे, सुहास गुगे,सुदर्शन मुरावडे, ग्रामीण भाजपा अध्यक्ष बाळासाहेब कदम यांच्यासह मान्यवर व अधिकारी उपस्थित होते.

केंद्र सरकारकडून अपात्र कार्डांची यादी जाहीर;लाभार्थ्यांमध्ये धास्ती

निपाणी,ता.१२(प्रतिनिधी)-

केंद्र सरकारने राज्यातील पाच लाखांहून अधिक संशयास्पद बीपीएल रेशन कार्डांची माहिती जाहीर केल्याने संबंधित कार्डधारकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या संशयास्पद कार्डांची पडताळणी करून अपात्र कार्डे रद्द करण्याची शक्यता व्यक्त होत आहे. यामध्ये बेळगाव जिल्ह्यातील काही बीपीएल रेशन कार्डधारकांचाही समावेश असण्याची शक्यता असल्याने जिल्ह्यातील लाभार्थ्यांमध्ये धास्ती निर्माण झाली आहे.



संग्रहित

केंद्र सरकार राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील पारदर्शकता वाढविण्यासाठी रेशन कार्डांची पडताळणी केली जात आहे.सरकारी योजनांचा लाभ केवळ पात्र लाभार्थ्यांनाच मिळावा तसेच अपात्र व्यक्तींकडून बीपीएल कार्डांचा गैरवापर होऊ नये, या उद्देशाने संशयास्पद कार्डांची माहिती तपासली जात आहे.या प्रक्रियेत उत्पन्न, सरकारी नोकरी, मालमत्ता आणि अन्य निकषांच्या आधारे पात्रतेची पडताळणी होण्याची शक्यता आहे.राज्यात पाच लाखांहून अधिक बीपीएल रेशन कार्डे संशयास्पद असल्याची माहिती समोर आल्याने या कार्डांचे भवितव्य काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

बेळगाव जिल्ह्यातही मोठ्या संख्येने बीपीएल कार्डधारक असून, पडताळणी प्रक्रियेत जिल्ह्यातील लाभार्थ्यांचीही तपासणी होण्याची शक्यता आहे. बीपीएल रेशन कार्ड हे केवळ स्वस्त धान्य मिळविण्याचे साधन नसून अनेक कुटुंबांसाठी विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्याचा महत्त्वाचा आधार आहे.अनधान्यावरीलरच आरोग्यविषयक सुविधा आणि अन्य शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठीही या कार्डाचा उपयोग केला जातो. त्यामुळे एखाद्या कुटुंबाचे बीपीएल कार्ड रद्द झाल्यास त्याच्यासमोर अनेक अडचणी निर्माण होण्याची भीती आहे.

दरम्यान, संशयास्पद म्हणून नोंद झालेल्या सर्व कार्डधारकांना अपात्र ठरविण्यात येणार की त्यांना कागदपत्रांच्या आधारे आपली पात्रता सिद्ध करण्याची संधी दिली जाणार, याबाबत स्पष्टता आवश्यक आहे. केवळ संशयाच्या आधारे पात्र गरीब कुटुंबांची रेशन कार्डे रद्द होऊ नयेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. सरकारने अपात्र लाभार्थ्यांवर कारवाई करताना खऱ्या गरजू कुटुंबांवर अन्याय होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. पडताळणी प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवून पात्र लाभार्थ्यांना आपली बाजू मांडण्याची संधी द्यावी, अशी मागणी होत आहे.

निपाणीत बळीराजाच्या प्रतिमेचे पूजन

निपाणी,ता.१२(प्रतिनिधी)-

येथील मध्यवर्ती श्री शिवाजी महाराज चौक येथे बलिप्रतिपदे निमित्ताने बळीराजाच्या प्रतिमेचे पूजन दिलीप जाधव यांचे हस्ते करण्यात आले.

बळीराजाला जमिनीत गाडणारा वामन आजही अस्तित्वात असून तो अजूनही आपले कार्य करत आहे.वामनाने बळीराजाचा बळी घेताना, छ. शिवाजी महाराजांच्या राज्यापेक्षा विशेष काही झाला नाही तेव्हा रयत गप्प बसली त्यामुळे वामनाला जोर चढला, त्याला वेळेत रोखायला हवे होते.



आज घराघरात बलिप्रतिपदा साजरी केली जाते, घरातील स्त्रिया ईडापीडा टळो,बळीचे राज्य येवो म्हणतात पण बळी कोण होता आणि त्याचे कार्य काय हे त्यांना माहीत नाही.ते स्त्रियांना समजले तरच पुढच्या पिढीला समजणार आहे. बळीराजा सामुदायिक शेतीचा संस्थापक होता, त्यांनी सोळा हजार स्त्रियांना एकत्र करून शेती संकल्पना रुजवली होती, असे मत अँड.सुर्याजी पोटले, सुधाकर नाने,प्रा.शिवाजी मोरे यांनी व्यक्त केले.याप्रसंगी सुधाकर सोनाळकर, सतिश काराळे, चंदन भोपे, अरुण आवळेकर, उदय शिंदे, प्रविण पोवार, सुनील पांगारे, विनोद साळुंखे उपस्थित होते.

आदमापूरात दीपावली पाडवा कार्यक्रम उत्साहात

मु.तिट्टा,ता.१२(प्रतिनिधी)-

श्री क्षेत्र आदमापूर (ता.भुदरगड) येथे बलिप्रतिपदेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.या दिवशी देशभरात 'दीपावली पाडवा' हा सण साजरा होत असून श्री क्षेत्र आदमापूर येथील संत बाळूमामांच्या पुण्यभूमीत महाराष्ट्र,कर्नाटक, आंध्र, कोकण, गोवासह अन्य राज्यातून असंख्य भाविकांच्या उपस्थितीत भक्तीमय वातावरणात 'बलिप्रतिपदेचा सण' विविध धार्मिक कार्यक्रमांनी संपन्न झाला.



आदमापूर येथे लेंढी पुजन प्रसंगी धैर्यशील भोसले व भावीक भक्त.

क्षेत्र आदमापूर (ता.भुदरगड) येथील सदगुरु बाळुमामांचा हा 'दीपावली उत्सव' प्रतिवर्षी बलिप्रतिपदेनिमित्त आदमापूर येथील मरगुबाई मंदीरापेजारी असलेल्या बाळुमामांच्या बकऱ्यांच्या तळावर मोठ्या धार्मिक वातावरणात संपन्न झाला.या ठिकाणी महिला भक्तजनांनी बाळुमामांच्या ओव्यांच्या गायनाने ५०० चुलीवर पाडव्याचा आदल्या रात्री पुरणपोळ्या केल्या तर धनगर समाजबांधवांनी ढोल-कैताळांच्या तालावर धनगरी गीते गाऊन रात्र जागवली.

बाळुमामा देवस्थान समितीचे अध्यक्ष धैर्यशील भोसले यांच्या हस्ते बाळुमामा मंदिरातून ढोल-कैताळांच्या निनादात भावभक्तीचा भंडारा आणण्यात आला.यावेळी विविध जातीधर्मातून आलेल्या भाविक भक्तांनी दिपावलीचा फराळ एकत्र करुन प्रसाद करण्यात आला. या उत्सवानिमित्त मरगुबाई मंदीर परिसरात बाळुमामांच्या बकऱ्यांच्या लेंढ्यांची रास करुन राशीला ऊस, कर्टळ,केळी उभी करुन विविध रंगाच्या फुलांच्या माळांनी सजवून या राशीची प्रथम बाळुमामा देवस्थानचे अध्यक्ष धैर्यशील भोसले यांनी मनोभावे पूजा केली.लेंढ्यांच्या राशीजवळच एका मातीच्या मडक्यात शेळ्या-मेंढ्यांचे दूध संकलित करुन ते विस्तवावर ठेवले जाते.दूध ऊतू जाण्याची प्रथा या ठिकाणी पारंपरिक पद्धतीने जोपासली गेली.गतवर्षीप्रमाणे याही वर्षी उत्तर दिशेला दूध ऊतू गेल्याने उत्तर बाजूकडील भाग 'सुजलाम् सुफलाम्' होईल, असे संकेत देण्यात आले.

यावेळी 'बकरी भुजविणेचा' कार्यक्रम संपन्न झाला. लगेचच कळपातीलच काही बकऱ्यांचे पुजन करुन त्यांना हार-तुऱ्यांनी सजवून त्यांच्या पाठीमागे ढोल-कैताळ वाजवुन,फटाक्यांची आतषबाजी व भंडाऱ्याची मुक्तहस्ते उधळण करुन त्यांना पळविण्यात आले.यानंतर हजारो भाविक-भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.या उत्सवाप्रसंगी धैर्यशील भोसले, भाकणुककार कृष्णात डोणे, नागपाा मिरजे, देवस्थानचे सर्व पदाधिकारी, कर्मचारी, भुदरगड पोलिस, आरोग्य कर्मचारी,सर्व सेवक, भक्त व ग्रामस्थ या सर्वांच्या सहकार्याने दिपावली उत्सव पार पडला.



निपाणीः म.बसवेश्वर संस्थेत प्रतिमापूजनप्रसंगी संस्थापक चेअरमन डॉ.सी.बी.कुरबेट्टी,चेअरमन किशोर बाली व इतर.

म.बसवेश्वर संस्थेत दीपावली पाडवा सण उत्साहात साजरा

निपाणी,ता.१२(प्रतिनिधी)-

सहकार क्षेत्रातील अग्रेसर असलेल्या श्री म.बसवेश्वर क्रेडिट सौहार्द सहकारी नियमित निपाणीच्या वतीने दीपावली पाडवा हा भारतीय पारंपरिक सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रारंभी संस्थेचे सहकारस्तर संस्थापक चेअरमन व विद्यमान व्हा.चेअरमन डॉ.सी.बी.कुरबेट्टी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. चेअरमन किशोर बाली यांच्या हस्ते श्रीफळ वाढविण्यात आले.कर्मचारी सिद्धेश्वर स्वामी यांनी धार्मिक मंत्र स्तोत्र व श्री गणेशाची व श्री महालक्ष्मीची आराधना करण्यात आली.एकमेकांना दीपावली पाडव्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या.कार्यक्रमास संचालक डॉ.एस.आर.पाटील, श्रीकांत परमने, प्रताप पडनशेट्टी, महेश बागेवाडी, सुरेश शेट्टी, अशोक लिंगाडे, दिनेश पाटील, राजेश पाटील, संचालिका पुष्पा कुरबेट्टी,विजया शेट्टी, सुवर्णा पडणशेट्टी, सीईओ एस.के.अदनावर, महेश शेट्टी, भद्रेस फुटाणे, विद्या कमते, सुरज घोडके, महादेव बडगीर, चंद्रकांत हंबर, सुजाता जाधव, वरिष्ठ अधिकारी राजेंद्र मगदूम, सुरेश आवटे,निलेश चौगुले, संनमती भिकनावर,गजानन कमते,पूजा गुमटनावर, विजय नागराळे,उमाशंकर गुडीमणी, पूजा इंगळे,आदर्श माने, प्रसाद भिवशे, चेतन मरीगुद्धी, अनुप शिंदे, आदर्श माने व कर्मचारी उपस्थित होते.

अरिहंत शुगर चार हजार रु.दर देणार

चेअरमन अभिनंदन पाटील

बोरगाव,ता.१२(प्रतिनिधी)-

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत अरिहंत उद्योग समूहातील जैनापूर येथील अरिहंत शुगर इंडस्ट्रीजकडून यंदाच्या गळीत हंगामासाठी प्रति टनास ४००० रुपये दर देणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन अभिनंदन पाटील यांनी दिली.



दिवाळी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर शेतकऱ्यांच्या जीवनात गोडवा यावा या उद्देशाने बोरगाव येथे आयोजित पत्रकार बैठकीत बोलताना ते म्हणाले, सन २०२६-२७ च्या गळीत हंगामासाठी प्रतिटन उसाला एकूण ४००० रुपये दर देण्यात येणार आहे,यामध्ये पहिल्या टप्प्यात पहिली उचल ३७५०, दुसरी उचल हंगाम समाप्तीस ५० रुपये तसेच सन २०२६-२७ च्या गळीत हंगामात उत्पादित साखरेच्या विक्रीच्या सरासरी प्रति ५० रुपये पेक्षा अधिक झाल्यास पुढील गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वी प्रतिटन २०० रुपये अतिरिक्त देण्यात येणार आहे.जैनापूर अरिहंत शुगरचे कोणतेही बायो प्रॉडक्ट नसताना जिल्ह्यात सर्वाधिक उच्चांकी दर आपण दिले आहे.शेतकऱ्यांच्या हितासाठी नेहमीच प्राधान्य देत अरिहंत उद्योग समूहाकडून त्यांच्या आर्थिक विकासासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.गेल्या सात वर्षात सर्वच गाळप यशस्वी करीत उच्च प्रतीचे साखर निर्मितीत कारखाना अग्रेसर बनले आहे.आज या साखर कारखान्याकडून शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचा विचार करून घेतलेला हा निर्णय ऊस उत्पादक व शेतकऱ्यांसाठी निश्चितच दिलासादायक असणार आहे.वाढते उत्पादन खर्च, मजुरी, खते, औषधे आणि शेतीच्या मशागतीचा खर्च लक्षात घेता जाहीर केलेला दर हा शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरणार असल्याचे शेवटी अभिनंदन पाटील यांनी सांगितले.

पत्रकार बैठकीस संचालक उत्तम पाटील, पृथ्वीराज पाटील कारखान्याचे सीईओ महावीर पाटील,जी.एम.किशोर इनामदार, जनरल मॅनेजर आप्पासाहेब केरते, सुधीर पाटील, रोहित कठोरी, धनंजय मोरे बलवान यांच्यासह कारखान्याचे पदाधिकारी उपस्थित होते.

आप्पाचीवाडीतील किल्ला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

कोगनोळी,ता.१२(प्रतिनिधी)-

आप्पाचीवाडी (ता. निपाणी) येथील बसवज्योती युथ फाऊंडेशन व सह्याद्री फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या किल्ला बांधणी स्पर्धेमध्ये आप्पाचीवाडी येथील श्रीवर्धन कांबळे व ग्रुप यांनी बनविलेल्या सुधागड या किल्ल्याच्या प्रतिकृतीला प्रथम क्रमांक मिळाला. त्यांना रोख रक्कम, शिल्ड व मानाचा हिरोजी इंदुलकर पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले.



आप्पाचीवाडी येथे किल्ला स्पर्धेच्या बक्षीस वितरणप्रसंगी रणजित माने,शशिकांत पोटले, संदीप माने,सिद्धेश्वर गवंडी व इतर मान्यवर.

हदनाळ येथील वाघाची तालीम यांनी बनविलेल्या सिंहगड किल्ल्याच्या प्रतिकृतीला द्वितीय तर सुळगाव येथील शिवप्रेमी ग्रुप यांनी बनविलेल्या अजिंक्यतारा किल्ल्याच्या प्रतिकृतीला तृतीय क्रमांक मिळाला. त्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व शिल्ड देऊन सन्मानित करण्यात आले.या स्पर्धेसाठी संदीप माने, वैभव वंजोळे, शिवाजी माने आदींनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रारंभी रणजित माने यांनी स्वागत तर संदीप माने यांनी प्रास्ताविक केले.याप्रसंगी शशिकांत पोटले यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी सयाजी माने, कृष्णात माळी,ए.जी.माने, बाबासाहेब पुजारी, संभाजी माने, नटराज गारगोटे, सुधाकर माने, विनोद पोटले, संतोष माने, शाह जाधव, युवराज माने, प्रशांत कुंभार, पृथ्वीराज माने, आनंदा कुवाळे, हरी पुजारी, अरुण कांबळे, सुनिल नुले, पोपट लोहार आदी मान्यवरांसह गावातील तरुण मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. सिद्धेश्वर गवंडी यांनी आभार मानले.

संकेश्वरात पालखी सोहळा उत्साहात

संकेश्वर,ता.१२(प्रतिनिधी)-

संकेश्वरात दीपावली पाडव्याला परंपरागत पद्धतीने श्री शंकरलिंग, श्री दुरुंदुडीश्वर, श्री बिरदेव आणि श्री बिरेश्वर देवाचा पालखी सोहळा भक्तीमय वातावरणात पार पडला.

संकेश्वरात पालखी उत्सवाने लक्ष्मी पूजन उतरविण्याची प्रथा व्यापारी व व्यावसायिकांनी कायम केली.वंदा रविवार व सोमवार असे दोन दिवस लक्ष्मीपूजन करण्यात आले.घरोघरी तसेच गावात सर्वत्र रविवारच्या शुभमुहूर्तावर लक्ष्मीपूजन करण्यात आले.कांही व्यापारी व व्यावसायिकांनी सोमवारी लक्ष्मीपूजन केले.रविवारी लक्ष्मीपूजन केलेल्या व्यापारी व्यावसायिकांना लक्ष्मीपूजन दोन दिवस ठेवावे लागले.येथील श्री शंकराचार्य संस्थान मनापासून श्री शंकरलिंग,श्री दुरुंदुडीश्वर,श्री बिरदेव आणि श्री बिरेश्वर देवाचा पालखी सोहळा भक्तीमय वातावरणात निघाला.श्री शंकराचार्य संस्थान मठाचा पानविडा श्रीफळ पादुगडी श्री महादेव मंदिरास अर्पण करून पालखी उत्सवाची सुरुवात करण्यात आली.गावातील प्रमुख मार्गे सवाद्य समवेत निघालेल्या पालखी सोहळ्याचे नागरिकांनी महिलांनी व्यापारी व व्यावसायिकांनी भक्तीभावाने स्वागत करुन देवदर्शनचा लाभ घेतला. पालखी सोहळा मार्गस्थ झाल्यानंतर व्यापारी व व्यावसायिकांनी महालक्ष्मी पूजन उतरवून पालखी उत्सवाची परंपरा कायम केली.

बेडकीहाळ येथे श्री कल्याण सिद्धेश्वरांचा पालखी सोहळा संपन्न

बेडकिहाळ,ता.१२(वार्ताहर)-

येथील ग्रामदैवत श्री कल्याण सिद्धेश्वरांचा दीपावलीचा पालखी सोहळा संपन्न झाला.श्रींची पालखी मिरवणूक मंदिरातून प्रारंभ झाली. पालखीवर भाविकांच्यावतीने मेवा मिठाई व खोबरे उधळले तर मार्गावर झेंडू फुलांचा सडा टाकण्यात येत होता.युवक मंडळाच्यावतीने पालखी मार्गावर पाणी शिंपडण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

पालखी गुजरी कट्टा, जुने बसस्थानक, नदी वेस छ.संभाजी नगर, मार्गे, दूधगंगा नदीवर गेल्यानंतर येथे श्री विठ्ठल बिरदेव पालखीची भेट झाली.येथे चांगभलंच्या गजरात सोने लुटण्यात आले.तेथून पालखी शांतीनगर कट्ट्यावर आल्या नंतर येथे परिसरातील व शमनेवाडी येथील भाविकांनी दर्शन घेतले.त्यानंतर मैदान कट्टा, मार्गे पालखी डवरी कट्टा, येथे विसावल्या नंतर इनामदार वाड्यात आल्यानंतर पूजा आरती महापूजा नैवेद्य करण्यात आले.येथे विजयराव इनामदार (सरकार) यांच्यावतीने पालखी मानकऱ्यांना पान विडा देण्यात आले.त्यानंतर रात्री पालखी मिरवणूक दसरा चौक,बाजारपेठ मार्गे श्री सिद्धेश्वर बँड वाद्याच्या,कर्डी वाद्याच्या गजरात सकाळी सात वाजता मंदिरात गेल्यानंतर, पालखी मानकऱ्यांना पान विडा प्रसाद देण्यात आल्या नंतर दिपावली पालखी सोहळ्याची सांगता झाली.

निधन वार्ता

दत्तू मेथे

कोगनोळी,ता.१२(प्रतिनिधी)-

आप्पाचीवाडी (ता.निपाणी) येथील रहिवाशी दत्तू जानू मेथे (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे.त्यांच्या निधनाने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.



गणपती पाटील

चांदोली,ता.१२(वार्ताहर)-

मणदूर (ता. शिराळा) येथील गणपती कृष्णा पाटील (वय ११०) यांचे निधन झाले.त्यांच्या पश्चात मुले, नातू, पतवंडे असा परिवार आहे.त्यांच्या निधनाने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.



डॉ.कृष्णाजी मसुरकर यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

पट्टणकोडोली,ता.१२(प्रतिनिधी)-

अलाटवाडी (ता.हातकणंगले) येथील समाजप्रिय व्यक्तीमत्व, पट्टणकोडोली नगरीचे माजी उपसरपंच व शिवसेनेचे हातकणंगले तालुका प्रमुख डॉ.कृष्णाजी आनंदराव मसुरकर यांचा ४० वा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

पट्टणकोडोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णांना फळे वाटप अंकुश आडके, भरत ताकमारे,विशाल जाधव, गजानन कुडाळकर, ओंकार चौगुले आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले तर मिशिरगाव येथील आई वृद्धाश्रमातील अनाथांना जीवनावश्यक साहित्यांचे वितरण वैभव हराळे, आदित्य जाधव, सौरभ हराळे, विरेन मसुरकर, कार्तिक जाधव, शौर्य मसुरकर यांच्या हस्ते करण्यात आले.



पट्टणकोडोली येथे डॉ.कृष्णाजी मसुरकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना खास.धैर्यशील माने शेजारी माजी सरपंच खाना अवडे,झाकीर भालदार व इतर प्रमुख मान्यवर.

यावेळी डॉ.कृष्णाजी मसुरकर युवाशक्ती व मसुरकर प्रेमी नागरिक यांच्या संयुक्त विद्यमाने मसुरकर यांचा केक कापून व यथोचित सत्कार करुन वाढदिवस साजरा करण्यात आला.डॉ.कृष्णाजी मसुरकर यांना शुभेच्छा देण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सकाळपासूनच हजेरी लावली होती.

खासदार धैर्यशील माने, हुपरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सत्यवान हाके, उद्योजक राहुल सावंत, शिवसेना उपजिल्हाप्रमुख विकास माने, संजय गांधी निराधार योजना समितीचे माजी अध्यक्ष झाकीर भालदार, रुकडी जिल्हा परिषद सदस्य आतिष शिंगे, लाडकी बहिण योजनेचे तालुकाध्यक्ष अविनाश बनगे, मिरज विधानसभा भाजपा संयोजक मितेश पवार, वकील शाह् काटकर, उद्योजक संदीप कारंडे, चंद्रकांत मांगलेकर, अमर पाटील, आर्यन वाघमोडे, सचिन दरेकर, संदीप चेचरे, शिवराज पाटील, राहुल ससे,अमोल पालकर, किसन तिरपणकर, बजरंग दलाचे अनिकेत तानुगडे, युवासेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, विनायक यादव, चंदू युवासेनेचे शहरप्रमुख ओंकार पाटील, शिरोली शहरप्रमुख प्रमोद पाटील, रेंदाळ शहरप्रमुख शरद पाटील, इंगळी शहरप्रमुख प्रविण चव्हाण, पट्टणकोडोली शहरप्रमुख शिवानंद पण्दे, डॉ.ऋतुराज हुपरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मसुरकर यांना प्रत्यक्ष भेटून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

आर.डी.सामंत कन्ट्रक्शनचे प्रमुख रविंद्र सामंत, माजी आमदार डॉ.सुजित मिणचेकर, युवा नेत्या अपूर्वा सामंत, शिवसेना जिल्हाप्रमुख रविंद्र माने, भाजपा जिल्हाध्यक्ष राजवर्धन निंबाळकर, कोल्हापूरचे नगरसेवक सत्यजित कदम, केडीसीसी बँकेचे संचालक विजयसिंह माने, उद्योजक संतोष मालानी, निलेश कुलकर्णी, संदेश खोत, धनंजय टारे, मनसे तालुकाध्यक्ष वैभव भोसले, पट्टणकोडोली नगरीचे माजी उपसरपंच धुळगोंडा डावरे, हुपरीचे नगरसेवक संदीप आपटे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी दूरध्वनीवरुन मसुरकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन अभिष्टचिंतन केले.

मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव

पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

* नोकरी विषयक *

एअरजेट कारखान्यातील कापूस काढण्यासाठी मुले पाहिजेत. सकाळी ६ ते १०.३०, पगार - १५०००/-, वय ३५ पर्यंत. संपर्क-९१६८००५७१८

अनुभवी सीएनसी ऑपरेटर पाहिजे. आकर्षक पगार, शुभ टेक, आण्णासाहेब राजमाने हायस्कूलजवळ, रूई. मो. ९०४९२२३५९५

होलसेल औषध दुकानात कामगार पाहिजेत. शिक्षण १२ वी.मुले / मुली.संपर्क -ग्रीन मेडीको,सरस्वती हायस्कूल शेजारी,भोने माळ,इचलकरंजी.फोन.नं. ७८७५६५७०८५/९७३०१३२५२६

वाईन शॉपमध्ये हुशार व अनुभवी मुलगा पाहिजे. वयाची अट -२१ ते ३५. संपर्क-७०२०१८२४२७

लेथ मशिन टर्नर व हेल्पर पाहिजे. संपर्क-९८९०१४१३३५

बारसाठी मॅनेजर व वेटर पाहिजे. संपर्क-८८०६४८४९१९, ९५९५२७४५२७

लेडीज पाहिजे. इंग्लिश टायपिस्ट देशमुख डायग्नोस्टिंग सेंटर, भारत पेट्रोल पंप, इचलकरंजी. संपर्क-८८८८३५१५१५, ८८८८३५९४५०

झेरॉक्स सेंटरमध्ये लेडीज पाहिजेत. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. संपर्क-७७९६०२९०९०

लेथ मशिनवर अनुभवी टर्नर व हेल्पर पाहिजे. संपर्क-९५९४७५१२०१

पेट्रोल व डिझेल सोडण्यासाठी कामगार पाहिजे. नदीवेस नाका, इचलकरंजी. संपर्क-९३५६६७०७४६

ड्रायव्हर पाहिजेत. पूर्णवेळ, अनुभवी, निर्व्यसनी स्वत:चे लायसन्ससहीत समक्ष भेटावे. एस.आर. डाळ्या, पंचवटी टॉकीजमागे, इचलकरंजी. ९४२२०४३९२४

टू व्हिलर पार्किंगसाठी कामगार पाहिजे. ८ तास ड्युटी, १२ तास ड्युटी. संपर्क-८२३७७४४४४४

वॉचमन भरती सुरू. १२ तास-१८ हजार पगार, वय-२५ ते ५०, ईएसआय+पीएफ+बोनस+ ४ महिना सुट्टी. पत्ता-पंचगंगा साखर कारखाना, इचलकरंजी. संपर्क-७७५७९८१८८१

हॉस्पिटलमध्ये सर्टीफिकेट असलेले एएनएम किंवा जीएनएम स्टाफ अर्जंट भरणे आहे व फार्मासिस्ट पाहिजे. संपर्क-९१७२७९५७८०

ड्रायव्हर पाहिजे. ड्रायव्हिंग काम व ऑफिस कामासाठी संपर्क-९४२०७७६४८६, इचलकरंजी.

इचलकरंजी येथे बिअरबारमध्ये कामासाठी अनुभवी वेटर व हेल्पर पाहिजे. रहाणेची जेवणाची सोय. संपर्क-८८३०९८३४०१

लेथ मशिन व सीएनसी माशिनसाठी अनुभवी ऑपरेटर पाहिजे. पत्ता-ईदगाह मैदानमागे, इचलकरंजी. फोन-९६३७२२३३५३

सांगली रोड, येथील ब्रॅण्डेड कपड्याच्या शोरूममध्ये अनुभवी सेल्सबॉय पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. संपर्क-९६३७२२३३५३, ९७६५१५१११९

फिटर, हेल्पर आयटीआय फिटर, ऑफिस दिवाणजी खात्यामध्ये हेल्पर साफसफाईसाठी पाहिजे. मर्दा प्रोसेस, उत्तम-प्रकाश टॉकीजमागे, भेटण्याची वेळ-११ ते १

अनुभवी दिवाणजी यार्न दिवाणजी, कॉम्प्युटर ऑपरेटर एअरजेट खात्यासाठी पाहिजेत. मर्दा प्रोसेस, उत्तम-प्रकाश टॉकीजमागे, भेटण्याची वेळ-११ ते १

कॉस्मेटिक शॉपसाठी कामगार पाहिजे. मुले,मुली, लेडीज, जेंटस गायत्री डिस्ट्रीब्युटर्स, ए.एस.सी. कॉलेजजवळ, इचलकरंजी. मो. ९८५०७७७०८५

श्री इंडस्ट्रिज डिझायनर इंजिनिअर, फिटर मिलींग ऑपरेटर, सरफेस ग्रायंडर ऑपरेटर, फॉलोअपसाठी लायसन आवश्यक. संपर्क-९८५०९२८३९४

बेकरीमध्ये कामगार पाहिजे. महिला व पुरूष कामगारांची अर्जंट भरती सुरू फूलटाईम आणि पार्टटाईम काम उपलब्ध. पत्ता-जवाहरनगर, इचलकरंजी. फोन-९१७५२६५९४३, ८८०६७७६८४४

रूमबॉय पाहिजेत. इचलकरंजीमधील लॉजमध्ये रूमसर्व्हिस करणेसाठी डे/नाईट मध्ये सुशिक्षित मुले पाहिजेत. संपर्क-८६६८२१९७६३, ९८६०५७०४०४

स्वयंपाकासाठी बाई पाहिजे. (शाकाहारी) मुलाखतीनंतर आकर्षक पगार ठरवला जाईल. संपर्क-९०४९९५४४२४, तीन बत्ती चौकजवळ, इचलकरंजी.

घरकामासाठी बाई पाहिजे. हुशार, प्रामाणिक, कष्टाळू. संपर्क-चैतन्य वडगावे, दाते मळा, साई कम्युनिकेशन समोर, इचलकरंजी. फोन-९०११४२६०५३

अर्जंट सिक्युरिटी गार्ड भरती- इचलकरंजी, खंजिरे इस्टेट, प्राईड खोतवाडी, तारदाळ, चिपरी, जयसिंगपूर, शहापूर, पार्वती, आकर्षक पगार. ७०२०१९७९८०, ८२०८५१९९८८

कामगार पाहिजे. लाटे ऑटो कोनर (Splicing) आणि RJK वायडिंगसाठी लेडीज किंवा जेन्टस कामगार पाहिजेत. त्याचसोबत पॅकिंग, हेल्पर कामगार त्वरीत पाहिजेत. संपर्क-९९७०९९३५५४, ८९९९४७३७५५

एअरजेट प्लांटसाठी अनुभवी कर्मचारी पाहिजेत. इचलकरंजी येथील टेक्स्टाईल युनिटसाठी कामगार व्यवस्थापन, उत्पादन देखरेख व दैनंदिन प्रोडक्शन प्लॅनिंगची जबाबदार व्यक्तीची आवश्यकता आहे. एअरजेट लूमचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य. पगार अनुभव व पात्रतेनुसार आकर्षक इच्छुक उमेदवारांनी आपला बायोडाटा (रिझ्युम) व्हॉट्सअपवर पाठवावा. कृपया फोन करू नये योग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी संपर्क साधण्यात येईल. व्हॉट्सअॅप-९८२३२४६८३१

एअरजेट प्लांटसाठी कर्मचारी पाहिजेत. इचलकरंजी येथील टेक्स्टाईल युनिटसाठी यार्न गोडावूनची संपूर्ण जबाबदारी सांभाळणारा तसेच लूमवर स्वत: उपस्थित राहून वेफ्ट (Weft) इश्यु करणारा अनुभवी व जबाबदार कर्मचारी आवश्यक आहेत. यार्न स्टॉक व्यवस्थापन व एअरजेट लूमचा अनुभ असणाऱ्यांना प्राधान्य, पगार अनुभव व पात्रतेनुसार आकर्षक. इच्छुक उमेदवारांनी आपला बायोडाटा (रिझ्युम) व्हॉट्सअपवर पाठवावा, कृपया फोन करू नये. व्हॉट्सअॅप-९३२३२४६८३१

अर्जंट सिक्युरिटी गार्ड पाहिजेत. ड्युटी ८ तास पगार १२००० ड्युटी १२ तास पगार १६००० शहापूर खंजिरे इंडस्ट्रिज, लक्ष्मी इंडस्ट्रिज, तारदाळ.९२४८०२३२६६, ९१७५२१९६१४

टेक्स्टाईल फर्ममध्ये फिनिश तागे डिस्पॅच कामासाठी २ कामगार पाहिजेत. संपर्क-९४२१६१४३९१, इचलकरंजी.

कार ड्रायव्हिंगसाठी एक व्यक्ती पाहिजे. ७०६६८५७३४०

पार्वती इंडस्ट्रिज मागील बाजूस नामांकित कंपनीमध्ये शिलाई, पॅकिंगसाठी लेडीज व हेल्पर कामाकरीता पुरूष पाहिजेत. (१२ महिने काम) मो. ८४८३००१७९१, ८६००२३५८४४

बाई पाहिजे. एक टाईम शाकाहारी जेवण बनविणेसाठी केर फरशी फर्निचर सफाईसाठी महासत्ता चौक, रत्नप्लाझा अपार्टमेंट, मारूती मंदिरजवळ, संपर्क-९५८९५५५७११, ९६३५७५७३३३

पाहिजेत. पार्वती इंडस्ट्रीजमधील नामांकित कंपनीमध्ये अनुभवी व्यक्ती पाहिजे. १) सायझिंग दिवाणजी (जॉबवर्क आण्णासाठी) २) बॉयलर अटेंडंट ३) सिक्युरिटी सुपरवायझर अनुभवी व्यक्तींनी खालील नंबरवर संपर्क साधावा. ७७२००१८४०६, ७७२००१८४०४

पाहिजेत. फेब्रिकेशन कामासाठी वेल्डर व हेल्पर पाहिजेत. संपर्क-८४४६९०१५९६, ९१४५०२८०५५

पार्वती इस्टेटजवळील टेक्स्टाईल मिलमध्ये मेंडर व हेल्पर पाहिजेत. संपर्क-७७२००१८४०६

डाटा ऑपरेटर फूलटाईम ऑफिस कामासाठी डाटा ऑपरेटर पाहिजे. संपर्क-९४२२०४८४२२.

पार्ले बिस्किट एजन्सीमध्ये मालाची डिलेव्हरी देणेसाठी ड्रायव्हर कम लोडर पाहिजे. संपर्क-९८९०७६१५१५, इचलकरंजी.

वाचकांसाठी निवेदन

दै.महासत्ता वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

दिवाळीनंतर पाहिजे. १) शर्टींग फिनिश कापड चेकींगसाठी ४ वर्षे अनुभवी चेकर २) ऑफिस काम आणि ड्रायव्हिंगसाठी अनुभवी ड्रायव्हर ३) ऑटोलूम जॉबचा हिशेबासाठी अनुभवी दिवाणजी ४) ऑफिस काम व साफसफाई करणारा ऑफिसबॉय पाहिजे. संपर्क- 'राजमहल' आवाडेनगर. मो. ९३२६०३९०८७

दिवाळीनंतर पाहिजे. १) ऑटोलूम कारखान्यात यार्न हिशेबासाठी अनुभवी दिवाणजी २) पीएलसी सायझिंगवर अनुभवी खरड दिवाणजी पाहिजे. संपर्क-'राजमहल' आवाडेनगर. मो. ९३२६०३९०८७

पेंटामेक युनिट-२, पार्वती इंडस्ट्रिज, यड्राव. सीएनसी ऑपरेटर-०६, हेल्पर-०४, इन्स्पेक्शन (लेडीज)-०४. मो. ८३८००७१५५३

कापड कंपनीमध्ये
पाहिजेत
■ दिवाणजी ■
१० वी /१२ वी पास
■ अकौंटंट ■
विवाहीत महिलांना प्राधान्य
----* संपर्क *----
9146762111
खंजिरे इंडस्ट्रियल इस्टेट, शहापूर

Pentamech- Parvati Industries Yadrav Production Head-01, CNC & VMC Setter-02. Production line Supervisor-02.Mob. 7385620012, 8975957300

Pentamech- Parvati Industries Yadrav Qulity Line Inspector-04, Final Line Inspector-02, CNC & VMC Operator-01, HMC Operator-03. Mob. 7385620012,

सोलर पॅनल व वॉटर टँक क्लिनिंगसाठी मुलगा हवा आहे. संपर्क-९८२८२५७०९०

आईस्क्रीम डिलेव्हरीसाठी मुले पाहिजेत. संपर्क-७३८५९०८८०८

येथील तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये एस.वाय. व टी.वाय. बी.टेक. विद्यार्थ्यांसाठी प्रकल्पाधारित शिक्षण (पीबीएल) दिनाचा सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी किर्लोस्कर ऑईल इंजिन्स, कोल्हापूरचे माजी वरिष्ठ महाव्यवस्थापक नितीन भावे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. व्ही. व्ही. कारजिन्नी यांच्या हस्ते झाले. यावेळी, प्राचार्य डॉ. के. आय. पाटील, अधिष्ठाता डॉ. एस. एम. पिसे, पीबीएल समन्वयक प्रा. एस. व्ही. निकम,सुधीर पाटील, शिवकुमार सासणे तसेच सर्व विभागीय समन्वयक उपस्थित होते.या उपक्रमासाठी वारणा विविध उद्योग व शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ.आ.विनय कोरे,कुलाधिकारी एन. एच. पाटील,कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शुभेच्छा दिल्या.प्रकल्प प्रदर्शनात सर्व अभियांत्रिकी शाखांतील सुमारे २३०० विद्यार्थ्यांनी ३५० हून अधिक प्रकल्प गटांद्वारे नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. यावेळी वारणा पीबीएल पुरस्कार विजेत्या विद्यार्थ्यांचा नितीन भावे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रकल्पांचे उत्पादन विकास,उद्योजकता व स्टार्टअपमध्ये रूपांतर करण्याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. व्ही. व्ही. कारजिन्नी यांनी विद्यार्थ्यांनी उद्योगजगताच्या गरजांनुसार कौशल्ये विकसित करून संशोधन व नवोपक्रमाकडे वाटचाल करावी, असे आवाहन केले. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.वासाठी प्रा.एम.व्ही. जाधव, प्रा. आर. आर चव्हाण, प्रा.एन. एम. शिंदे, प्रा.ए.ए. पोरेख, प्रा.ओ आर. जंगम, प्रा.एस. के. जंत्रे,प्रा.एन.सी. देसाई, प्रा. पाटील, प्रा.आडूरकर यांनी परिश्रम घेतले.

बालदिन ते बाल अधिकार सप्ताहानिमित्त

अवनिमार्फत विविध उपक्रमांचे आयोजन

कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)-

.....

१४ नोव्हेंबर बालदिन ते २० नोव्हेंबर हा आंतरराष्ट्रीय बाल अधिकार दिन म्हणून साजरा केला जातो. या सप्ताहाचे औचित्य साधून बालकांच्या सक्रिय सहभागातून अवनि संस्थेमार्फत विविध बालकेंद्रित उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अवनि संस्थेच्या अध्यक्षा अनुराधा भोसले यांनी दिली.

अवनि संस्थेच्या अभ्यासिकांमधील बालकांशी त्यांचे हक्क आणि कर्तव्ये या विषयावर मार्गदर्शन तसेच चित्रकला, वक्तृत्व आणि हस्ताक्षर स्पर्धा, बाल भिक्षेकरी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत शिरोली येथील वस्ती पातळीवर भिक्षेकरीतून मुक्त केलेल्या बालकांसाठी आनंद मेळावा आणि पालक मेळावा, तसेच बालकांसाठी विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांचेही नियोजन करण्यात आले आहे. वाचन कट्ट्यातील बालकांसाठी विविध स्पर्धा आणि बौद्धिक खेळांचे आयोजन करण्यात येणार आहे.









कोल्हापूरप्रमाणे साताऱ्यातही ऊस दर जाहीर करा

स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मागणी; ...अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

सातारा,ता.१२(प्रतिनिधी)-

.....

शेतकऱ्यांना ऊसदर परवडतो का हे कोण बघणार ? दोन दिवसांत कोल्हापूर पॅटर्न जाहीर करा, अन्यथा बेमुदत ऊस वाहतूक बंद तीव्र करुन आंदोलन छेडले जाईल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजू शेळके यांनी दिला आहे.



राजू शेळके यांनी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, आता बैठका नकोत, आश्वासने नकोत, चर्चाचे गुऱ्हाळ नको तर शेतकऱ्यांना त्यांच्या उसाचा न्याय दर हवाय आणि तो मिळवून घेतल्याशिवाय स्वाभिमानी शेतकरी संघटना कोणत्याही परिस्थितीत गप्प बसणार नाही. यंदाच्या गळीत हंगामात शेतकऱ्यांना न्याय्य ऊसदर मिळावा यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी महाराष्ट्रासह कर्नाटकातील शेतकऱ्यांना एकत्र करून गल्लीपासून दिल्लीपर्यंत ऊसदराचा प्रश्न पेटवला. हंगाम सुरू होण्यापूर्वीच साखर उद्योगाचा संपूर्ण आर्थिक हिशोब मांडून कारखानदारांचे उत्पन्न आणि शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च यातील तफावत जनतेसमोर आणली. मात्र, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अजूनही ठोस निर्णय घेण्याची मानसिकता सातारा जिल्ह्यातील कारखानदार दाखवत नाहीत, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

सातारा जिल्ह्यातील राजकीय परिस्थिती धक्कादायक आहे. राजकारणात एकमेकांचे कट्टर विरोधक असणारे कारखानदार एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करतात. सत्तेसाठी संघर्ष करतात मात्र शेतकऱ्यांना योग्य ऊस दर देणे परवडत नाही हे सांगण्यासाठी मात्र वारंवार एकत्र बैठका घेतात यामागचे गौडबंगाल जनतेला समजले आहे. कारखानदार शेतकऱ्यांचा हितासाठी एकत्र येत नाहीत, पण शेतकऱ्यांच्या



हक्काचा दर रोखण्यासाठी एकत्र येतात, ही कोणती राजकीय नैतिकता असून सातारा जिल्ह्यातील वजनदार मंत्र्यांच्या दबावाखाली कारखानदारांना दर जाहीर करता येत नसेल तर हा प्रश्न केवळ कारखानदारांचा राहत नाही. शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर राजकीय हस्तक्षेप करण्याचा हा डाव आम्ही कदापि सहन करणार नाही. सभासद शेतकऱ्यांच्या उसाला योग्य दर देता येत नसेल तर संचालकांनी राजीनामे द्यावेत आणि सभासदांना त्यांचा निर्णय घेऊ द्या, असे शेळके यांनी स्पष्ट केले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली यापूर्वी अनेक बैठका झाल्या. मात्र, त्यातून शेतकऱ्यांच्या हातात काय पडले? आता वारंवार बैठका घेऊन शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम थांबवा. शेतकऱ्यांना चर्चेचे गाजर नको, त्यांच्या उसाचा न्याय्य दर हवा आहे.

सातारा जिल्ह्यातील सर्व साखर कारखानदारांनी कोल्हापूर पॅटर्नप्रमाणे टप्प्याटप्प्याने ऊसदर जाहीर करून गळीत हंगाम शांततेत सुरू करावा. विशेषतः कराड तालुक्यातील कारखानदारांनी इतरांच्या राजकीय दबावाखाली न राहता शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करावा. सांगली, कोल्हापूर आणि कर्नाटकातील कारखान्यांकडून अधिक दराची स्पर्धा निर्माण झाली तर सातारा जिल्ह्यातील कारखान्यांनाच त्याचा फटका बसेल. यंदाच्या हंगामात शेतकऱ्यांना न्याय्य ऊसदर मिळवून देण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना शेवटपर्यंत लढणार आहे, अन्यथा संघर्ष अटळ असल्याचा इशारा शेवटी राजू शेळके यांनी व्यक्त केला.

फलटण येथे भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात बालिकेचा मृत्यू

फलटण,ता.१२(वार्ताहर)-

.....

फलटण शहरातील महात्मा फुले चौकात आई-वडिलांसोबत झोपलेल्या अवघ्या तीन महिन्याच्या बालिकेला भटक्या कुत्र्यांनी ओढून नेत वळी घेतल्याची घटना अत्यंत काळीज पिळवटून टाकणारी आहे. या घटनेनंतर शहरात संतापाची लाट उसळली आहे.



वाढार फाटा येथील मजुरी करणाऱ्या पारधी समाजातील कुटुंबाने रात्री फलटण शहरातील महात्मा फुले चौकामध्ये रस्त्याच्या कडेला आपला मुक्काम केला होता. या कुटुंबात आई-वडिलांसोबत तीन महिन्याची मुलगी होती. रात्री सर्व झोपेत असताना या परिसरातील भटक्या कुत्र्यांनी या कुटुंबासोबत झोपलेल्या तीन महिन्याच्या मुलीला ओढून नेत तिच्या अंगाचे लचके तोडले व यातच ती गतप्राण झाली. ही चिमुरडी पारधी समाजाची असल्यामुळे प्रशासन आणि स्थानिक पातळीवर अधिक दराची स्पर्धा निर्माण झाली तर सातारा जिल्ह्यातील कारखान्यांनाच त्याचा फटका बसेल. यंदाच्या हंगामात शेतकऱ्यांना न्याय्य ऊसदर मिळवून देण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना शेवटपर्यंत लढणार आहे, अन्यथा संघर्ष अटळ असल्याचा इरादा शेवटी राजू शेळके यांनी व्यक्त केला.

कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी

कुटुंबाचा आक्रोश या प्राणी मित्रांना ऐकू येत नाही का? कुत्र्यांच्या हक्कासाठी लढणाऱ्यांनी आणि आता त्या मृत बालिकेच्या आई वडिलांच्या डोळ्यातील अश्रूंची ही जबाबदारी घ्यावी. केवळ सोशल मीडियावर प्राणी प्रेमाचा उदो उदो करणाऱ्यांनी मानवी जीवाची मूल्ये ही समजून घेण्याची गरज आहे. या घटनेमुळे लहान मुलांचा घराच्या बाहेर खेळायला सोडणे अवघड झाले आहे. फलटण नगरपरिषदेने ही महिन्यापूर्वी भटकी व मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण मोहीम हाती घेतली होती मात्र ही मोहीम यांना प्रभावीपणे राबवणे आता गरजेचे बनले आहे. एका बालिकेचा बळी गेल्यानंतर आपण नगरपरिषदेने कोणाच्याही दबावाला बळी न पडता मोकाट कुत्र्यांचा योग्य तो बंदोबस्त करावा. प्रशासने आता बध्यांची भूमिका सोडून तातडीने कठोर पावले उचलणे आवश्यक आहे.

पाटणच्या रस्त्यांसाठी ४० कोटींचा निधी

पाटण,ता.१२(प्रतिनिधी)-

.....

पाटण विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागाच्या दळणवळणाला नवी गती मिळणार असून, तीन प्रमुख जिल्हा मार्गांच्या सुधारणेसाठी केंद्रीय मार्ग निधी (सी.आर.एफ.) मधून सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात ४० कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. पालकमंत्री शंभूराज देसाईंयांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. यामुळे मतदारसंघातील सुमारे ४३.३५ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची सुधारणा होणार आहे.



मंत्री शंभूराज देसाईंच्या पाठपुराव्याला यश

त्यामध्ये तारळे विभागातील काटेवाडी फाटा-आवर्डे-मालोशी रस्ता (एमडीआर १३४), मारूलहवेली विभागातील एणए १६६ ई-निसरे-मारूल-गुढे-काळगाव-भुरभूशी रस्ता (एमडीआर ५४) तसेच त्रिपुडी-मुळगाव-कवरवाडी-नेरळे-गुंजाळी-लेंढोरी-मणेरी-चिरंबे-काढोली-चाफेर-रिसवड-ढोकावळे रस्ता (एमडीआर १२९) या मार्गांचा समावेश आहे. या रस्त्यांवरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असून, खराब अवस्थेमुळे प्रवाशांना गैरसोयींचा सामना करावा लागत होता. ही गरज लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुधारणेचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. देसाई यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे निधीसाठी लेखी मागणी केली होती. त्यानुसार केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाच्या सचिवांनी राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांना निधी मंजुरीबाबत पत्राद्वारे कळविले आहे.

मंजूर निधीतून रस्त्यांची कामे तातडीने सुरू करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. या निधीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे देसाई यांनी आभार मानले आहेत.

जलसंधारण कामांसाठी नऊ कोटींचा निधी मंजूर

आम.सत्यजित देशमुख

शिराळा,ता.१२(प्रतिनिधी)-

.....

शिराळा विधानसभा मतदारसंघातील जलसंधारण आणि पाणी उपलब्धतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या तीन कामांना जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जलसंधारण विभागाकडून मंजुरी मिळाली आहे. आम. सत्यजित देशमुख यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून आणि पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या सहकार्याने या कामांसाठी एकूण ९ कोटी २० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती आम. सत्यजित देशमुख यांनी दिली.



यामध्ये येळापूर पैकी चव्हाणवाडी येथील पाझर तलावाचे साठवण तलावात रूपांतर करण्यासाठी ३ कोटी ८० लाख रुपये, बेलदारवाडी येथील पाझर तलावाचे साठवण तलावात रूपांतर करण्यासाठी ३ कोटी ७५ लाख रुपये, तर मेणी येथे कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधण्यासाठी १ कोटी ६५ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. या तिन्ही कामांची मागणी संबंधित गावांतील नागरिक व शेतकऱ्यांकडून अनेक दिवसांपासून होत होती.

या मागणीची दखल घेऊन आमदार सत्यजित देशमुख यांनी जिल्हा नियोजन समिती व जलसंधारण विभागाच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले असून या कामांना आता मंजुरी मिळाली आहे. या कामांमुळे पावसाळ्यातील पाणी मोठ्या प्रमाणात साठवून त्याचा उपयोग शेतीसाठी करता येणार आहे. तसेच भूजल पातळीत वाढ होऊन विहिरी व कूपनलिकांच्या पाणीपातळीत सुधारणा होण्यास मदत होईल. परिसरातील शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध होण्याबरोबरच गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासही या प्रकल्पांचा मोठा हातभार लागणार आहे.

शिराळा मतदारसंघातील ग्रामीण भागाचा विकास, शेतकऱ्यांना पाण्याची शाश्वत उपलब्धता आणि नागरिकांचा मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत. या तीन महत्त्वपूर्ण कामांना मंजूरी व निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आम.सत्यजित देशमुख यांनी आभार मानले.

साताऱ्यात दिवाळी फराळ सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

सातारा,ता.१२(प्रतिनिधी)-

.....

देशाच्या सीमेवर अहोरात्र पहारा देत उन, वारा, पाऊस आणि प्रत्येक प्रतिकूल परिस्थितीची पर्वा न करता मातृभूमीचे रक्षण करणाऱ्या वीर जवानांच्या त्यागाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी यंदाची दिवाळी सातारा जिल्हात एका आगळ्यावेगळ्या आणि भावस्पर्शी वातावरणात साजरी झाली. देशसेवेच्या कर्तव्यामुळे कुटुंबापासून दूर राहून सण-उत्सव साजरे करणाऱ्या सैनिक व माजी सैनिकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यासाठी साताऱ्यात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या दिवाळी फराळ सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

माजी सैनिक कल्याण मंत्री तथा पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या संकल्पनेतून हा विशेष स्नेहसोहळा आयोजित करण्यात आला होता. देशासाठी आपल्या आयुष्याची अमोलाचे वर्ष समर्पित करणाऱ्या सैनिकांच्या त्यागाचा सन्मान करणे, त्यांच्या कुटुंबियांशी आपुलकीचे नाते घट्ट करणे या हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. हा विशेष दिवाळी फराळ सोहळा महासैनिक हॉल अँड लॉन्स, टीसीपीसी, करंजे नाका, सातारा येथे उत्साहात संपन्न झाला. सैनिक कल्याण आणि मराठी महामंडळ,पुणे,महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमादरम्यान माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांनी एकत्र येत एकमेकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

कराड येथे पाणी वाचवा चर्चासत्र संपन्न

कराड,ता.१२(प्रतिनिधी)-

.....

नळ गळती तातडीने दुरूस्त करा, शॉवरऐवजी बादलीने अंघोळ व बादलीनेच वाहने स्वच्छ करा, आठवड्यातून एक दिवस पाणीविरहित ठेवावा, आदी पाणी बचतीचे उपाय येथे आयोजित पाणी वाचवा चर्चासत्रात नागरिकांनी सूचवले.

दुष्काळी स्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाईवर मात करण्यासाठी नागरिकांत जनजागृती व्हावी, या उद्देशाने पालिका, एन्व्हायरो फ्रेंड्स नेचर क्लब आणि शिवाजी हाउसिंग सोसायटी, उद्यान ग्रुप, विजय दिवस समारोह समितीसह अन्य संस्थांतर्फे शहरात पहिल्यांदा हे चर्चासत्र झाले. नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, उपनगराध्यक्ष पोपटराव साळुंखे, माजी उपनगराध्यक्ष फारूख पटवेकर, विनायक पावसकर, विलासराव कुंभार, अँड.सतीश पाटील, सुनीता जाधव आदी उपस्थित होते. अँड.मोहिते, राजकुमार लादे, चंद्रशेखर जकाते यांनी उपाय सुचवले. सरस्वती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका तोडकर यांनी रेनवॉटर हार्वेस्टिंगचे महत्त्व सांगितले.

सदानंद भोपळे यांनी पाण्याची बॅंक तयार करण्याचे आवाहन केले. राजश्री पालकर, राधिका पन्हाळे, डॉ.सुधीर कुंभार, हिंदवी तोडकर, अँड.सतीश पाटील, प्रमोद तोडकर, प्रा.बी.एस. खोत, प्रा.गजानन रेखे, सौरभ पाटील, फारूख पटवेकर यांनीही पाणीबचतीसाठी विविध उपाय सुचवले. प्रसाद पावसकर यांनी आभार मानले. सूत्रसंचालन ए. आर.पवार यांनी केले.

सुरेल स्वरांच्या बरसातीत रंगली 'स्वर-दीपावली'

स्वरसाधना संगीत विद्यालयातर्फे संगीतमय स्वरसोहळा संपन्न

सांगली,ता.१२(प्रतिनिधी)-

.....

दिवाळी पाडव्याच्या मंगलमय पहाटे भक्तिसंगीत, भावगीत आणि अभिजात संगीताच्या सुरेल स्वरांनी आसमंत भारावून टाकत 'स्वर-दीपावली' या संगीतमय मैफलीने रसिकांना अविस्मरणीय स्वरानुभवाची अनोखी पर्वणी दिली. स्वरसाधना संगीत विद्यालयातर्फे आयोजित या कार्यक्रमात पहाटेच्या प्रसन्न वातावरणात स्वरांची अशी काही आतषबाजी रंगली की, उपस्थित रसिक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले.



पराग जोशी संचलित स्वरसाधना संगीत विद्यालयाच्यावतीने विश्रामबाग येथील स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानच्या शाळेच्या प्रांगणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'लक्ष दीप लावून स्वरांचे, क्षण उजळूया दीपावलीचे' या सुरेख संकल्पनेतून साकारलेल्या या मैफलीने दीपावलीच्या आनंदात संगीताचा सुगंध दरवळवला.

कार्यक्रमाची सुरुवात 'एकदंत भालचंद्र' आणि 'शंभो शंकरा' या भक्तीरचनांनी झाली. त्यानंतर 'जय शारदे वागीश्वरी' या वंदनेने वातावरण भक्तीमय झाले. कपिल अभ्यंकर, श्रावणी देशपांडे, उत्तरा देशपांडे आणि स्वरा जोशी या गायक कलाकारांनी आपल्या सुरेल गायनातून विविध संगीतप्रकारांची बहारदार सफर घडवली.

भक्तीरचनांच्या सादरीकरणाने मैफलीला अधिकच अध्यात्मिक उंची प्राप्त झाली. शेवटी सामूहिक गजराने कार्यक्रमाची सांगता झाली.

संगीतमय मैफलीला हार्मोनियमवर पराग जोशी, तबल्यावर शौनक भोगले, पखवाजवर अजय भोगले, की-बोर्डवर संग्राम कांबळे आणि टाळावर सम्राट शिंगारे यांनी सुरेख साथसंगत केली. अस्मिता केळकर यांनी आपल्या ओघवत्या निवेदनातून प्रत्येक गीताचा भावार्थ आणि कार्यक्रमातील प्रवाह रसिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवला. ध्वनिसंयोजनाची जबाबदारी राजू सुपेकर यांनी सांभाळली.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री.नामजोशी यांचे सहकार्य लाभले.

रोटरी क्लबतर्फे एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना दिवाळी कीट वाटप

सांगली,ता.१२(प्रतिनिधी)-

.....

स्वत:च्या कुटुंबापासून दूर राहून सणासुदींच्या दिवशीही प्रवाशांची सेवा करणाऱ्या एसटी महामंडळाच्या चालक आणि वाहक कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर दिवाळीच्या आनंद फुलविण्याचा उपक्रम रोटरी क्लब ऑफ कृष्णा व्हॅली, सांगली यांच्या वतीने यंदाही राबविण्यात आला.

गेल्या तब्बल २० वर्षांपासून क्लबच्यावतीने दिवाळीच्या पहाटे पाच वाजता एसटी डेपोमध्ये कार्यरत असलेल्या निवासी चालक व वाहक कर्मचाऱ्यांना दिवाळी किट आणि फराळाचे वाटप करण्याचा परंपरा अखंडपणे सुरू आहे. दिवाळीच्या पहाटे पाच वाजता एसटी डेपोमध्ये जाऊन कर्मचाऱ्यांना दिवाळी किट आणि फराळाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी क्लबचे अध्यक्ष रो. प्रफुल्ल ताराळकर, सेक्रेटरी रो. स्वप्निल पाटील, खजिनदार रो.प्रवीण गोडबोले, तसेच रो. संदीप नाईक, रो.राजन राजोपाध्ये, रो.सुरेश देशमुख, रो.राजेंद्र मेहेकर, रो.विनायक काळे, रो.उदय कुलकर्णी, रो. मयुरेश, रो.प्रमोद चौगुले, संकेत गोडबोले, रो.डॉ.सुहास जोशी व क्लबचे अन्य सदस्य उपस्थित होते.

'थिंक सांगलीकर'कडून गरीब व गरजूंना दिवाळी फराळ वाटप

मिरज,ता.१२(प्रतिनिधी)-

.....

दिवाळी म्हणजे आनंद, प्रेम आणि माणुसकीचा सण! प्रत्येकाच्या आयुष्यात आनंदाचा प्रकाश पोहोचावा, या भावनेतून 'थिंक सांगलीकर' या समाजमाध्यम समूहाच्या वतीने सलग दुसऱ्या वर्षी दिवाळी फराळ वाटपाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत सांगली शहरातील बेघर, रस्त्यावर राहणाऱ्या तसेच गरजू नागरिकांना दिवाळीचा फराळ आणि केळी वाटप करण्यात आले. सणाच्या आनंदापासून दूर असलेल्या या बांधवांसोबत दिवाळीचा आनंद वाटून घेत त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

दूध उत्पादकांच्या कष्टातून सहकारी दूध संस्थांची प्रगती शक्य-नाईक

शिराळा,ता.१२(प्रतिनिधी)-

.....

सहकारी संस्थेचा कारभार पारदर्शकपणे आणि सभासदांच्या गरजा लक्षात घेऊन चालविल्यास कोणतीही संस्था यशाच्या शिखरावर पोहोचू शकते. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सभासदांच्या अडचणी समजून घेऊन तळमळीने काम करणे आवश्यक आहे. भैरवनाथ दूध संस्थेच्या माध्यमातून सुमारे पंधराशे लिटर दुधाचे दररोज संकलन होत आहे, ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे, असे प्रतिपादन सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक रणधीर नाईक यांनी केले.



चिखली येथील भैरवनाथ दूध संस्थेच्या लाभांश वाटपप्रसंगी रणधीर नाईक, मानसिंगराव नाईक, विराज नाईक व इतर.

दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने चिखली (ता.शिराळा) येथील भैरवनाथ दूध संस्थेच्या लाभांश वितरण व सत्कार समारंभावेळी नाईक बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी आम. मानसिंग नाईक यांची उपस्थिती होती. संस्थेचे अध्यक्ष सचिन साळुंखे यांनी संस्थेच्या कामकाजाची सविस्तर माहिती दिली.

विराज नाईक म्हणाले, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचा उल्लेख करताना ते म्हणाले, जिल्ह्यातील सर्व नेतेमंडळींनी एकत्रित प्रयत्न केल्यामुळे बँकेच्या जवळपास १५ जागा बिनविरोध झाल्या. उर्वरित जागाही बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न झाले. गेल्या पाच वर्षांत ज्येष्ठ नेत्यांच्या नेतृत्वाखाली व अध्यक्ष मानसिंगराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली दूध उत्पादक संघासह व ग्रामस्थ,तरुण कार्यकर्ते उपस्थित होते.

अंकलखोप येथील पानमळ्यात नागवेलीचे पूजन

कृष्णा काठचा मानाचा विडा घाऊक बाजारात विक्रीसाठी रवाना

भिलवडी,ता.१२(प्रतिनिधी)-

.....

कृषी संस्कृतीतील समृद्ध परंपरा जपत दिवाळी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर सांगली जिल्हातील पलूस तालुक्यात असलेल्या प्रसिद्ध अंकलखोप गावातील पानमळ्यांमध्ये शेतकरी वर्गाने पानवेलीची (नागवेलीची) अत्यंत श्रद्धेने खास पूजा संपन्न केली.

कृष्णा नदीकाठच्या अत्यंत सुपीक आणि कसदार जमिनीत पिकणाऱ्या अंकलखोपच्या विड्याच्या पानांना संपूर्ण महाराष्ट्र आणि परराज्यातही मोठी मागणी असते. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या पाडव्याचे औचित्य साधून मळ्यातील पानांचा विशेष तोडा (खुडा) करून, त्यांची आकर्षक सजावट आणि बांधणी करत हा मानाचा विडा घाऊक बाजारात विक्रीसाठी पाठवण्यात आला.

कृष्णाकाठच्या हा पट्टा दर्जेदार आणि चवदार विड्याच्या पानांसाठी (नागवेलीसाठी) संपूर्ण जिल्हात अग्रगण्य मानला जातो. पानवेल हे अत्यंत नाजूक आणि अहोरात्र देखभालीचे पीक असल्याने मळ्याला नैसर्गिक आपत्ती व रोगांपासून वाचवण्यासाठी शेतकरी वर्षभर उत्तम उत्पादन मिळण्यासाठी शेतकरी पाडव्याचा दिवशी वेलींची कृतज्ञतापूर्वक पूजा करतात. सकाळपासूनच अंकलखोप येथील मळ्यांमध्ये सणाचे चैतन्य पाहायला मिळाले. वेलींना हळद-कुंकू वाहून, फुलांचे हार घालून आणि गोडाधोड्याचा नैवेद्य दाखवून प्रार्थना करण्यात आली.

रुपनर यांच्या मळ्यातील पानांचा विशेष खुडा आणि कलात्मक सजावट


पूजा आटोपल्यानंतर अंकलखोप येथील प्रगतशील शेतकरी रुपनर आणि परिसरातील इतर शेतकऱ्यांनी वेलींना इजा न पोहोचवता पानांचा विशेष खुडा (पान काढणी) केला. घाऊक बाजारात पानांची पत आणि विशेष ओळख टिकून राहावी यासाठी काढणी केलेल्या पानांची उत्कृष्ट वर्गवारी करण्यात आली. पानांचा आकार, रंग आणि दर्जा तपासून त्यांची अतिशय आकर्षक पद्धतीने पप्पी लावून गोल चक्राकार पेंढ्या बांधण्यात आल्या. पानांचा ताजेपणा आणि तजेला कायम राहावा यासाठी ओलीच्या पानात आणि ओल्या कापडात ही पाने व्यवस्थित पॅक करुन बांबूच्या करंडयांमध्ये सुरक्षित ठेवण्यात आली.

प्रा.राजेंद्र प्रधान यांना पीएच.डी. पदवी प्रदान

ईश्वरपूर,ता.१२(प्रतिनिधी)-

.....

कासेगाव येथील कासेगाव शिक्षण संस्थेच्या आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्रा.राजेंद्र अशोक प्रधान यांना शिवाजी विद्यापीठाकडून इंग्रजी विषयातील पीएच.डी.पदवी प्रदान करण्यात आली. या यशामुळे त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



प्रा. प्रधान यांनी अ स्टडी ऑफ सस्पेन्स अँड थ्रिलर इन द सिलेक्ट नॉव्हेल्स ऑफ अश्विन सांघि या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला होता. त्यांच्या या संशोधनाला विद्यापीठाने मान्यता देत त्यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली. या संशोधनासाठी त्यांना प्राचार्य डॉ. एस. बी. भांबर यांचे मार्गदर्शन लाभले तसेच प्राचार्य आर. डी. सावंत आणि प्राचार्य डॉ.संजयकुमार मगदूम यांचे सहकार्य मिळाले. प्रा.प्रधान यांच्या या यशाबद्दल शिक्षण क्षेत्रातील सहकारी, मित्रपरिवार, नातेवाईक यांच्याकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

महासत्ता

शुक्रवार,ता.१३ नोव्हेंबर २०२६

शेकडो शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान; महावितरणच्या गलथान कारभारावर शेतकऱ्यांतून तीव्र संताप

ऐन दिवाळीत शेतकऱ्यांच्या स्वप्नांची राखरांगोळी

निळपणमध्ये शॉर्टसर्किटने दोनशे एकरातील ऊस खाक

गारगोटी,ता.१२(प्रतिनिधी)-

भुदरगड तालुक्यातील निळपण येथे शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत सुमारे दोनशे एकरांतील ऊसशेती जळून खाक झाली.या आगीत शेकडो शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, संपूर्ण परिसरातील ऊसशेतीला मोठा फटका बसला आहे.ऐन दिवाळीच्या सणातच शेतकऱ्यांच्या वर्षभराच्या कष्टांची राखरांगोळी झाल्याने निळपण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मंगळवारी ता.१०रोजी सकाळी सुमारे अकराच्या सुमारास म्हसोबाचा माळ परिसरात शॉर्टसर्किटमुळे आगीची ठिणगी पडली. सुरुवातीला मर्यादित क्षेत्रात असलेली आग वाऱ्याच्या वेगामुळे काही वेळातच भडकली.दुपारी अडीचच्या सुमारास आगीने रौद्ररूप धारण केले. आगीच्या ज्वाळांनी आणि धुराच्या प्रचंड लोटांनी संपूर्ण परिसर व्यापला. पाहता पाहता आग निळपण गावाच्या हद्दीतून थेट दारवाड गावच्या शिवेपर्यंत पोहोचली. त्यामुळे मोठ्या क्षेत्रातील हिरवीगार ऊसशेती आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.

विशेष म्हणजे,निळपण गावातील ऊसशेतीला गेल्या दोन वर्षांत सलग अशाच आगीच्या घटनांना सामोरे जावे लागले होते.वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे ऊस उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत.शॉर्टसर्किटमुळे आग लागण्याच्या घटना टाळण्यासाठी वीज वितरण यंत्रणेची नियमित तपासणी,ठोकादायक विद्युत वाहिन्यांची दुरुस्ती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज या घटनेने पुन्हा अधोरेखित झाली आहे.

दिवाळीच्या आनंदावर विरजण

गुडाळ येथील ऊस फडाला लागलेल्या आगीत शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.त्यामुळे ऐन दिवाळीत बुधवारी दुपारी घडलेल्या या घटनेमुळे शेतकऱ्यांच्या दिवाळीच्या आनंदावर विरजण पडले आहे.अगोदरच दुष्काळी परिस्थिती त्यात हा नुकसानीचा वरवंटा शेतकऱ्यांवर पडला आहे.

आगीची भीषणता लक्षात घेऊन बिद्री सहकारी साखर कारखान्याच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, आगीचा वेग आणि वाऱ्यामुळे निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीमुळे आग विझविण्यात मोठ्या अडचणी आल्या.त्यातच आगीच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी पुरेसा पाणंद रस्ता नसल्याने अग्निशमन वाहनांना घटनास्थळी जाणेही कठीण झाले. अखेर मौजे निळपण आणि दारवाड येथील ग्रामस्थांच्या अथक प्रयत्नांनंतर आग नियंत्रणात आली; परंतु तोपर्यंत सुमारे सव्वाशे एकरांतील ऊस जळून खाक झाला होता.



भुदरगड तालुक्यातील निळपण येथील म्हसोबाचा माळ परिसरात शॉर्टसर्किटमुळे दोनशे एकरातील ऊस आगीत जळाला.

घटनेची माहिती मिळताच तलाठी वर्षाराणी गुरव,पोलीस पाटील व ग्रामस्थ यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. मात्र, केवळ पाहणी करून प्रश्न सुटणार नाही. शासनाने तातडीने सर्व बाधित शेतकऱ्यांचा जळीत क्षेत्राचे पंचनामे करावेत, नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करावे आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान,बिद्री साखर कारखान्याचे संचालक जीवन पाटील, भुदरगड पंचायत समितीचे सभापती विक्रम पाटील व जिल्हा बँकेचे संचालक प्रा. अर्जुन आबिटकर यांनी भेट देऊन नुकसानीचा आढावा घेतला.

शेतशिवारातून जाणाऱ्या वीजवाहिन्या,विद्युत खांब आणि जोडण्यांची नियमित तपासणी व देखभाल करणे ही महावितरणची मुख्य जबाबदारी आहे. वीज वाहिन्यांमध्ये तांत्रिक त्रुटी किंवा धोकादायक परिस्थिती निर्माण झाल्यास ती वेळीच दूर करणे आवश्यक होते; परंतु महावितरण यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे अशा दुर्घटना वारंवार घडत आहेत. घटना घडल्यानंतर यंत्रणा जागी होते,मग शेतकऱ्यांनी न्याय कोणाकडे मागायचा? असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत.

गुडाळ येथे शार्टसर्किटमुळे दोनशे एकरातील ऊसाला आग

शिरगाव,ता.१२(प्रतिनिधी)

राधानगरी तालुक्यातील गुडाळ येथे ऐन दिवाळीच्या सणात शॉर्ट सर्किटमुळे ऊसाच्या फडाला आग लागून तब्बल २०० एकरांहून अधिक क्षेत्रातील ऊस जळून खाक झाला आहे. या भीषण आगीमुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, वर्षभर काबाडकष्ट करून उभे केलेले उसाचे पीक डोळ्यादेखत राखेत मिसळताना पाहण्याची दुर्दैवी वेळ बळीराजावर आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण शेतकरी हवालदिल झाले असून, महावितरणच्या वीज वितरण व्यवस्थेतील त्रुटी आणि देखभालीच्या अभावाबाबत तीव्र संताप व्यक्त होत आहे.



गुडाळ येथे उसाच्या फडाला लागलेली आग.

शेतकऱ्यांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, शेतातून गेलेल्या वीजवाहिनीतील शॉर्टसर्किटमुळे ही आग लागली. पाहतापाहता आगीने रौद्ररूप धारण करत परिसरातील उसाच्या शेतांना आपल्या कवेत घेतले.जिल्हा प्रशासन, महसूल विभाग,कृषी विभाग आणि महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन २०० एकरांहून अधिक क्षेत्रातील जळालेल्या उसाचे वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत. आगीचे नेमके कारण शोधून वीज वितरण व्यवस्थेतील त्रुटींची चौकशी करावी. महावितरणच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या नुकसानीची पूर्ण आणि पुरेशी नुकसानभरपाई बाधित शेतकऱ्यांना तातडीने मिळवून द्यावी.केवळ पंचनाम्यांचा फार्स न करता नुकसान झालेल्या प्रत्येक शेतकऱ्याला न्याय मिळेपर्यंत प्रशासनाने पाठपुरावा करावा.भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी परिसरातील वीजवाहिन्या व संपूर्ण विद्युत यंत्रणेची तातडीने तपासणी व दुरुस्ती करावी,अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

नुकसानभरपाई थेट खात्यावर जमा ; शेतकऱ्यांकडून समाधान व्यक्त

कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)-

वारणी पावसाने कधी अतिवृष्टी तर कधी प्रदीर्घ खंड असे लहरी रूप दाखवल्याने कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. भात, नाचणी, भुईमूग, सोयाबीन पिकांना याचा मोठा फटका बसला. मात्र, वेळेत पंचनामे होऊन शासनाची तातडीची मदत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा झाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मदत मिळालेल्या शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

जिल्ह्यात वारणी पावसाळ्याच्या सुरुवातीला चांगला पाऊस झाला. त्यामुळे शेतकऱ्यांनी उत्साहाने भात, नाचणी, भुईमूग यांची लागवड केली. मात्र, ऐन पीक जोमात असताना सप्टेंबर महिन्यात पावसाने खंड दिला.ज्या ठिकाणी भात बाहेर पडण्याची वेळ होती, तिथे पाणीच मिळाले नाही. तर काही ठिकाणी सततच्या पावसाने पिकांची वाढच खुंटली. परिणामी,अनेक शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पीक वाया गेले. या पार्श्वभूमीवर शासनाच्या आदेशानुसार महसूल व कृषी विभागाने तातडीने पावले उचलली.कृषी सहाय्यक, तलाठी, ग्रामसेवक व पोलीस पाटील यांनी गावागावांत जाऊन प्रत्यक्ष शेतात पीक पाहणी केली. नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून फॉर्म वेळेवर भरून घेतले.त्यानुसार पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी ५,००० रुपयांची तातडीची मदत थेट त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली.ही प्रक्रिया जलद झाल्याने शेतकऱ्यांचा प्रशासनावरील विश्वास वाढला आहे.

ऊसतोड मजुरांच्या कुटुंबियांसमवेत खा.धनंजय महाडिक यांची दिवाळी

कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)-

ऊस तोडणी कामगारांसोबत खासदार धनंजय महाडिक, आमदार अमल महाडिक आणि भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी दिवाळीचा आनंद घेतला. छत्रपती राजाराम सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर राहणाऱ्या २५० ऊसतोडणी मजुरांच्या कुटुंबांना साडी, कपडे, फराळ आणि मिठाईचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून ऊस तोड मजुरांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न झाला.

या ऊस तोडणी मजुरांनाही दिवाळी साजरी करता यावी, यासाठी भारतीय जनता पार्टीने राज्यभर उपक्रम सुरू केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाची सुरवात केली. त्यानंतर खासदार धनंजय महाडिक आणि आमदार अमल महाडिक यांच्या पुढाकारातून, कसबा बावडा इथल्या छत्रपती राजाराम सहकारी साखर कारखाना स्थळावर राहणाऱ्या ऊसतोड मजुरांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली.



नामदार श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री-महाराष्ट्र राज्य



नामदार श्री. एकनाथजी शिंदे
उपमुख्यमंत्री-महाराष्ट्र राज्य



नामदार सुनेत्राताई पवार
उपमुख्यमंत्री-महाराष्ट्र राज्य



मा. आमदार श्री. राजेश पाटील





गोकुळ दुध संघाच्या चेअरमनपदी निवड झालेबद्दल
मा. आमदार श्री. राजेश पाटील यांचे
हार्दिक अभिनंदन

छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडीचे सन्माननीय संचालक



मा. श्री. अजित शशिकांत नरके | मा. श्री. अंबरीसिंह संभव घाटगे | मा. श्री. कर्णसिंह संभवसिंह गायकवाड | मा. श्री. चेतन अरुण नरके | मा. श्री. अमरसिंह शहाजी पाटील | मा. श्री. रणजितसिंह कृष्णराव पाटील | मा. श्री. शहुजी पी. एन. पाटील | मा. श्री. विरेंद्र संजय मंडलिक | मा. श्री. मदन बाबुराव देसाई | मा. श्री. अजित पांडुरंग पाटील | मा. श्री. रणजितसिंह दिलीपराव पाटील

निर्धार

कोल्हापूर जिल्ह्यातील साडेपाच लाख
दूध उत्पादक शेतकरी कुटुंबांना
आर्थिक स्थैर्य देण्याचा...!

श्री. बाबासाहेब पाटील-आसुर्लेकर
अध्यक्ष-कोल्हापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

श्री. राजवर्धन निंबाळकर
जिल्हाध्यक्ष-भारतीय जनता पार्टी-ग्रामीण

श्री. विजय बलुगडे
जिल्हाध्यक्ष-शिवसेना

श्री. समित कदम
युवा प्रदेशाध्यक्ष-जनसुराज्य पक्ष

कुस्ती क्षेत्रातील प्रेरणादायी व्यक्तिमत्व –पै. अमृत मामा भोसले

मुंबई कामगार केसरी, नरके केसरी, कोल्हापूर महापौर केसरी, सांगली महापौर केसरी, शिरगुप्पी केसरी, राष्ट्रीय विजेता, उपमहाराष्ट्र केसरी,उत्कृष्ट वस्ताद पुरस्कार,फाय फाँडेशन पुरस्कार असे अनेक पुरस्कार प्राप्त तसेच कोल्हापूर जिल्हा व शहर राष्ट्रीय तालीम संघाचे वरिष्ठ उपाध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे खजिनदार,पंचगंगा नदी केंदाळ मुक्तीसाठी अग्रस्थानी असणारे, पूरग्रस्त नागरिकांना स्थलांतरासाठी व त्यांचे पुनर्वसनासाठी कायम अग्रेसर असणारे, महाराष्ट्र केसरीचे अधुरे स्वप्न आपल्या शिष्यांनी पूर्ण करावे म्हणून व्यंकोबा मैदान येथे जवळपास शंभर हून अधिक पैलवानांना मार्गदर्शन करून एक सशक्त आणि बलवान पिढी निर्माण करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणारे, कोणत्याही प्रकारची राजकीय पार्श्वभूमी नसलेले, बुध्दी चातुर्याने इचलकरंजी नगरपालिका शिक्षण मंडळाचे सभापती पद, सलग चार वेळा नगरसेवक पद तसेच भाजपाचे तत्कालीन इचलकरंजी शहरचे अध्यक्ष पद भूषविणारे कुस्तीसम्राट पै. अमृत मामा भोसले यांचा आज शुक्रवार,ता.१३ रोजी वाढदिवस. त्यानिमित्त...



कोल्हापूर जिल्हातील कागल तालुक्यातील गोरंबे हे अमृत मामाचे मूळ गाव. वडील कै.पांडुरग कृष्णा भोसले नावाजलेले पैलवान होते.गावात कोरडवाहू तीन एकर शेती. सतत पावसाच्या पाण्याची अनिश्चितता. त्यामुळे वडील आपल्या बहिणेकडे इचलकरंजीला उदरनिर्वाहासाठी आले. आई मालुताई यांनी मोठ्या कष्टाने, जिद्दीने पाचही मुलांचा संभाळ केला. भाऊ तानाजी, बहीण सुमन, कमल, छाया व स्वतः मामा ही पाचही भावंडे जगताप तालमीजवळ १० बाय १० च्या खोलीत राहून लहानाची मोठी झाली. या सर्व भावंडामध्ये सर्वात लहान अमृत (मामा). यापैकी एका तरी मुलाला पैलवान करायचे हे वडिलांचे स्वप्न होते. ते मामाच्या रुपाने पूर्ण झाले.यामध्ये बहीण कमलची खूप साथ लाभली. या बहिणीनी खुराक तयार करून देणे, वेळेला बदाम नसेल तर शेंगदाण्याची थंडाई करून दिली तसेच अमृत मामांच्या जडण-घडणीत मोठमोठ्या लोकांचे योगदान मिळाले आहे.यामध्ये प्रामुख्याने शामराव फडके, रत्नापाण्णा कुंभार, कल्लापाण्णा आवाडे , बापूसाहेब गाडे, उत्तमराव पाटील, गणपतरावं फारणे, प्रकाश खंजिरे, बाळ दादा गायकवाड यांचा समावेश आहे. अमृत मामांनी आपल्या एकूण कारकीर्दीत ४०० हून अधिक मैदानी कुस्त्या केल्या आहेत. त्यापैकी काही निवडक स्मरणात राहणाऱ्या कुस्त्याची आजही आठवण झाली की अमृत मामांच्या डोळ्यात पाणी येते. मामांचे वडील इचलकरंजीमध्ये जॉबरचे काम करायचे.त्यावेळी एल. के .मलाबादे यांनी इचलकरंजीमध्ये पुकारलेला ५५ दिवसांचा संप त्यावेळी घरी खाण्यासाठी काहीही नव्हते.त्यावेळी अमृतमामा यांनी कोडोलीला जे मैदान झाले आणी या मैदानात जीवाच्या आकांताने केलेल्या दोन कुस्त्या व त्यामधून मिळालेले ४५ रु.मानधन ज्यावेळी आईच्या हातात ठेवले. त्यावेळी झालेला आनंद. १९९२ साली महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करताना मिळालेले पाहिले नॅशनल मेडल. ही स्पर्धा जिंद हरियाणा येथे झाली होती. त्यावेळी झालेला आनंद. स्व.आमदार रत्नापाण्णा कुंभार यांच्या उपस्थितीत व्यकोबा मैदान येथे झालेली कुस्ती. याठिकाणी राफिक शेख याला अस्मान दाखविले. त्यावेळी झालेला आनंद. कर्नाटकातील बेळगाव येथे श्री केसरीसाठी जवळपास सव्वातीन तास झालेली लढत यावेळी झालेला आनंद. २००० साली जालना येथे झालेली महाराष्ट्र केसरी कुस्तीस्पर्धेसाठी झालेली लढत मनाला चटका लावून गेली. सलग १० वर्षे महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी कोल्हापूर जिल्ह्याचे केलेले प्रतिनिधित्व.अमृत मामांनी त्यांच्या कारकीर्दीत ८ आंतरराष्ट्रीय अवॉर्ड मिळविले. इचलकरंजी शहरातील साध्या मातीच्या आखाड्यातून त्यांच्या कुस्ती प्रवासाला सुरुवात झाली. ग्रामीण भागातील माती, कठोर सराव आणि अंगातील नैसर्गिक ताकद याच्या बळावर त्यांनी स्वतःला घडवले. त्या काळात सुविधा कमी होत्या. पण जिद्द प्रचंड होती. गावातील आखाडा, कोल्हापूर परिसरातील कुस्तीचे वातावरणाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार दिला.त्यांच्या कुस्त्यांमध्ये केवळ ताकद नव्हती, तर बुद्धिमत्ता आणि अभ्यासपूर्ण खेळही होता. म्हणूनच महाराष्ट्रासह कर्नाटकात कुस्ती प्रेमींमध्ये त्यांची मोठी लोकप्रियता निर्माण झाली. मैदानात अमृत मामा भोसले जेव्हा एंट्री करत, तेव्हा कुस्तीशौकीन जल्लोष करायचे.

पै.अमृत मामा भोसले यांनी देशातील शेकडो नामांकित मल्लांना पराभूत केले. अनेक मोठ्या मैदानांवर त्यांनी गदा जिंकत आपले वर्चस्व सिध्द केले. त्यांच्या मेहनतीची आणि सातत्याची साक्ष आहे. सन १९९२ ते २००५ या असे एक तप त्यांनी महाराष्ट्राच्या कुस्ती क्षेत्रात अधिराज्य गाजवले. त्यांच्या कुस्त्यांना हजारोंच्या संख्येने प्रेक्षक उपस्थित राहत असत. मैदानात त्यांचे नाव जाहीर होताच वातावरणात उत्साह निर्माण व्हायचा. कुस्ती रसिक त्यांच्यावर अक्षरशः प्रेम करत होते. आजही ग्रामीण भागातील अनेक ज्येष्ठ कुस्ती शौकिन त्यांच्या कुस्त्यांच्या आठवणी अभिमानाने सांगताना दिसतात.मोठे यश मिळूनही पै.अमृत मामा भोसले यांच्या स्वभावात कधीही गर्व दिसला नाही. साधेपणा आणि नम्रता ही त्यांची खरी ओळख राहिली. त्यांनी नेहमीच मातीशी आणि सामान्य माणसांशी असलेली आपली नाळ जपली. सुमारे २० वर्षांपूर्वी त्यांनी सक्रिय कुस्तीतून निवृत्ती घेतली. मात्र त्यांनी आखाडा सोडला नाही. इचलकंजी येथे व्यंकोबा मैदान येथे त्यांनी नव्या पिढीतील मल्ल घडवण्याचे मोठे कार्य सुरू आहे. पूर्वी या भागातील होतकरू मल्लांना कोल्हापूर किंवा पुणे येथे जाऊन सराव करावा लागत असे. आर्थिक अडचणींमुळे अनेकांचे स्वप्न अपूर्ण राहत होते. ही गरज ओळखून पै.अमृत भोसले यांनी ग्रामीण भागातच दर्जेदार प्रशिक्षणाची व्यवस्था उभी केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो मल्ल तयार झाले असून अनेक मल्ल राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर चमकत आहेत.

महाराष्ट्राच्या पारंपरिक कुस्ती संस्कृतीचा गौरव वाढविणाऱ्या आणि कुस्ती क्षेत्रात आपल्या दमदार कामगिरीमुळे खऱ्या अर्थाने कुस्तीसम्राट म्हणून म्हणून पै. अमृत मामा भोसले यांची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. मामांचा हा इतिहास हजारो युवा वर्गासाठी प्रेरणादायी आहे. पै. अमृत मामा भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा.

– जयवंत मोरे, सांगली

प्रधानमंत्री आवास योजनेतील आज ८०० घरांचे हस्तांतरण

आम. शशिकला जोल्ले यांची माहिती

निपाणी, ता.१२(प्रतिनिधी)–

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत निपाणी-पट्टणकुडी परिसरात उभारण्यात येत असलेल्या गृहप्रकल्पातील घरांचे शुक्रवारी १३ नोव्हेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवनात वितरण करण्यात येणार आहे.यासाठी पात्र लाभार्थ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन आश्रय समितीच्या अध्यक्षा आम. शशिकला जोल्ले यांनी पत्रकाद्वारे केले आहे.



पत्रकात म्हटले आहे की, आपल्या प्रयत्नांमुळे आणि अथक परिश्रमांमुळे या महत्त्वाकांक्षी गृहप्रकल्पाला सुरुवात झाली असून, आता हा प्रकल्प अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. प्रत्येक गरीब व पात्र कुटुंबाला स्वतःच्या हक्काचे घर मिळावे आणि त्यांचे जीवन सुखकर व्हावे, हाच माझा प्रमुख उद्देश आहे.या महत्त्वाकांक्षी गृहप्रकल्पांतर्गत एकूण १,८१२ घरांची उभारणी करण्यात येत असून, त्यापैकी आतापर्यंत सुमारे ८०० घरांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. प्रत्येक सामान्य नागरिकाला स्वतःच्या घराचा आधार मिळवून देणे, हेच या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.या गृहप्रकल्पांतर्गत निर्धारित चार हप्त्यांची रक्कम भरलेल्या अर्जदारांची पात्रता तपासणी आश्रय समितीमार्फत यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली आहे. संबंधित अर्जदारांची आवश्यक कागदपत्रे तसेच शासनाच्या निर्धारित निकषांनुसार सखोल पडताळणी करून पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात आली आहे.आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळाले असून, पहिल्या टप्प्यात पात्र ठरलेल्या ८०० लाभार्थ्यांना लकी ड्रॉच्या माध्यमातून ८०० घरांचे वितरण करण्यात येणार आहे.सर्वसामान्य कुटुंबांचे स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करणे, हे माझे कर्तव्य आहे आणि आज त्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडत आहे.

घरकुल योजनेतील सर्व लाभार्थ्यांनी उपस्थित रहावे

लक्ष्मणराव चिंगळे यांचे आवाहन

निपाणी,ता.१२(प्रतिनिधी)–

निपाणीतील बेघर गरजू नागरिकांसाठी महत्त्वाकांक्षी असलेल्या घरकुल योजनेतील लाभार्थ्यांचा निवड प्रक्रिया अंतर्गत १३ रोजी राजा शिव सांस्कृतिक भवनात होणाऱ्या लकी ड्रॉ मध्ये सर्व ८०० लाभार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन चिक्कोडी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष लक्ष्मणराव चिंगळे यांनी पत्रकार परिषदेत केले.



पत्रकार परिषदेत बोलताना लक्ष्मणराव चिंगळे,शेजारी सुजय पाटील व इतर मान्यवर.

ते म्हणाले की प्रधानमंत्री आवास योजना व राजीव गांधी गृहनिर्माण योजना अंतर्गत घरकुल वाटपासंदर्भात अनेक महिने पात्र-अपात्र या प्रक्रियेमध्ये योग्य लाभार्थ्यांना घरकुल मिळण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यामुळे या योजनेअंतर्गत ज्या ज्या लाभार्थ्यांनी चार हप्ते पूर्ण भरले असे १०२१ लाभार्थी होते. त्यातून नगरपालिका प्रशासकीय यंत्रणेने जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार व पालिका आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली पात्र लाभार्थ्यांची यादी प्रसिद्ध केली. परत त्यामध्ये आणखीन पारदर्शकता यावी म्हणून पुन्हा अपात्र यादीतील पडताळणी करून ७६८ आणि ३२ असे एकूण ८०० घरांचे लाभार्थी निश्चित करण्यात आले आहेत. या ड्रॉ मध्ये सर्व ८०० लाभार्थ्यांनी सहभागी व्हावे. ब्लॉक व घर क्रमांक यावेळी निश्चित केले जाणार आहे.या योजनेमध्ये केंद्र सरकारचे दीड लाख आणि कर्नाटक सरकारचे एक लाख ८० हजार व लाभार्थ्यांचे ६० व ५० हजार व उर्वरित तीन लाख रुपये राष्ट्रीयकृत बँकेतून कर्ज स्वरूपात रक्कम उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ड्रॉ झाल्यानंतर ही यादी कर्नाटक राजीव गांधी हाऊसिंग बोर्डाकडे पाठवण्यात येईल. त्यांच्याकडून मान्यता मिळाल्यानंतर या घरकुलांचे हक्कपत्र वितरण जिल्ह्याचे पालकमंत्री सतीश जारकिहोळी, खासदार प्रियांका जारकीहोळी, आमदार शशिकला जोल्ले यांच्या उपस्थितीत होणार आहे. यावेळी सुजय पाटील, किरण कोकरे, अल्लाबक्ष बागवान,अस्लम शिकलगार, झाकीर कादरी,सुभाष कांबळे, अँड संजय वव्हाण, संदीप कामत,शरीफ बेपारी, युवराज पोळ, दीपक सावंत लोकेश घस्ते, प्रवीण हेगडे उपस्थित होते.

अथणी शुगर्सकडून ४,२०० रुपये ऊस दर जाहीर

पहिला हप्ता ३,९०० रुपये

सरूड, ता.१२ (प्रतिनिधी)–

शाहुवाडी तालुक्यातील बांबवडे-सोनवडे येथील अथणी शुगर्स साखर कारखान्याने सन २०२६-२७ च्या चालू गळीत हंगामासाठी प्रतिटन ४,२०० रुपये ऊस दर जाहीर केला असल्याची घोषणा कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर श्रीनिवास पाटील यांनी केली.

ऊस गाळप झाल्यानंतर पहिला हप्ता म्हणून प्रतिटन ३,९०० रुपये देण्यात येणार आहेत. कारखाना बंद झाल्यानंतर दुसरा हप्ता म्हणून प्रतिटन १०० रुपये दिले जातील. तसेच साखरेचा वर्षअखेरचा सरासरी दर प्रतिकिलो ४५ रुपयांपेक्षा अधिक राहिल्यास तिसरा अंतिम हप्ता म्हणून प्रतिटन २०० रुपये दिवाळीपर्यंत देण्यात येणार आहे. असा एकूण ४,२०० रुपये प्रतिटन ऊस दर देण्याचे व्यवस्थापनाने निश्चित केले आहे.याशिवाय सभासद व बिगरसभासद ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना दिवाळी सणानिमित्त सवलतीच्या दरात प्रतिमेट्रिक टन एक किलो साखर देण्यात येणार असल्याचेही पाटील यांनी सांगितले.

सन २०२६-२७ च्या गळीत हंगामासाठी कारखान्यातील सर्व तयारी पूर्ण झाली असून कारखाना नुकताच सुरू करण्यात आला आहे. यंदाच्या हंगामात ५ लाख ५० हजार मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.


अथणी शुगर्सच्या माध्यमातून एफआरपीपेक्षा जादा ऊस बिल तसेच तोडणी व वाहतूक बिले वेळेत देण्याची परंपरा कायम राखण्यात आली आहे. यंदाही इतर कारखान्यांच्या तुलनेत ऊस उत्पादकांना अधिक दर देण्याचा व्यवस्थापनाचा मानस आहे. चालू वर्षी राज्यात दुष्काळाचे सावट असल्याने ऊस उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. साखर कारखानदारीसमोर विविध अडचणी असतानाही त्यावर मात करून कारखान्याची वाटचाल सुरू आहे. त्यामुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी आणि वाहतूकदारांनी जास्तीत जास्त ऊस पुरवठा करून सहकार्य करावे, असे आवाहन पाटील यांनी केले.

यावेळी उदयसिंगराव गायकवाड सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष मानसिंगराव गायकवाड, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक रणवीरसिंग गायकवाड, कारखान्याचे युनिट हेड रवींद्र देशमुख, कार्यकारी संचालक भगवान पाटील, मुख्य लेखाधिकारी भानुदास पाटील, मुख्य अभियंता शिवाजी बंडगर, मुख्य केमिस्ट मारुती पाटील, मुख्य शेती अधिकारी विनोद पाटील, प्रशासन अधिकारी जगन्नाथ जोशी, लेबर ऑफिसर उमेश हांडे, सुरक्षा अधिकारी पवार यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख व कर्मचारी उपस्थित हेते.

स्वीकृत नगरसेवकपदी आप्पासो पाटील

पेठवडगाव, ता.१२

येथील नगरपालिकेच्या स्वीकृत नगरसेवकपदी आप्पासो जगन्नाथ पाटील यांची निवड झाली. निवडीनंतर यादव आघाडीच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष केला.



नगराध्यक्षा विद्याताई पोळ यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. यादव आघाडीच्या गटनेत्या विद्याताई पोळ यांनी पाटील यांच्या अर्जाची शिफारस केली होती. या अर्जाची इचलकरंजी उपविभागीय अधिकारी दीपक शिंदे यांनी पडताळणी करून पुढील कार्यवाहीसाठी पालिकेकडे पाठविला होता. यामध्ये पाटील यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने पीठासन अधिकारी नगराध्यक्षा विद्याताई पोळ यांनी नामनिर्देशीत सदस्य म्हणून आप्पासो पाटील यांच्या नावाची घोषणा केली.

यावेळी उपनगराध्यक्ष अभिजित गायकवाड, नगरसेवक गुरुप्रसाद यादव, प्रवीण पाटील, विशाल वडगावे, जवाहर सलगर, शितल कोळी, निवास धनवडे, मिलिंद सनदी, सुरेखा अनुसे, धनश्री पोळ, वर्षा पोवार, रुपाली माने, कल्पना भोसले, सुषमा पाटील, नीला जाधव, सुमन कोळी,पदाधिकारी उपस्थित होते. मुख्याधिकारी सुमित जाधव यांनी सभेचे कामकाज पाहिले.

संकेश्वरात उसाला आग लागून ५ लाखांचे नुकसान

संकेश्वर, ता.१२(प्रतिनिधी)–

संकेश्वर व्हळी हिटणी रस्त्याजवळ बसवाण मंदिराजवळच्या साडे तीन एकर शेतातील उसाला आग लागून अंदाजे ५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.



व्हळी हिटणी रस्ता जवग बसवाण मंदिराजवळ असलेल्या बसवाणी कर्देगौडा, प्रदीप कर्देगौडा, महादेवी मलकट्टी, संतोष मलकट्टी, सिध्दप्पा केरीमनी यांच्या साडेतीन एकर शेतातील उसाला आग लागून ५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. आग लागल्यांने अग्निशामक दलाला पाचारण करून आग आटोक्यात आणण्याचे शर्थीचे प्रयत्न करण्यात आले पण वाऱ्याच्या झोतात ऊस जळून खाक झाला.घटनास्थळी तलाठी तसेच हिरण्यकेशी साखर कारखान्याच्या अधिकाऱ्यांनी भेट देऊन पंचनामा केला.ऊसाला आग लागून झालेल्या नुकसानीची भरपाई मिळवून देण्यासाठी हिरण्यकेशी साखर कारखान्यांने जळीत उसाची तोडणी केल्याचे समजते.उसाच्या फडाला नेमकी आग कशामुळे लागली ते अद्याप समजू शकलेले नाही.

बेडकिहाळला ३६ एकरातील ऊस जळाला

बेडकिहाळ, ता.१२(वार्ताहर)–

येथील गळतगा रस्त्याच्या पश्चिमेस असलेल्या नाईक, कोणाप्प, काकडे, बाबर,घोडके, कोडी मळा परिसरातील २२ शेतकऱ्यांच्या सुमारे ३६ एकरातील ऊस विद्युत शॉर्टसर्किटने आग लागून मोठे नुकसान झाले.



जळालेल्या उसाची पाहणी करून पंचनामा करताना तलाठी एस.एन नेम्मांन्नवर, अग्निशामक अधिकारी व शेतकरी.

सुरूवातीला नाईक यांच्या उसाच्या फडात आग लागली.त्यांनतर लागलेली आग लक्षात येताच परिसरातील शेतकऱ्यांना एकत्रित करून आग विझविण्यासाठी प्रयत्न केले.मात्र वारा सुटल्याने आग वेगाने पसरतच गेली.त्यामुळे एका पाठोपाठ असलेल्या ऊसाचे प्लॉट्स जळत गेले. यामध्ये भाऊसाहेब लट्ठे, चंद्रकांत चव्हाण, रविंद्र चव्हाण, अर्चना चव्हाण, सारिका चव्हाण, वसंत बाबर, जयवंत बाबर, कांतीनाथ चौगुले, पंढरीनाथ बाबर, मुरली बाबर, गजानन काकडे, उत्तम घोडके, विलास घोडके, प्रकाश काकडे, महेश काकडे,नारायण काकडे, बाबुराव घोडके, पांडुरंग खोत, चंद्रकांत काकडे, महावीर पाटील, कुमार पाटील, आदगौडा पाटील,संतोष पाटील, (कोणाप्प) आदी शेतकऱ्यांचा ऊस आगीत जळून गेल्याने शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागले. तर काही शेतकऱ्यांनी पाण्यासाठी ठिबक पाणी व्यवस्था केली होती, त्या पाण्याच्या ठिबक केबलही जळून गेल्या.आग विझविण्यासाठी व्यंकटेश्वरा पॉवर प्रोजेक्ट साखर कारखान्याच्याअग्नि बंबासह सदलगा येथील अग्निशामक दलाचा बंब हे घटनास्थळी दाखल होवून आग विझवण्याचा प्रयत्न केला. आगीचा पंचनामा ग्राम तलाठी एस. एन. नेम्मांन्नवर, सदलगा हेस्कॉम अधिकारी एस.मडीवाळ, शेती विभागाचे अधिकारी कौजलगी, आर.जी डोमणे, मलगौडा पाटील, बाळासाहेब शिंदे आदीना केला.

निढोरीत १५ ते २० एकरातील ऊस जळाला

लाखो रुपयांचे नुकसान : सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला

निढोरी,ता.१२(वार्ताहर)–

येथील गावंदर परिसरात उसाला लागलेल्या आगीत अंदाजे १५ ते २० एकरातील ऊस क्षेत्र जळून खाक झाले.या दुर्घटनेत हातातोंडाशी आलेले पीक आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. मात्र, अग्निशमन दल आणि ग्रामस्थांनी वेळीच दाखवलेल्या सतर्कतेमुळे परिसरातील जनावरे आणि राहत्या घरांना आगीची झळ पोहोचली नाही, ज्यामुळे मोठा अनर्थ टळला.आगीचे कारण समजू शकले नाही.

गावंदर परिसरात ज्या ठिकाणी ही आग लागली, त्याच्या अगदी जवळच शेतकऱ्यांची जनावरे, गोठे आणि काही शेतकऱ्यांची राहती घरे आहेत. वाऱ्यामुळे ही आग वेगाने पसरून वस्तीपर्यंत पोहोचण्याची दाट शक्यता निर्माण झाली होती.यामुळे नागरिकांच्या जीवितासह जनावरांच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न उभा राहिला होता.आगीची माहिती मिळताच निढोरीचे माजी सरपंच अमित पाटील यांनी मुरगूड नगरपालिका आणि हमिदवाडा साखर कारखान्याच्या अग्निशमन दलाला तातडीने पाचारण केले. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी दाखल होत शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. यावेळी स्थानिक युवकांनीही आग विझविण्यासाठी सहकार्य केले. या घटनेत निढोरी परिसरातील अनेक शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.यामध्ये बाळासो आपासो पाटील, संदीप संपत पाटील, सुनिल पाटील, जयश्री पंडित मगदूम, रामचंद्र जांभळे, एम.पी.कांबळे,शशिकांत पाटील,एम. आर.मगदूम, विश्वास पाटील, सातापा सुतार यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र शासन,
कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, कोल्हापूर
ई निविदा सुचना क्र.५० सन २०२६-२७

खालील कामाचे " ब- १ " नमुन्यातील ऑनलाईन निविदा कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, कोल्हापूर हे ई निविदा प्रणालीव्दारे पात्र निविदाकारांकडून ऑनलाईन निविदा मागवित आहेत. निविदा धारकांना सूचित करण्यात येते की, ऑनलाईनमध्ये प्रसिध्द केलेल्या व कॉन्ट्रॅक्ट डाटामधील अटी तांत्रीक स्पेसिफिकेशन व शेड्युल-बी मधील परिमाण हे बीड डाटा निविदा संचामध्ये समाविष्ट करणेत आलेले आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. **निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, कोल्हापूर यांनी राखून ठेवला आहे. कोणतीही अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.**

अ. क्र.	कामाचे नाव	निविदेचा प्रकार	कामाची अंदाजित किंमत (रू.लक्ष)	इसारा रक्कम रूपये	निविदा फी जीएसटी सह रू.	काम पूर्ण करण्याचा कालावधी	ठेकेदाराचा वर्ग (सा.बां. खातेकडील)
१	कोल्हापूर शहरत रा.म.क्र. ४ जाजल पेट्रोल पंपापासून कणेरी गिरगांव रामा १९६ कुडीत्रे फॅक्टरी रामा १७७ वाकरे फाटा ते रा.म. क्र. ४ जाजल पेट्रोल पंपापर्यंत कोल्हापूर शहर वळण मार्ग क्र. १९४ अ कि.मी. ५४/४७५ ते ५६/०० ची सुधारणा करणे ता. हातकणंगले जि. कोल्हापूर	ब-१	३२१.१७	१६१०००/-	२७५०/-	१२ महिने	सा.बां. विभागाकडील नोंदणीची आवश्यकता नाही
२	जिल्हा हद्द ते निलेवाडी नवे पारगांव, जुने पारगांव, अंबप, वडगांव ते मौजे वडगांव रा.मा. १९४-अ ला मिळणारा प्रजिमा क्रं.-९६ कि.मी.६/६५० ते ९/७०० चे रुंदीकरणासह मजबूतीकरण, गटर्स करणे. (भाग- निलेवाडी ते पारगांव)	ब-१	३१४.०१	१५८०००/-	२७५०/-	१२ महिने	सा.बां. विभागाकडील नोंदणीची आवश्यकता नाही
३	जिल्हा हद्द निलेवाडी पारगांव पाडळी अंबप पेठ वडगांव तासगांव मौजे वडगांव ते रामा. क्र. १९४/अ ला मिळणारा रस्ता प्रजिमा क्रं. ९६ कि.मी. १८/०० ते २२/०० ची रुंदीकरणासह सुधारणा करणे. ता. हातकणंगले जि. कोल्हापूर (भाग - पेठ वडगांव ते मौजे तासगांव)	ब-१	३३३.०१	१६७०००/-	२७५०/-	१२ महिने	सा.बां. विभागाकडील नोंदणीची आवश्यकता नाही
४	कोल्हापूर पट्टणकोडोली हुपरी रेंदाळ जंगमवाडी राज्यहद्दीपर्यंत रस्ता रा.मा.क्रं. १७७ कि.मी. १६७/२०० ते १७३/२०० मध्ये रस्ता मजबूतीकरणासह सुधारणा करणे. (भाग-रेंदाळ ते जंगमवाडी राज्यहद्द)	ब-१	३०२.८५	१५२०००/-	२७५०/-	१२ महिने	सा.बां. विभागाकडील नोंदणीची आवश्यकता नाही
५	विकासवाडी हलसवडे सांगवडे पट्टणकोडोली इंगळी रुई कबनूर रस्ता प्र.जि.मा.क्रं. २१ कि.मी.१५/०० ते १८/०० मध्ये रस्त्याची सुधारणा करणे(भाग-इंगळी ते रुई)	ब-१	१९६.१६	१५००००/-	१४५०/-	१२ महिने	सा.बां. विभागाकडील नोंदणीची आवश्यकता नाही
६	वडगांव लाटवडे भेंडवडे खोची ते दुधगांव आष्टा जिल्हाहद्द रस्ता प्रजिमा क्रं.१०९ कि.मी.११/५०० ते १३/३२० चे रूंदीकरणासह मजबूतीकरण करणे. (भाग - खोची ते जिल्हाहद्द)	ब-१	१६७.०४	१५००००/-	१४५०/-	१२ महिने	सा.बां. विभागाकडील नोंदणीची आवश्यकता नाही
७	कोल्हापूर पट्टणकोडोली हुपरी रेंदाळ जंगमवाडी राज्यहद्दीपर्यंत रस्ता रा.मा.क्रं. १७७ कि.मी. १५९/०० ते १६२/५०० मध्ये आरसीसी गटरचे बांधकाम करणे (भाग- पट्टणकोडोली ते तळंदगे फाटा)	ब-१	१२८.५८	१२९०००/-	१४५०/-	१२ महिने	चार व त्यावरील (सा.बां. खातेकडील नोंदणीकृत)
८	रामा क्रं.१९२ पासुन हातकणंगले ते रामा २०० ते रूई इंगळी ते रामा क्रं. १७७ ते तळंदगे रस्ता प्रजिमा क्रं. ११२ कि.मी.९/०० ते १०/५०० मध्ये मजबूतीकरणांसह सुधारणा करणे. (भाग - इंगळी वसाहत ते तळसंदे फाटा)	ब-१	११०.७२	१११०००/-	१४५०/-	१२ महिने	चार व त्यावरील (सा.बां. खातेकडील नोंदणीकृत)
९	टोप संभापुर तासगाव सावर्डे नरंदे कुंभोज दानोळी जयसिंगपुर रेल्वे स्टेशन ते प्र.रा.मा.क्र ३ ला मिळणारा रस्ता रा.मा. क्र. १९९ कि.मी. १४/५०० तं १६/२०० सुधारणा करणे व टोप कासार वाडी दरम्यान आर.सी.सी. गटर बांधणे. ता.हातकणंगले.	ब-१	७८.७२	७९०००/-	१४५०/-	१२ महिने	चार-अ व त्यावरील (सा.बां. खातेकडील नोंदणीकृत)

ई-निविदेचे वेळापत्रक

१	निविदा डाऊनलोड करणेचा कालावधी	दि. १३/११/२०२६ (सकाळी १०.०० वा.नंतर) ते दिनांक २०/११/२०२६ वेळ (१७.५५ वाजेपर्यंत)
२	निविदा पूर्व चर्चा बैठक स्थळ, दिनांक व वेळ (ऑनलाईन) काम क्र. १ ते ४.	मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग पुणे यांचे कार्यालयात दि. १७/११/२०२६ रोजी दुपारी १२-३० वाजता (ऑनलाईन)
	निविदा पूर्व चर्चा बैठक स्थळ, दिनांक व वेळ (ऑनलाईन) काम क्र. ५ ते ६.	मा. अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, कोल्हापूर यांचे कार्यालयात दि. १७/११/२०२६ रोजी दुपारी १३-०० वाजता (ऑनलाईन)
३	निविदा इसारा रक्कम निविदा शुल्क व प्रतिज्ञापत्र इत्यादीचे मुळ दस्तावेज सादर करावयाचा दिनांक व वेळ २३/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता.	१) कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, कोल्हापूर २) कार्यकारी अभियंता सा.बां. (दक्षिण) विभाग, कोल्हापूर ३) मा. अधिक्षक अभियंता. सा. बां. मंडळ, कोल्हापूर. वरील तिन्ही कार्यालयाचा पत्ता- ताराबाई पार्क, मुख्य पोष्ट कार्यालयाजवळ, कोल्हापूर. ४१६ ००३
४	तांत्रिक व आर्थिक निविदा उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ (शक्य झाल्यास)	कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालयात दिनांक २३/११/२०२६ रोजी (सकाळी १०.०५ वाजता)

टीप :- १) सर्व पात्र / इच्छूक निविदाकारांनी निविदा पत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या Main Portal "https/mahatenders.gov.in" वर enrolled करणे आवश्यक आहे. २) निविदाकारांना वर नमूद केलेल्या संकेत स्थळावर ऑन लाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरित करण्यासंदर्भात काही शंका / अडचणी असल्यास त्यांनी ईमेल support-eproc@nic.in व दूरध्वनी क्रमांक ०१२० - ४२००४६२, ०१२०-४००१००२ वर संपर्क साधावा. ३) निविदाकारानी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑन लाईन सादर करणे अनिर्वाय राहील. तसेच इसारा रक्कमेची ऑन लाईन पावती, ऑन लाईन कोरा निविदा संच, डाऊन लोड केलेली पावती स्वतःच्या नावाची गोपनियता पाळून ई निविदा वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा ऑन लाईन निविदा उघडण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. ४) निविदेचे वेळापत्रक, इतर अटी व शर्ती तसेच अनुषंगीक बदल ई निविदा पोर्टलवर "https://mahatenders.gov.in" पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई निविदा कोणतेही कारण न देता रद्द करणेचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत. ५) वरील कामांची ई निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www. mahapwd.com या इंटरनेट वरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही /-
(क्रांतीकुमार प्र. मिरजकर)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर.

आरओसी-२०२६-२७/क्र.-५/C ३७३५

भारतीय संघ अंतिम फेरीत

रायचंदानी, आर्यवीरच्या अर्धशतकांच्या जोरावर अफगाणिस्तानचा ८ गडी राखून पराभव

ओमान,ता.१२ –

एसीसी पुरुष अंडर-१९ आशिया कपच्या उपांत्य फेरीत, कर्णधार लक्ष्य रायचंदानी आणि आर्यवीर सेहवाग यांच्या दमदार अर्धशतकांच्या जोरावर भारताने अफगाणिस्तानला ८ गडी राखून पराभूत केले. या विजयासह भारताने स्पर्धेच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

आता अंतिम फेरीत भारताचा सामना कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी होईल. पहिल्या उपांत्य फेरीत बांगलादेशला ९ गडी राखून एकतर्फी पराभूत करून पाकिस्तानने अंतिम फेरीत प्रवेश केला होता. अफगाणिस्तानने भारतासमोर केवळ २२८ धावांचे लक्ष्य ठेवले होते, जे भारतीय संघाने ३७ व्या षटकात सहज पूर्ण केले.




कर्णधार लक्ष्य रायचंदानी आणि आर्यवीर सेहवाग यांनी भारतीय संघासाठी शानदार अर्धशतके झळकावली. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी ११७ धावांची भागीदारी केली.सेहवाग ५७ चेंडूंमध्ये चार चौकार आणि चार षटकारांसह ५१ धावा करून बाद झाला. त्यानंतर लक्ष्यला व्ही. के. विनीतची साथ मिळाली. विनीत आणि लक्ष्यने दुसऱ्या विकेटसाठी ७७ धावा जोडल्या. या भागीदारीने भारताचा विजय निश्चित केला.मात्र, या काळात लक्ष्यचे शतक हुकले. तो ९० चेंडूंमध्ये १३ चौकार आणि एका षटकारासह ९३ धावा करून बाद झाला. कर्णधार बाद झाल्यानंतर विनीतने खेळपट्टी सांभाळली आणि एक शानदार अर्धशतक झळकावले. त्याने ६२ चेंडूंमध्ये नाबाद ५७ धावा करून संघाचा विजय निश्चित केला.अफगाणिस्तानने भारतासमोर २२८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. कर्णधार सोहेल खानने का चौकार आणि एका षटकारासह ४४ चेंडूंमध्ये नाबाद ३६ धावा केल्या. नूर अली नियाझी आठ धावांवर नाबाद राहिला. अफगाणिस्तानने ८६ धावांत तीन गडी गमावले होते. अबिदुल्ला नादेरजानने १४, फरीदुल्ला एहसासने १३ आणि सुभान जखेलने ४४ चेंडूंमध्ये चार चौकार आणि एका षटकारासह ३१ धावा केल्या. यानंतर नोमान सलारझाई आणि शाह फैसल रहिमी यांनी चौथ्या विकेटसाठी ५७ धावांची भागीदारी केली.

दोन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ७८ चेंडूंमध्ये ५१ धावा करून नोमान बाद झाला. आमिर हमजा आपले खाते उघडू शकला नाही. ताहिर सरवारी केवळ एक धाव करू शकला. शाह फैसल रहिमीने दोन चौकारांच्या मदतीने ७२ चेंडूंमध्ये ५१ धावा केल्या. मोहम्मद अली आठ धावा करून बाद झाला. यानंतर सोहेलने नूरसोबत मिळून अफगाणिस्तानला २२७ धावांपर्यंत पोहोचवले.

भारतासाठी इशान सूदने सर्वाधिक तीन बळी घेतले. इशान व्यतिरिक्त, आर्यन सावसानीने भारतासाठी दोन बळी घेतले. काव्या पटेल, यशवर्धन चौहान आणि अर्जुन राजपूत यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

टीम इंडिया विजयी आघाडी घेणार ?



नवी दिल्ली, ता.१२ –

शुभमन गिलच्या अनुपस्थितीत कर्णधारपदाची सूत्रे हाती घेतलेला श्रेयस अय्यर न्यूझीलंडविरुद्धच्या चौथ्या एकदिवसीय सामन्यात विशेष छाप पाडण्याचा प्रयत्न करेल. या सामन्यात भारतीय संघ मालिकेत विजयी आघाडी घेण्याचा प्रयत्नात असेल. सध्या भारत पाच सामन्यांच्या मालिकेत २-० ने

शुभमनच्या अनुपस्थितीत कर्णधारपदाची सूत्रे अय्यरकडे

आघाडीवर आहे आणि संघात काही बदल करूनही, विजयासाठी एक प्रबळ दावेदार आहे. तिसरा सामना पावसामुळे रद्द झाल्याने, न्यूझीलंडकडे आता मालिका बरोबरीत आणण्याची संधी आहे. हे साध्य करण्यासाठी ते सर्वोत्तम प्रयत्न करतील.

१९ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेच्या तयारीसाठी गिल उर्वरित दोन एकदिवसीय सामन्यांमध्ये खेळणार नाही. अय्यर त्याच्या जागी भारताचे नेतृत्व करेल. कसोटी मालिकेच्या तयारीसाठी केएल राहुल आणि अंशुल कंबोज हे देखील कसोटी संघात सामील झाले आहेत. या क्रिकेटपटूंच्या अनुपस्थितीत, ऋतुराज गायकवाड, इशान किशन आणि वरिष्ठ वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज यांना संधी मिळण्याची शक्यता आहे. गिलच्या अनुपस्थितीत रोहित शर्मासोबत डावाची सुरुवात कोण करतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. भारताकडे इशान किशन आणि गायकवाड असे दोन पर्याय आहेत. रोहित या दौऱ्यातील आपली पहिली मोठी खेळी खेळण्यासाठी दृढनिश्चयी असेल. पहिल्या सामन्यात त्याला खाते उघडता आले नाही, तर दुसऱ्या सामन्यात त्याने ३० धावा केल्या होत्या. चार वर्षांपूर्वी सलामीवीर म्हणून द्विशतक झळकावल्यामुळे, डावाची सुरुवात करण्यासाठी किशन एक प्रबळ दावेदार आहे. राहुलच्या अनुपस्थितीत, त्याला यष्टीरक्षणाची जबाबदारीही सांभाळावी लागेल.जर गायकवाड मधल्या फळीत फलंदाजी करत राहिला, तर तो या संधीचा पुरेपूर फायदा घेण्याचा प्रयत्न करेल.कंबोजच्या जागी सिराजला संधी मिळण्याची शक्यता आहे. गेल्या तीन महिन्यांत सिराजने विशेष चांगली कामगिरी केलेली नाही, परंतु गेल्या आठवड्यात इंडिया अ संघासाठी चार बळी घेतल्याने त्याचा आत्मविश्वास वाढेल. आकिब नबी आणि अर्शदीप सिंग हे प्लेइंग इलेव्हनमध्ये कायम राहतील.

मैत्रीपूर्ण फुटबॉल सामन्यात न्यूझीलंडचा भारतावर ५-० ने विजय

ऑकलंड (न्यूझीलंड), ता.१२ –

कर्णधार ख्रिस वूडच्या एका आणि जेसी रँडेलच्या दोन गोलांच्या जोरावर, न्यूझीलंडने पहिल्या आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण फुटबॉल सामन्यात भारताचा ५-० ने पराभव केला. यजमान संघाने संपूर्ण सामन्यावर वर्चस्व गाजवत भारतीय संघाला एकही गोल करू दिला नाही.

न्यूझीलंडने पाचव्या मिनिटाला प्रतिहल्ल्याने आघाडी घेतली. परमवीरने चेंडू बाहेर काढल्यानंतर, रँडेलने पेनल्टी बॉक्समध्ये परत प्रवेश केला, जिथे चेंडू भारतीय बचावपटू बिजय वर्गीसला लागून गोलपोस्टमध्ये गेला. रँडेलने भारतीय बचावफळीला सतत त्रास देत, पहिल्या हाफच्या ३४व्या आणि ४३व्या मिनिटाला गोल करून आपल्या संघाची आघाडी ३-० पर्यंत वाढवली.

ख्रिस वूडनेही दुसऱ्या हाफमध्ये गोल केला. त्याने ५७व्या मिनिटाला कॅलन इलियटच्या क्रॉसवर एक शानदार हेडर मारला.७५ व्या मिनिटाला भारतीय संघाच्या अडचणी आणखी वाढल्या, जेव्हा लियाम गिलियनच्या क्रॉसवर लॅकलन बेलीसने एका अप्रतिम हाफ-व्हॉलीने गोल करून संघाला ५-० अशी आघाडी मिळवून दिली. पेनल्टी बॉक्समध्ये आकाश मिश्रने मॅथ्यू शेरिडनचा प्रयत्न हाताने अडवल्यामुळे सामन्यात सहावा गोल होऊ शकला असता. तथापि, गोलरक्षक विशाल कैथने बिल तुइलोमाचा प्रयत्न अप्रतिमरित्या वाचवला.मात्र, तोपर्यंत भारतीय संघाला मोठे पराभव पत्करावे लागले होते. भारताचा न्यूझीलंडविरुद्ध आणखी एक मैत्रीपूर्ण सामना होणार आहे, जी यजमान संघाचे मुख्य प्रशिक्षक डीन बेझले यांच्या कार्यकाळातील शेवटची मालिका असेल.



कॉमनवेल्थ अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी अपेक्षा पाटीलची भारतीय संघात निवड

शिराळा,ता.१२ (प्रतिनिधी)–

दक्षिण आफ्रिका येथे ४ ते ६ डिसेंबर २०२६ या कालावधीत होणाऱ्या २० वर्षाखालील कॉमनवेल्थ अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी शिराळा येथील पै.अपेक्षा विठ्ठल पाटील हिची भारतीय संघात निवड झाली आहे.तिने उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर विश्वासराव नाईक कला, वाणिज्य आणि बाबा नाईक विज्ञान महाविद्यालयाचा नावलौकिक उंचावला आहे.



नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये कॉमनवेल्थ अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेच्या निवड चाचणीत अपेक्षा पाटील हिने ६२ किलो वजन गटात यश संपादन केले. या उल्लेखनीय कामगिरीचा बळावर तिने भारतीय संघात स्थान मिळवले. तिच्या यशामागे सुशीलकुमार गायकवाड यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.तिला उपप्राचार्य राजसिंह पाटील, बी. आर. दशवंत, प्राचार्य डॉ. राजेंद्र बनसोडे, संस्थेचे उपाध्यक्ष तथा नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक, संस्थेचे सचिव विश्वप्रतापसिंग नाईक, संस्थेचे अध्यक्ष भगतसिंग नाईक तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे प्रोत्साहन मिळाले.

मध्य प्रदेशमध्ये आजपासून पुरुष कबड्डी स्पर्धा

वर्धा, ता.१२–


महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाचा पुरुष कबड्डी संघ आगामी पश्चिम विभागीय आंतरविश्वविद्यालयीन पुरुष कबड्डी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी मध्य प्रदेशकडे रवाना झाला आहे.

ही स्पर्धा १३ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत सागर येथील डॉ. हरीसिंह गौर विश्वविद्यालयात आयोजिली आहे.या स्पर्धेसाठी १२ सदस्यीय पुरुष कबड्डी संघाची निवड करण्यात आली आहे. संघात निवड झाल्यामुळे खेळाडूमध्ये विशेष उत्साह दिसून आला.

डॉ. पटवर्धन यांचे नंदादीप नेत्रालय; शहरांपासून गावांपर्यंत दर्जेदार नेत्रसेवेचा विस्तार

मिरज,ता. १२ (प्रतिनिधी)–


चांगली दृष्टी ही निरोगी, स्वतंत्र आणि आनंदी जीवनासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र ग्रामीण आणि निमशहरी भागातील नागरिकांना तज्ज्ञ नेत्रसेवा, आधुनिक तपासणी सुविधा आणि योग्य वैद्यकीय मार्गदर्शन वेळेवर मिळणे अनेकदा आव्हानात्मक ठरते. ही गरज ओळखून डॉ. पटवर्धन यांच्या नंदादीप आय हॉस्पिटलने महाराष्ट्र आणि कर्नाटकातील विविध शहरांसह गावांमध्येही आपल्या नेत्रसेवा नेटवर्कचा विस्तार केला आहे.



सन १९८० मध्ये डॉ. दिलीप पटवर्धन यांच्या पुढाकारातून सुरू झालेला नंदादीपचा प्रवास आज व्यापक नेत्रसेवा नेटवर्कपर्यंत पोहोचला आहे. मेडिकल डायरेक्टर डॉ. सौरभ पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली तज्ज्ञ डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी आणि संपूर्ण नंदादीप टीमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून हा विस्तार शक्य झाला आहे. मोठ्या शहरांपुरती मर्यादित न राहता दर्जेदार नेत्रसेवा लहान शहरे आणि गावांजवळ उपलब्ध करून देणे हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे.

नंदादीपच्या शाखा नेटवर्कमध्ये सांगली,सांगली स्टँड, आष्टा, विटा, जत, आटपाडी, सांगोला, इस्लामपूर, तासगाव, पलूस आणि सावळज या ठिकाणांचा समावेश आहे. याशिवाय कोल्हापूर, इचलकरंजी, गारगोटी, रत्नागिरी, पुणे तसेच मुंबईतील बोरिवली आणि मालाड येथेही नेत्रसेवा उपलब्ध आहे. कर्नाटकातील बेळगावी, विजयापूर, बैलहोंगल आणि निपाणी येथेही नंदादीपने आपले जाळे विस्तारले आहे. या नेटवर्कमध्ये प्रमुख रुग्णालये, व्हिजन सेंटर आणि कन्सल्टिंग क्लिनिकचा समावेश आहे.


नंदादीपमध्ये सामान्य नेत्रतपासणी, दृष्टी तपासणी, मोतीबिंदू, काचबिंदू, डोळ्यांच्या पडद्याचे विकार, कॉर्नियाचे आजार, बालनेत्रविकार, चष्म्याच्या नंबरशी संबंधित समस्या, नेत्रव्यंगोपचार आणि व्हिजन थेरपी अशा विविध सेवा दिल्या जातात. मधुमेह असलेल्या रुग्णांसाठी डोळ्यांच्या पडद्याची तपासणीही महत्त्वाची मानली जाते.अत्याधुनिक उपकरणे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिक अचूक शस्त्रक्रिया करण्यावर भर दिला जात आहे. या तंत्रज्ञानाच्या मदतीने आतापर्यंत एक हजारांहून अधिक शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्याचे रुग्णालयाकडून सांगण्यात आले. ग्रामीण आणि निमशहरी भागांमध्ये नेत्रआरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध ठिकाणी मोफत नेत्रतपासणी शिबिरांचे आयोजनही केले जाते. संस्थापक डॉ. दिलीप पटवर्धन यांचा वारसा, डॉ. सौरभ पटवर्धन यांचे नेतृत्व आणि संपूर्ण टीमचे योगदान यामुळे नंदादीपचा सेवाविस्तार सुरू आहे.



लक्ष्य सेन, किदाम्बीची आगेकूच

कुमामोतो (जपान),ता.१२ –

भारतीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन आणि किदाम्बी श्रीकांत यांनी जपानमध्ये सुरू असलेल्या कुमामोतो मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या उप-उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.



कुमामोतो प्रीफे क्चरल जिम्नॅशियममध्ये लक्ष्य सेनने चायनीज तैपेईच्या ची यू जेनचा ४९ मिनिटांत २१-१९, २१-१८ असा पराभव केला. दुसरीकडे, एकेकाळी जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी राहिलेल्या किदाम्बी श्रीकांतने डेन्मार्कच्या रॅस्मस गेमकेविरुद्ध शानदार पुनरागमन करत १ तास ८ मिनिटांच्या लढतीत १८-२१, २१-१६, २४-२२ असा विजय मिळवला.

या महिन्याच्या सुरुवातीला हायलो ओपनचे विजेतेपद पटकावल्यानंतर, लक्ष्य सेन जागतिक क्रमवारीत आठ स्थानांची सुधारणा करत १० व्या क्रमांकावर पोहोचला आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता लक्ष्य आता बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर फायनल्ससाठी पात्र ठरणाऱ्या पहिल्या आठ खेळाडूंच्या यादीत स्थान मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. वंदा ही स्पर्धा ९ ते १३ डिसेंबर दरम्यान चीनमध्ये आयोजित केली जाणार आहे. मिश्र दुहेरीत, ध्रुव रावत आणि मनीषा के. यांना चायनीज तैपेईच्या ये हाँग वेई आणि निकोल गोन्झालेस चॅन या चौथ्या मानांकित जोडीकडून १६-२१, २१-१४, २१-१४ अशा फरकाने पराभव पत्करावा लागला. हा सामना ४८ मिनिटे चालला. ऑलिम्पिकपटू तनिषा क्रास्टो आणि हरिहरन अम्सकरुणन यांना चीनच्या अव्वल मानांकित जियांग झेन बांग आणि वेई या झिन या जोडीकडून २१-७, २१-९ असा पराभव स्वीकारावा लागला. पुरुष दुहेरीत, उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवण्यासाठी हरिहरन अम्सकरुणन आणि एम. आर. अर्जुन यांचा सामना जपानच्या ताकुरो होकी आणि युगो कोबायाशी यांच्याशी होणार आहे.

डीकेटीईतील स्वरदीपोत्सवाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

शास्त्रीय संगीत, भावगीते, भक्तीगीते, सिनेगीतांनी श्रोते मंत्रमुग्ध

इचलकरंजी,ता.१२–

येथील डीकेटीईच्या राजवाडा येथील डीकेटीई, पं. बाळकृष्णबुवा संगीत साधना मंडळ व आपटे वाचन मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी पाडव्याचा आनंद द्विगुणीत करणारा 'स्वरदीपोत्सव' मराठी गाण्यांचा कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. दिवाळी पाडव्यानिमित्त राजवाडा येथे आयोजित करण्यात आलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईने राजवाडा उजळून निघाला.

राजवाडा येथे आयोजित करण्यात आलेल्या आकर्षक अशा विद्युत रोषणाई, फणत्यांनी व झुंबरांनी ऐतिहासिक राजवाडा अधिकच खुलला होता. कार्यक्रमास हजारहून अधिक रसिक श्रोते व नागरिक उपस्थित होते. गिरीश कुलकर्णी व त्यांच्या शिष्यांनी गायलेल्या मराठी शास्त्रीय संगीत, भावगीते, भक्तीगीते, सिनेगीते विविध गाण्यांचावेळी सर्व श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. अनिकेत अंमगण, भार्गव कुलकर्णी, डॉ. सतीश दातार, डी. डी. कुलकर्णी, रेवती गलगले, काजल तोडकर,मृणाल देशपांडे, याज्ञी देशपांडे व



डीकेटीई संस्थेत 'स्वरदीपोत्सव' कार्यक्रमात कला सादर करताना पं.बाळकृष्ण बुवा संगीत साधना मंडळाचे कलाकार.

शिवाजी लोहार तसेच डीकेटीईचे विद्यार्थी व बालवृंदांनी आपली दर्जेदार गायनकला व वादनकला सादर करुन कार्यक्रमात रंगत भरली.तर मेंगलोरहून किरण हेगडे यांनी बासरी वादन करुन उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली.

कार्यक्रम संपल्यानंतर राजवाड्यावर फटाक्यांची आतषबाजी आणि विद्युतरोषणाई करण्यात आली.यामुळे राजवाड्याचे सौंदर्य खुलून दिसत होते. राजवाड्याचे नयनरम्य असे दृश्य पाहून उपस्थित सर्व श्रोते तसेच नागरिकांच्यां डोळ्यांचे पारणे फेडले गेले.या कार्यक्रमात डीकेटीईच्या आयडिया लॅब व सिव्हील विभागामार्फत तयार करण्यात आलेला फिरता आकाश कंदील लक्षवेधी ठरला होता. या कंदीलावर ऑलिंपिकमधील सुवर्णपदके,शौर्याचे प्रतिक असणारा स्मित मच्छाचे छायाचित्र, डीकेटीईचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे यांना मिळालेल्या जीवनगौरव पुरस्काराचे छायचित्र तसेच सामाजिक संदेश लिहिण्यात आले होते.सदर कार्यक्रमास डीकेटीईचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, उपाध्यक्ष प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ.सपना आवाडे, कार्यकारी संचालक रवी आवाडे, ट्रस्टी डॉ. ए.बी. सौंदतीकर, एस.डी. पाटील, अनिल कुडचे, संचालिका डॉ. ए.एल. एस. आडमुठे, उपसंचालक डॉ. यु.के. पाटील, आपटेवाचन मंदिरचे डॉ.सुजित सौंदतीकर, जवाहर कारखान्याचे व्हाईस चेअरमन बाबासाहेब चौगुले व पदाधिकारी यांच्यासह पं. बाळकृष्णबुवा मंडळाचे पदाधिकारी व कलाकार उपस्थित होते. प्रा.सचिन कानिटकर यांच्याप्रभावी सुत्रसंचालनाने कार्यक्रमाला रंगत आली. ध्वनी व्यवस्था प्रशांत होगाडे यांची होती, विद्युत रोषणाई राजू हावळ यांनी केली.

लॉरेनलाकपाम-गुंजन बॉक्सिंगच्या अंतिम फेरीत

डाकार (सेनेगल),ता.१२ –

डाकार युथ ऑलिम्पिकमध्ये भारतीय खेळाडूंची दमदार कामगिरी सुरूच आहे. बॉक्सिंगमध्ये लॉरेनलाकपाम अंबेकर मीतेई आणि गुंजन यांनी अनुक्रमे पुरुष आणि महिला गटाच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. लॉरेनलाकपामने कोलंबियाच्या इझोन जेझ्री गॉलिया अरेवालोचा ५-० अशा गुणांनी पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला, तर गुंजनने ग्रेट ब्रिटनच्या लिली बॅबेटवर ४-१ असा विजय मिळवला.

युथ ऑलिम्पिकमध्ये भारताच्या पदकांची संख्या आठ झाली आहे, ज्यामध्ये तीन रौप्य आणि पाच कांस्य पदकांचा समावेश आहे. या दोन बॉक्सर्सनी अंतिम फेरी गाठल्यामुळे, भारताची एकूण पदकांची संख्या किमान १० वर पोहोचणार हे निश्चित झाले आहे.

रविवारी डाकार येथील कॉम्प्लेक्स इब्रा मार दिओप मैदानावर, भारताच्या शौर्या अंबुरेने महिलांच्या १०० मीटर अडथळा शर्यतीत (हर्डल्स) १३.५९ सेकंदांची वैयक्तिक सर्वोत्तम वेळ नोंदवत कांस्य पदक जिंकले. युथ ऑलिम्पिकच्या अॅथलेटिक्स प्रकारात पदक जिंकणारी ती पहिली भारतीय महिला ठरली आहे. युथ ऑलिम्पिकच्या इतिहासात अॅथलेटिक्समध्ये भारताचे हे पाचवे पदक आहे.

भारतीय कुस्तीपटू तानियाने ७५ किलो वजनी गटात रौप्य पदक पटकावत, युथ कुस्तीमध्ये भारतासाठी पहिले पदक मिळवून दिले. साली बीच बेस्ट येथे झालेल्या सुवर्णपदकाच्या लढतीत, तानियाला चीनच्या मिन झाओकडून २-१ अशा फरकाने पराभव पत्करावा लागला. उपांत्य फेरीत तानियाने अमेरिकेच्या मॅटिल्डा हुबीचा ३-१ असा पराभव करून अंतिम फेरीत स्थान निश्चित केले होते.

याव्यतिरिक्त, महिलांच्या ६३ किलो ज्युडो प्रकारात खुशबू रजाकभाई दर्झादा आणि बॅडमिंटनमध्ये तन्वी पात्री यांनीही भारतासाठी रौप्य पदके जिंकली आहेत. धिनीधी देसिंगू महिलांच्या १०० मीटर आणि २०० मीटर फ्रीस्टाईल पोहण्याच्या शर्यतीत दोन कांस्यपदके जिंकली, तर तीर्थक पेगुने यांच्या २०० मीटर बटरफ्लाय प्रकारात कांस्यपदक मिळवले. एकाच युथ ऑलिम्पिक्स स्पर्धेत एकापेक्षा जास्त पदके जिंकणारी धिनीधी देसिंगू पहिली भारतीय ठरली, तर तीर्थक पेगुने या स्पर्धेत भारतासाठी पुरुषाच्या गटात पोहण्याच्या क्रीडा प्रकारात पहिले पदक पटकावले. याव्यतिरिक्त, राजकुमारी लानचेनबी चानूने महिलांच्या चंगक्कान वूशू प्रकारात कांस्यपदक जिंकले.

डाकार युथ ऑलिम्पिकमध्ये भारताला आठ पदके



महासत्ता
रंगरंग
शुक्रवार,१३ नोव्हेंबर २०२६
पान १



'मातृभूमी'च्या ट्रेलरवर नेटकरी नाराज

बॉलिवूडचा भाईजान सलमान खान याच्या बहुप्रतीक्षित 'मातृभूमी' चित्रपटाच्या प्रदर्शनाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर अखेर हा चित्रपट ४ डिसेंबर रोजी देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. नुकताच चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला. मात्र, ट्रेलर प्रदर्शित होताच सोशल मीडियावर ट्रेलरमध्ये दाखवण्यात आलेले काही संवाद, अभिनय आणि व्हिज्युअल इफेक्ट्सवरून नेटकऱ्यांनी टीकेची झोड उठवली आहे.


'मातृभूमी'च्या ट्रेलरमध्ये सलमान खान दमदार ॲक्शन सीन्स करताना झळकला आहे. मात्र, चित्रपटातील काही संवादांमुळे प्रेक्षकांनी नाराजी व्यक्त केली आहे. ट्रेलरमधील 'सिचवानमध्ये काहीतरी गडबड आहे' हा संवाद चर्चेचा विषय ठरला आहे. तर दुसऱ्या एका प्रसंगात सलमानचे पात्र चिनी सैनिकाला उद्देशून, 'चला, हा गोंधळ मिटवूया, ब्रो' असे म्हणताना दिसते.

या संवादांवर सोशल मीडिया युजर्सनी वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. एका युजरने, 'सिचवानमध्ये काहीतरी गडबड आहे भावा, हा काय मूर्खपणा आहे? युद्धाच्या वेळी कोणता सैनिक असं बोलतो?' अशी प्रतिक्रिया दिली. तर दुसऱ्या युजरने, 'सलमान भाई गंभीर चित्रपट करणार आहे की नाही?' असा थेट सवाल उपस्थित केला.

आणखी एका युजरने, 'भाई आणि त्याच्या खेळकर संवादांची कहाणी सुरूच आहे,' असे म्हटले. तर एका नेटकऱ्याने सलमाननेच चित्रपटाचे संवाद लिहिले असावेत, असा टोला लगावला. संवाद विनोदी वाटत असले तरी त्यामुळे चित्रपटाचे गांभीर्य कमी होत असल्याची टीकाही काहींनी केली.

केवळ संवादच नव्हे, तर ट्रेलरमधील अभिनय आणि अख तंत्रज्ञानाच्या वापरावरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. काही नेटकऱ्यांनी ट्रेलरमधील अख आणि तऱ्हद दर्जाहीन असल्याचे म्हणत नाराजी व्यक्त केली. एका युजरने तर सलमान खानने आता निवृत्ती घ्यावी, अशी थेट मागणीच केली आहे.

दरम्यान, 'मातृभूमी'चे दिग्दर्शन अपूर्व लाखिया यांनी केले असून, या चित्रपटात सलमान खानसोबत अभिनेत्री चित्रांगदा सिंग मुख्य भूमिकेत दिसणार आहे. हा चित्रपट २०२० मध्ये गलवान खोऱ्यात भारत आणि चीनच्या सैनिकांमध्ये झालेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे. देशसेवा करताना भारतीय जवानांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना कोणत्या परिस्थितीचा सामना करावा लागतो, हे या चित्रपटातून मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे सांगितले जात आहे.





बड्या कलाकारांचे कोट्यवधी रुपयांचे मानधन, त्यांच्या व्यक्तिगत सुविधांवरील अवाढव्य खर्च आणि वाढते निर्मिती बजेट यामुळे हिंदी चित्रपटसृष्टीचे अर्थकारण बदलू लागले आहे. शेकडो कोटी रुपये खर्चून तयार केलेल्या चित्रपटांना अपेक्षित यश मिळत नसताना कमी बजेटच्या आशयप्रधान चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई केली आहे. 'हनुमान अंश'सारख्या चित्रपटाच्या यशाने स्टारपेक्षा कथा महत्त्वाची असल्याचे पुन्हा अधोरेखित केले आहे. त्यामुळे निर्माते आता कलाकारांची निवड आणि निर्मिती खर्चाबाबत अधिक सावध झाले आहेत. या बदलत्या परिस्थितीचा हिंदी चित्रपटसृष्टीवर काय परिणाम होत आहे, याचा हा आढावा.

स्टारडमच्या ओझ्याखाली सिनेअर्थकारण!

एकेकाळी अनेक नामवंत कलाकारांची फौज असलेला चित्रपटही १०० कोटी रुपयांची कमाई करण्यासाठी थडपडत असे. त्या काळात चित्रपटाच्या प्रसिद्धीमध्ये त्याच्या भव्य बजेटचा आवर्जून उल्लेख केला जायचा. आता दोनशे ते अडीचशे कोटी रुपये खर्चून चित्रपट तयार होणे फारसे आश्चर्यकारक राहिलेले नाही. नितेश तिवारी यांच्या आगामी 'रामायण' चित्रपटाची निर्मितीही प्रचंड खर्चातून होत आहे.

कलाकारांचे वाढते मानधन, भव्य चित्रीकरण, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्रसिद्धीवरील खर्च यांमुळे चित्रपटांचे अर्थकारण बदलले आहे. मोठे बजेट म्हणजे मोठे यश, हे समीकरण मात्र वारंवार चुकीचे ठरत आहे. त्यामुळे हिंदी चित्रपटसृष्टीत आता खर्चावर नियंत्रण ठेवण्याची आणि चित्रपटाच्या आशयाला अधिक महत्त्व देण्याची चर्चा सुरू झाली आहे.

हिंदी चित्रपटसृष्टीसमोर सध्या एक विचित्र पेच निर्माण झाला आहे. एका बाजूला बड्या कलाकारांचे मानधन सातत्याने वाढत आहे, तर दुसरीकडे त्यांच्या चित्रपटांना अपेक्षित प्रतिसाद मिळलेच, याची खात्री राहिलेली नाही. कलाकारांच्या व्यक्तिगत आयुष्यातील वाद, सार्वजनिक वक्तव्ये आणि त्यांच्या प्रतिमेबाबत निर्माण होणाऱ्या चर्चांही प्रेक्षकांवर परिणाम होत असतो. आपल्या आवडत्या कलाकारांच्या चित्रपटांकडे प्रेक्षक ज्या उत्साहाने पाहतात, त्याच उत्सुकतेने त्यांच्या सार्वजनिक वागणुकीकडेही लक्ष देतात. त्यामुळे लोकप्रियता टिकविणे आणि ती चित्रपटाच्या यशात रूपांतरित करणे, या दोन वेगळ्या गोष्टी बनल्या आहेत.

स्टारपेक्षा चित्रपट मोठा!

मोठ्या बजेटच्या चित्रपटांनी अपेक्षित कमाई न केल्यामुळे निर्माते आणि वितरक अधिक सावध झाले आहेत. याउलट कमी खर्चात तयार झालेल्या काही चित्रपटांनी प्रेक्षकांच्या प्रतिसादाच्या जोरावर मोठे यश मिळविले आहे. यंदा प्रदर्शित झालेला 'हनुमान अंश' हा त्यातील उल्लेखनीय चित्रपट ठरला. नीम करोली बाबा यांच्या जीवनावर आधारित या चित्रपटाचे दिग्दर्शन विशाल चतुर्वेदी यांनी केले आहे. मोठे कलाकार किंवा प्रचंड प्रसिद्धीशोहीम नसतानाही चित्रपटाने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. सुमारे पावणेदोन कोटी रुपयांच्या बजेटमध्ये तयार झालेल्या या चित्रपटाची जागतिक कमाई ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यातच ४१९ कोटी रुपयांपुढे गेल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले. सुरुवातीला मर्यादित चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाला प्रेक्षकांचा सकारात्मक प्रतिसादामुळे पुढील आठवड्यांत अधिक चित्रपटगृहे मिळाली. मोठ्या स्टारशिवायही प्रभावी विषयाच्या जोरावर चित्रपट यशस्वी होऊ शकतो, हे त्यातून स्पष्ट झाले.

यंदा 'आवारापन-२', 'मिश्रापूर : द मूव्ही' आणि 'दृश्यम-३' यांसारख्या चित्रपटांनीही वेगवेगळ्या प्रकारच्या कथानकांमधून प्रेक्षकांचे लक्ष वेधले. दुसरीकडे आदित्य धर यांच्या 'धुरंधर' मालिकेने मोठ्या बजेटच्या चित्रपटांनाही प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळू शकतो, हे दाखवून दिले. त्यामुळे चित्रपटाच्या यशासाठी बजेटपेक्षा कथानक, सादरीकरण आणि प्रेक्षकांशी निर्माण होणारे नाते अधिक महत्त्वाचे ठरत असल्याचे दिसते.

मोठ्या बजेटचे आकर्षण कायम

कमी बजेटच्या चित्रपटांना यश मिळत असले, तरी हिंदी चित्रपटसृष्टीत भव्य निर्मितीचे आकर्षण संपलेले नाही. रणबीर कपूरची प्रमुख भूमिका असलेल्या 'रामायण' चित्रपटाचा पहिला भाग ५ नोव्हेंबरला प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटात साई पल्लवी, यश, सनी देओल आणि रवी दुबे यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. भव्य निर्मिती, दृश्यतंत्रज्ञान आणि मोठ्या कलाकारांच्या सहभागामुळे या चित्रपटाने घवघवीत यश मिळवले आहे.

याशिवाय शाहरुख खानचा 'किंग', सलमान खानचा 'बॅटल ऑफ गलवान' या प्रकल्पाशी संबंधित चित्रपट आणि रणबीर कपूरचे आगामी चित्रपटही चर्चेत आहेत. मोठ्या कलाकारांच्या उपस्थितीमुळे चित्रपटाला सुरुवातीपासून प्रसिद्धी मिळते. वितरक आणि प्रदर्शन संस्थांचे लक्षही अशा चित्रपटांकडे वेधले जाते. तथापि, मोठ्या बजेटची गुंतवणूक वसूल करण्यासाठी चित्रपटाला दीर्घकाळ चांगला प्रतिसाद मिळणे आवश्यक असते. त्यामुळे भव्य निर्मितीबरोबरच आर्थिक नियोजनाचे महत्त्व वाढले आहे.

कलाकारांच्या खर्चाचा निर्मात्यांना फटका :

चित्रपट निर्मितीच्या खर्चात कलाकारांच्या मानधनाव्यतिरिक्त त्यांच्या व्यक्तिगत सुविधांचाही मोठा वाटा असतो. यांसंदर्भात जालंधरमधील एका व्यावसायिकाचा अनुभव बोलका आहे. चित्रपट निर्मिती करण्याच्या उद्देशाने ते मुंबईत आले होते. त्यांनी दिग्दर्शक आणि नायकाची निवडही निश्चित केली होती. मात्र, नायकाचे मानधन, त्याच्यासोबत असणारा मोठा कर्मचारीवर्ग आणि इतर सुविधांचा खर्च पाहिल्यानंतर त्यांनी चित्रपट निर्मितीचा विचारच सोडून दिला.या चित्रपटात दोन नामवंत अभिनेत्रींही होत्या. त्यामुळे दररोज अतिरिक्त दोन ते तीन लाख रुपये खर्च करावे लागणार होते.

कलाकारांच्या व्यक्तिगत सुविधांवरील हा खर्च निर्मितीच्या मूळ बजेटव्यतिरिक्त होता. त्यामुळे चित्रपट तयार करण्यापूर्वीच खर्चाचा आकडा मोठा झाला होता. नव्या निर्मात्यांसाठी आशा परिस्थितीत आर्थिक जोखीम स्वीकारणे अधिक कठीण ठरते.

बडजात्यांचे आर्थिक नियोजन

राजश्री प्रॉडक्शन्स आणि सूरज बडजात्या यांच्या चित्रपटांमध्ये खर्चाच्या नियोजनाला नेहमीच महत्त्व दिले जाते. बडजात्या यांच्या आगामी चित्रपटात आयुष्मान खुराना आणि शर्वरी वाघ यांच्या प्रमुख भूमिका असून, अनुपम खेर, सुप्रिया पाठक आणि सीमा पाहवा यांसारख्या अनुभवी कलाकारांची सहभाग आहे. भव्यतेपेक्षा कौटुंबिक कथानक, व्यक्तिरेखा आणि सक्षम कलाकारांची निवड यांवर त्यांचा भर राहिला आहे. चित्रपटाच्या निर्मितीत आर्थिक शिस्त पाळल्यास अनावश्यक खर्च टाळता येऊ शकतो. कलाकारांची निवड, चित्रीकरणाचे दिवस, आवश्यक सुविधा आणि प्रसिद्धीचे नियोजन या सर्व बाबींचा विचार सुरुवातीलाच करणे आवश्यक असते. अनेक निर्माते आता याच पद्धतीचा अवलंब करण्याचा प्रयत्न करत आहेत.

अनावश्यक खर्चाला लगाम हवा :

सध्या अनेक चित्रपटांचे चित्रीकरण ५० ते ७५ दिवसांत पूर्ण करण्याचे नियोजन केले जाते. त्यानंतर डबिंग आणि प्रसिद्धीसाठी आणखी २५ ते ३० दिवस खर्च होऊ शकतात. या संपूर्ण कालावधीत निर्मात्यांना दररोज मोठी रक्कम खर्च करावी लागते. कलाकार आणि तंत्रज्ञांचे मानधन यापेक्षा हा खर्च वेगळा असतो. स्टुडिओमध्ये चित्रीकरण सुरू असतानाही अनेक कलाकार व्हॅनिटी व्हॅन वापरण्यास प्राधान्य देतात. अशा व्हॅनचे भाडे दररोज २० ते २५ हजार रुपयांपर्यंत असू शकते.

कलाकारांसोबत असणारा कर्मचारीवर्ग, त्यांची निवासव्यवस्था, प्रवास आणि इतर सुविधांमुळे निर्मिती खर्चात आणखी भर पडते.

चित्रपट दिग्दर्शक डेव्हिड धवन यांच्या मते, कलाकारांवरील अतिरिक्त खर्चाला थोडी जरी मर्यादा घातली, तरी चित्रपटाचे बजेट मोठ्या प्रमाणावर कमी करता येऊ शकते. कलाकारांच्या मानधनाबरोबच त्यांच्या सुविधांवरील खर्चाचेही योग्य नियोजन करणे आवश्यक आहे.

चित्रपटसृष्टीतील बदलत्या परिस्थितीत निर्मात्यांना आर्थिक शिस्त पाळण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. मोठ्या कलाकारांची लोकप्रियता चित्रपटाच्या प्रसिद्धीसाठी उपयोगी ठरते; परंतु ती चित्रपटाच्या यशाची हमी देऊ शकत नाही. प्रेक्षकांना आकर्षित करण्यासाठी प्रभावी कथा, चांगले दिग्दर्शन आणि दर्जेदार सादरीकरण आवश्यक असते. त्यामुळे आगामी काळात चित्रपटाच्या बजेटपेक्षा त्याच्या आशयाला अधिक महत्त्व मिळण्याची शक्यता आहे. हिंदी चित्रपटसृष्टीच्या आर्थिक भवितव्याच्या दृष्टीने हा बदल महत्त्वाचा ठरू शकतो.

■ सोनम परब



प्रियांकाने दिली 'आनंदाची बातमी'

मराठी चित्रपटसृष्टीतील गाजलेला आणि प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेणारा 'व्हेंटिलेटर' चित्रपटाला प्रेक्षकांनी भरभरून प्रेम मिळाले होते. आता तब्बल १० वर्षांनंतर या चित्रपटाचा सिक्वेल प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. बॉलिवूडची देसी गर्ल आणि या चित्रपटाची निर्माती प्रियांका चोप्रा हिने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत 'व्हेंटिलेटर २'ची अधिकृत घोषणा केली आहे.

२०१६ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'व्हेंटिलेटर' चित्रपटात गणेशोत्सवाच्या निमित्ताने एकत्र आलेल्या कामेरकर कुटुंबाची भावनिक आणि हृदयस्पर्शी गोष्ट दाखवण्यात आली होती. रुग्णालयाच्या पार्श्वभूमीवर घडणाऱ्या या कथेत कौटुंबिक नाती, त्यांच्यातील मतभेद, गंमतीजंमती आणि भावनिक प्रसंगांचा सुंदर मिलाफ पाहायला मिळाला होता.

चित्रपटातील व्यक्तिरेखा आणि त्यांच्या संवादांनी प्रेक्षकांना कधी हसवले, तर कधी भावुक केले. त्यामुळे या चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले होते. आता चित्रपटाचा दुसरा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याने चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे.

प्रियांका चोप्राने सोशल मीडियावर खास पोस्ट शेअर करत 'व्हेंटिलेटर २'ची घोषणा केली. तेच सगळे कामेरकर, पुन्हा एकदा १० वर्षांनंतर त्यांच्यातले काही गेले, काही राहिले गेलेले हसतायत आणि राहिलेले! असे पोस्टमध्ये म्हटले आहे.

पहिल्या भागातील कलाकार आणि नात्यांचा गोडवा पुन्हा अनुभवायला मिळणार का, तसेच यावेळी कामेरकर कुटुंबाचा आयुष्यात कोणते नवे प्रसंग घडणार, याचा उलगडा या चित्रपटात होणार आहे.

'व्हेंटिलेटर २'चे लेखन आणि दिग्दर्शन राजेश मापुस्कर करणार आहेत. प्रियंका चोप्रा जोनस, डॉ. मधु चोप्रा आणि राजेश मापुस्कर हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. चित्रपटाचे चित्रीकरण लवकरच सुरू होणार असल्याचे सांगितले जात आहे.

निसर्ग वेड्या कलाकाराचा रुपेरी प्रवास

झाद्रीच्या जंगलातील भटकंती ते रुपेरी पडदा असा चौफेर प्रवास करणारे संवेदनशील कलावंत कौस्तुभ प्रियवंदा शेलार यांची प्रेरणादायी जीवन गाथा.कौस्तुभ यांचा बालपण कोकणातील निसर्गरम्य देवगड येथे बराच काळ गेले. तिथली शेती फळ बागा तो त्यांच्या आजोबांच्या बरोबर फिरल्यामुळे आजोबांचे वारसा त्याला या निसर्गाशी मिळाला. यामुळे त्याला का एका वेगळ्या कलेशी ओढ निर्माण झाली. त्यांच्या घरातील इतर सदस्य विज्ञान शाखा असताना हा मात्र आपले वेगळे क्षेत्र निवडले. तसा तो लहानपणी हुशार शाळेमध्ये निबंध स्पर्धेमध्ये तो प्रथम क्रमांक घ्यायचा. इथेच त्याची लेखन वाचन अशी बीजे रोवली गेली. याच कलेच्या ओढीमुळे तो सरळ मुंबईच्या सर जेजे स्कूल ऑफ आर्ट मधून त्याने कलाशिक्षण पूर्ण केले. यानंतर त्यांनी काही काळ आज तक या न्यूज चॅनल साठी काम केले, पण चित्रपट माध्यमाची त्याला एक ओढ असल्यामुळे त्याच्यातला हा कलावंत स्वस्थ बसू देत नव्हता म्हणून त्यानी पुण्याला जाऊन सिनेमाटोग्राफी याचे रीतसर शिक्षण घेतले. त्याच्या जोडीला दिग्दर्शन तंत्र कसे असते. यासाठी त्याने शूट अ शॉर्ट हा देखील अभ्यासक्रमपूर्ण केला. यामध्ये त्याला ज्येष्ठ दिग्दर्शक समर नखाते व उमेश कुलकर्णी यांचे मार्गदर्शन मिळाले. आपण यादी म्हटल्याप्रमाणे त्यांचे लेखन यावर जे त्याची बघण्याची दृष्टी अतिशय संखोल होती आणि वाचन तर त्याचा अविभाज्य घटक होता. म्हणूनच त्याने आपल्या स्वतःच्या घराच्या ग्रंथ संग्रहालयात ३००० च्या वर विविध विषयावरचे पुस्तके आहेत. या त्याच्या वाचन समृद्धीमुळं त्याच्यात एक लेखक जागा झाला. तो इतका प्रगल्भ झाला तो लघुपट करताना त्याने दोन मोठे सिनेमांचे लेखन हे केला आहे. पुढे त्यांनी लक्ष या मालिकेसाठी सहाय्यक दिग्दर्शक आणि सिंड्रेला या चित्रपटासाठी सुद्धा सहाय्यक म्हणून काम केले आहे. या दोन विविध माध्यमांचा त्याला अनुभव प्रचंड पाठीशी आला हाताचा प्रवास चालू असतानाच त्याने आपला हेरिटेज फोटोग्राफी चालू केली की जणेकरून महाराष्ट्रातील विविध गड किल्ले त्याचा सांस्कृतिक वारसा आणि तिथल्या वास्तू रचना याचे छायाचित्रण करत त्यावरचे लेख त्यावेळच्या विविध माध्यमांमध्ये छापून आले आहेत .आजच्यासारखा त्यावेळेला सोशल मीडिया इतकं नव्हतं पण त्याने ऑर्कुट्मार्फत या सगळ्यांचा केलेला ठेवा लोकांच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्नन केला त्याचबरोबर तो व्हीएची ठिकाणी भटकंती करत असताना तिथलं प्रभास वर्णन त्याने, The 3Travel Bug या youtube चॅनलमार्फत लोकांना दाखवण्याचा प्रयत्न केला पण या सगळ्या प्रवासादरम्यान त्याच्या केंद्रस्थानी राहिला तो त्याचा निसर्ग विशेष करून सह्याद्रीचा जंगल तिथला परिसर इथे त्याने बरेच काळ वास्तव्य करून जंगलातील वन्य जीवन त्याचे महत्त्व सांगण्यासाठी त्याने , वनविभागासाठी त्याने वाघ बरस असा लघुपट केला .या लघुपटासाठी प्रचंड प्रतिसाद मिळाला या मिळालेल्या ऊर्जामुळे त्याने दुसरा वाघाचा निबंध असा एक लघुपट केला नवाजिश लोणचे असेही लघु पण त्याच्या खात्यावर जमा आहेत .२०२७ मध्ये होणाऱ्या लघुपटाच्या आंतरराष्ट्रीय महोत्सवामध्ये त्याने नवाजिश वाघ बरस आणि वाघाचे निबंधनवाजिश वाघ बरस आणि वाघाचे निबंध हे पाठवण्याची तयारी सुरू आहे या माध्यमातून लोकांचे पर्यंत हा विषय पोहोचेल अशी त्याची आशा आहे. सध्या तो सह्याद्री व्याघ्र प्रकल्प या अंतर्गत वाघ हा त्याच्या केंद्रस्थानी असून तो केवळ जंगलचा राजा नसून त्याच्या हालचाली त्याचा अधिवास जंगलातील निसर्गचक्र आणि जैवविविधतेचा सखोल अभ्यास करून वाघाचे महत्व संपूर्ण परिसंस्थेला संतुलित राखण्यासाठी कसा आहे हे त्यानी अधोरेखित केलेला प्रयत्न आहे. कौस्तुभ प्रवेदा शेलार याचा प्रवास हा केवळ एका लेखकाचा किंवा दिग्दर्शकाचा नाही तो एक निसर्ग प्रेमी मनाचा संवेदनशील छायाचित्रकाराचा वाचनाची समृद्ध परंपरा जपणाऱ्या साहित्यप्रेमीचा आणि सतत कार्यरत असणाऱ्या शोधणाऱ्या भटक्याचा प्रवास आपण यातून उघडला आहे लवकरच भविष्य काळामध्ये तो एका मोठ्या रुपेरी पडद्यासाठी तो एक वेगळं काहीतरी करेल हीच आपण एक सदिच्छा करू.



रावण साकारताना....

बहुचर्चित 'रामायण' चित्रपटाची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे. चित्रपटातील कलाकारांच्या लूकपासून त्यांच्या अभिनयापर्यंत प्रत्येक गोष्टीचे प्रेक्षकांकडून कौतुक होत आहे. मात्र, लंकाधिपती रावणाच्या भूमिकेत झळकणारा अभिनेता यश विशेष चर्चेत आहे. या भूमिकेसाठी यशने घेतलेली मेहनत आणि त्याच्या भव्य पोशाखाचा तपशील आता समोर आला आहे.

एखादी आव्हानात्मक भूमिका पडद्यावर प्रभावीपणे साकारण्यासाठी कलाकाराला प्रचंड मेहनत घ्यावी लागते. त्यातही रावणासारखी प्रभावशाली आणि भव्य व्यक्तिरेखा साकारताना अभिनयासोबतच वेशभूषेलाही तितकेच महत्त्व असते. यशने रावणाच्या भूमिकेसाठी विशेष मेहनत घेतली आहे.

चित्रपटाच्या कॉस्च्युम डिझायनर सानिया सरदारिया यांनी नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत यशच्या रावणाच्या पोशाखाबाबत अनेक रंजक गोष्टी सांगितल्या. यशला अनेकदा १६ ते २० किलो वजनाचे पोशाख परिधान करावे लागत होते. काही प्रसंगांमध्ये त्याच्या संपूर्ण पोशाखाचे वजन तब्बल ३० ते ३३ किलोपर्यंत जात होते.

यशच्या मुकुटाबद्दल माहिती देताना सानिया म्हणाल्या, सर्वात कठीण गोष्ट म्हणजे मुकुट परिधान करणे. कारण डोक्यावर थोडेसे वजन असले तरी ते खूप जड वाटते. मुकुटाचे वजन कमी करण्यासाठी आम्ही अनेक प्रयत्न केले.

त्यासाठी अनेक ३ मॉडेल्स तयार करण्यात आली. आधी मुकुटाची रचना निश्चित केली आणि त्यानंतर तो हलका करण्यावर काम केले. मात्र, त्याचे वजन १.८ किलोपेक्षा कमी करता आले नाही. हेच त्याचे सर्वात कमी वजन होते आणि तेही खूप जड होते. यशच्या चेहऱ्यावर अस्वस्थता दिसत नव्हती; मात्र इतका जड मुकुट घालणे त्याच्यासाठी कठीण होते.

जड पोशाखामुळे यशला सेटवर चालताना आणि फिरताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. चित्रीकरणाचे दीर्घ तास आणि पोशाखाचे प्रचंड वजन आणि आव्हानांनंतरही यशने संपूर्ण प्रक्रिया विनोदी पद्धतीने घेतली. तो सेटवरील वातावरण हलकेफुलके ठेवत सर्वांना हसवत असे, असेही सानिया यांनी सांगितले.

दरम्यान, 'रामायण' चित्रपटाचे कौतुक होत असतानाच काही दृश्यांवरून वाद निर्माण झाल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे चित्रपटाबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकतेसोबतच संमिश्र प्रतिक्रिया पाहायला मिळत आहेत.

महासत्ता
रंगरंग
शुक्रवार,१३ नोव्हेंबर २०२६

अबीर' चित्रपटातील 'गुडघ्याला बाशिंग बांधलं...' गाण्यात लावणीचा ठसकेबाज ठेका!

मराठी चित्रपटसृष्टीत ग्रामीण जीवनाचा बाज, नात्यांमधील भावबंध, सामाजिक वास्तव आणि मनोरंजन यांची सांगड घालणारा 'अबीर' हा आगामी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झाला आहे. चित्रपटाच्या शीर्षकाप्रमाणेच त्यातील कथानकात रंगांची उधळण, भावनांचे विविध पदर आणि नाट्यमय घडामोडी पाहायला मिळणार आहेत. चित्रपटातील गाणेही कथानकाला साजेसा रंगतदार बाज घेऊन येत आहेत. अशातच ग्रामीण वातावरण, गावातील कार्यक्रमाची लगबग आणि लावणीच्या ठेक्याने रंगणारी मैफल यांची अनुभूती देणारे 'गुडघ्याला बाशिंग बांधलं...' हे गाणे प्रदर्शित झाले आहे. 'अबीर' १८ डिसेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.



श्री. सुदेश वसंतराव झावरे पाटील यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून, शंभो एंटरटेनमेंट आणि श्री महाकाल प्रॉडक्शन्स यांनी चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. आकाश विष्णू शिंदे यांनी 'अबीर'ची पटकथा, संवादलेखन आणि दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे. या चित्रपटातील 'गुडघ्याला बाशिंग बांधलं...' या गाण्याचे बोल 'जाते जिथं जिथं बाई...' असे आहेत. या गाण्यात गावातील कार्यक्रमात आमदाराचे आगमन होते आणि त्यानंतर लावणीच्या सादरीकरणाने वातावरणात चैतन्य संचारते. नृत्यांगना मानसी शिंदे हिच्यावर हे गाणे चित्रीत करण्यात आले असून, तिच्या नृत्याविष्कारातून लावणीचा ठसका आणि अदाकारीचा नजाकतदार आविष्कार पाहायला मिळतो. गावातील कार्यक्रमाची पार्श्वभूमी, उपस्थितांची उत्सुकता आणि लावणी सुरू होताच रंगत जाणारी मैफल यांमुळे गाण्याला उत्सवी स्वरूप प्राप्त झाले आहे. वैभव देशमुख यांच्या शब्दरचनेतून गाण्याला लावणीस साजेसा बाज लाभला आहे, तर रोहित नागभिडे यांच्या संगीताने ठेक्याला धार आणि सादरीकरणाला लयबद्ध ऊर्जा दिली आहे. राधा खुडे यांच्या आवाजातील ठसकेबाज सादरीकरण गाण्याचा रंग अधिक खुलवते. सुजित कुमार यांच्या नृत्यदिग्दर्शनातून मानसी शिंदेच्या हालचाली, लयकारी आणि अदाकारी यांचा मेळ साधण्यात आला आहे. लावणीचा ठेका, संगीताची चाल आणि नृत्याची रंगत यांमुळे हे गाणे गावच्या जत्रेतील किंवा सांस्कृतिक कार्यक्रमातील जल्लोषाची आठवण करून देते. 'अबीर'मध्ये मनोरंजनासोबतच कथानकातील भावनिक आणि नाट्यमय पदर उलगडण्याची निर्माण झाली आहे. हे गाणे कथानकात महत्त्वाची भूमिका बजावणारे असून, चित्रपटाला गती प्रदान करणारे आहे.

पायल जाधव, निखिल चव्हाण, देविका दफ्तरदार, अविनाश नारकर, गणेश देशमुख, प्राजक्ता हनमघर, गार्गी फुले, यश डिंबळे, रोशन सुनील राऊत, प्रशांत नेटके, गायत्री सुदेश झावरे, रेखा दहातोंडे, राजवर्धन झावरे आणि साईराज केंद्रे यांच्या चित्रपटात भूमिका आहेत. अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनीही विशेष भूमिका साकारली आहे. छायांकन निशांत भागवत यांचे आहे, तर अमित खंडागळे आणि सचिन नागरे यांनी सह-दिग्दर्शन केले आहे. चित्रपटाच्या संकलनाची जबाबदारी निलेश गावंड यांनी पार पाडली आहे. रोहित नागभिडे यांनी संगीतासोबत पार्श्वसंगीतही दिले असून, आर्या आंबेकर, वैशाली माडे आणि राधा खुडे यांनी चित्रपटातील गीतांना आपला आवाज दिला आहे. सुजित सुरवसे यांनी रंगभूषा, स्नेहल नार्वेकर यांनी वेशभूषा, महेश गोरे यांनी कला दिग्दर्शन, विकास खंदारे यांनी ध्वनी संयोजन आणि स्वरूप जोशी यांनी ध्वनी संकलन केले आहे. विष्णू घोरपडे यांनी प्रॉडक्शनची जबाबदारी सांभाळली असून, कार्यकारी निर्माता मंगेश भिमराज जोंधळे (प्रसिद्धी आणि वितरण) आहेत. प्रोजेक्ट हेड अभय वाव्हल असून लाईन प्रोडक्शनचे काम प्रतिभा चव्हाण यांनी पाहिले आहे. अशा अनुभवी कलाकार आणि तंत्रज्ञांच्या सहभागामुळे 'अबीर'च्या संगीताची आणि चित्रपटाच्या एकूण सादरीकरणाची उत्सुकता वाढली आहे.



उपेंद्र लिमये यांच्या आवाजाची खास जादू

बालपणातील निरागस खोड्या, कल्पनाविश्वातील गमतीजमती, भीतीचे अनुभव आणि लहानग्यांच्या भावविश्वातील असंख्य रंग मोठ्या पडद्यावर अनुभवण्याची संधी 'चिकीझिंग' या आगामी मराठी चित्रपटातून मिळणार आहे. बऱ्याच काळानंतर बालकांच्या भावविश्वाला केंद्रस्थानी ठेवणारा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत असल्याने या चित्रपटाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. ग्रामीण जीवनाचा गंध, बालमनातील कल्पनांचे विश्व, खोडकरपणा आणि मनोरंजनाची धमाल यांची सांगड घालणाऱ्या या चित्रपटातील 'चला चला मामाच्या गावाला...' हे नवे गाणे व्हिडीओ पॅलेसच्या सहकार्याने प्रदर्शित झाले आहे. अभिनेते उपेंद्र लिमये यांच्या आवाजाने सजलेल्या या गाण्यात ग्रामीण बोलीचा खट्याळ बाज, मुलांच्या मनातील धाक आणि गमतीदार प्रसंगांची रंगत अनुभवायला मिळते. राजेंद्र बगाटे आणि वैभव कुलकर्णी यांच्या लेखन-दिग्दर्शनातून साकारलेला हा चित्रपट १९ नोव्हेंबरला चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे.

दीपक वाणी आणि जयप्रकाश भांडे प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती ए थीमटीम स्टुडिओ प्रॉडक्शनने केझेन्स प्रॉडक्शनच्या सहकार्याने केली आहे. सुप्रिया बगाटे यांनी निर्मितीची धुरा सांभाळली असून शब्बीर साबुवाला, रचना वोरा, हृषिकेश देशमुख, सिड विंचुरकर, करण चव्हाण आणि उमेश कुलकर्णी हे सहनिर्माते आहेत. राजेंद्र बगाटे आणि वैभव कुलकर्णी यांनी चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन केले आहे. 'चला चला मामाच्या गावाला...' या गाण्याचे खास आकर्षण म्हणजे उपेंद्र लिमये यांचा आवाज! केवळ सुरांतून शब्द गुंफण्यापुरते मर्यादित न राहता त्यांनी आवाजातील चढ-उतार, दरडावणीचा आविर्भाव, खट्याळ हास्य आणि विविध पात्रांच्या ढंगातील संवादफेक यांमधून गाण्याला जिवंत केले आहे. त्यांच्या आवाजातील नाट्यमयता गाण्याला जणू एखाद्या छोटेखानी गोष्टीचे रूप देते. सतीश तांदळे यांनी लिहिलेल्या या गीतात ग्रामीण बोलीचा अस्सल बाज, थेटपणा आणि खोडकर विनोद यांचा सुंदर मिलाफ साधला आहे. अभ्यासाकडे पाठ फिरवणाऱ्या एका खोडकर मुलाला धाक दाखवून शिस्त लावण्याच्या प्रसंगांची मांडणी रंजक शब्दांत करण्यात आली आहे. हृषिकेश कुलकर्णी यांच्या संगीताने या गाण्यातील नाट्याला सुरेल रंग चढवला आहे. वेगवान ठेका, बालगीतांचा गोडवा आणि भीतीदायक प्रसंगांनुसार बदलणारे पार्श्वसंगीत यांमुळे गाण्याची लय सतत बदलत राहते. ग्रामीण भागातील साधे घर, कौलारू घरे, मोकळी शेतं आणि निसर्गरम्य परिसर यांचा दृश्यरचनेत सुरेख वापर करण्यात आला आहे. 'चिक्या'ची भूमिका साकारणाऱ्या बालकलाकार कृष्णराज वाईंगडे याने चेहऱ्यावरील भाव, मनातील धास्ती आणि निरागस खोडकरपणा यांचा सुंदर समतोल साधला आहे. स्वप्नातून दचकून जागे होण्यापासून ते आई आणि बहिणीशी होणाऱ्या संवादापर्यंत विविध प्रसंगांत सहज अभिनयाची झलक दिसते. कॅमेऱ्याचे विविध कोन ग्रामीण परिसराची भव्यता आणि मुलाच्या मनातील भीती एकाच वेळी प्रभावीपणे टिपतात.

प्रभाकर मोरे, सेजल कोरे, अमृता सुरेश, गायत्री देशपांडे, आदित्य घनश्याम, राहुल कुलकर्णी, डॉ. सोनाली घाटणेकर आणि बालकलाकार कृष्णराज वाईंगडे यांच्या भूमिका चित्रपटातील व्यक्तिरेखांना अधिक समृद्ध करतात. प्रवीण सोनावणे यांनी छायांकनाची जबाबदारी सांभाळली असून शेखर गुरव आणि एस. शंकर यांनी संकलन केले आहे. श्रीनिधी व्यंकट आणि हृषिकेश कुलकर्णी यांच्या संगीताची जोड चित्रपटाला लाभली आहे. सुरेश कुंभार यांनी कला दिग्दर्शन आणि वेशभूषेची जबाबदारी समर्थपणे पेलली आहे. बालविश्वातील गंमत, ग्रामीण जीवनाचा गंध आणि कल्पनारम्य प्रसंगांची रंगत घेऊन येणारा 'चिकीझिंग' हा चित्रपट येत्या १९ नोव्हेंबरला चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे.

केदार शिंदे दिग्दर्शित

"गणा धाव रे" सिनेमाचा ट्रेलर प्रदर्शित !

भक्तांच्या हाकेला धावून येणारा बाप्पा आपण नेहमीच पाहिला आहे. पण यावेळी खुद्द बाप्पाच भक्तांना हाक घालणार असेल तर? देव आणि भक्त यांच्या नात्याला एक अनपेक्षित वळण देणाऱ्या या अनोख्या संकल्पनेची झलक बी-लाईव्ह्ज प्रॉडक्शन्स प्रस्तुत 'गणा धाव रे' या आगामी मराठी चित्रपटामधून पाहायला मिळणार आहे. नुकताच या कमाल सिनेमाचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून केदार शिंदे दिग्दर्शित या चित्रपटातून गणेशोत्सवाचा उत्साह, श्रद्धेचे विविध रंग आणि माणुसकीचा हळवा पदर एका रंजक



कथेतून उलगडणार आहे.

गणपती बाप्पा म्हणजे केवळ आराध्य दैवत नाही, तर प्रत्येक भक्ताच्या मनात वसलेला विश्वास! गणेशोत्सवाचा जल्लोष, बाप्पाच्या आगमनाची ओढ, मूर्ती घडवणाऱ्या कलाकाराच्या आयुष्याशी जोडलेल्या भावना आणि गणरायाशी जोडलेल्या श्रद्धेच्या विविध छटा ट्रेलरमधून अनुभवायला मिळतात.

ट्रेलरमध्ये दिसणारी निसर्गरम्य दृश्यं, गणेशोत्सवाच्या उत्साहाने भारलेलं वातावरण आणि कथेला साजेसं श्रवणीय संगीत चित्रपटाच्या भावविश्वाला अधिक समृद्ध करतं. केदार शिंदे यांच्या दिग्दर्शनातून साकारलेल्या या चित्रपटात भरत जाधव, प्रणाली घोगरे, भार्गवी चिरमुले, कल्पना सारंग, सुलभा आर्या, आशुतोष गायकवाड, पुष्कराज चिरपुटकर, राघव गाडगे आणि ओंकार पाटील हे कलाकार महत्त्वपूर्ण भूमिकांमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. सूरज सिंह, सना कुकरेजा आणि नूतन जैन यांच्या सोबतच चैतन्य राणे आणि रिचर्ड पीटर्स ह्यांनी चित्रपटाची निर्मिती केली असून, अवनी सक्सेना आणि फरहीन खान यांनी सहनिर्मितीची जबाबदारी सांभाळली आहे. तर चैतन्य राणे यांच्या कथेला कुणाल भगत आणि रविराज विजय कोलथरकर यांच्या संगीताची जोड लाभली असून, कुणाल भगत आणि वलय मालगुंड यांनी गीतलेखनातून या चित्रपटातील गाण्यांना सुरेल साज चढवला आहे.

येत्या २७ नोव्हेंबरला 'गणा धाव रे'च्या निमित्ताने बाप्पाची एक अनोखी गोष्ट मोठ्या पडद्यावर उलगडणार आहे. श्रद्धेचे विविध पैलू आणि देव-भक्तांच्या नात्याला नवा दृष्टिकोन देणारा हा चित्रपट प्रेक्षकांसाठी पर्वणी ठरणार आहे.

सख्ख्या बहिणीचं खास नातं! मृण्मयी देशपांडे आणि स्मिता तांबे पहिल्यांदाच एकत्र झळकणार

बहिणींचं नातं म्हणजे कधी मैत्री, कधी भांडणं, तर कधी न बोलताही एकमेकींच्या मनाचा ठाव घेणारी हक्काची साथ! हेच नातं अधिक जवळून अनुभवण्याची संधी बंधू या आगामी चित्रपटातून मिळणार आहे. विशेष म्हणजे, मृण्मयी देशपांडे आणि स्मिता तांबे या दोन कसलेल्या अभिनेत्री पहिल्यांदाच एकत्र पडद्यावर बहिणींच्या भूमिकेत दिसणार आहेत. चित्रपटाचं लेखन, संवाद आणि दिग्दर्शन नितीन सिंधूविजय सुपेकर यांनी केलं आहे. मबंधूफिचित्रपट येत्या २० नोव्हेंबरला प्रदर्शित होणार आहे.



बंधू हा चित्रपट दोन भावांभोवती केंद्रित असला, तरी त्यातील विविध नात्यांचं भावविश्वही तितकंच महत्त्वाचं आहे. याच भावविश्वात मृण्मयी देशपांडे आणि स्मिता तांबेने साकारलेलं सख्ख्या बहिणींचं नातं विशेष ठरणार आहे. छोट्या-मोठ्या कुरबुरींपासून एकमेकींच्या सुख-दुःखात खंबीरपणे साथ देण्यापर्यंत, या नात्यातील हळवे बंध आणि भावनिक गुंतवणूक चित्रपटातून उलगडणार आहे.

मृण्मयी देशपांडे सांगते, बंधू ही केवळ दोन भावांची गोष्ट नाही, तर कुटुंबातील नात्यांमधील प्रेम, जिव्हाळा उलगडणारी कथा आहे. या चित्रपटातील बहिणींचं नातं अतिशय आपुलकीचं आणि हळवं आहे. स्मिताताईसह पहिल्यांदाच एकत्र काम करण्याचा अनुभव खूप छान होता. एकमेकींच्या भावना समजून घेत हे नातं पडद्यावर साकारताना एक वेगळीच केमिस्ट्री अनुभवायला मिळाली. हे नातं प्रेक्षकांनाही नक्कीच भावेल, अशी आशा आहे.आपल्या भूमिकेविषयी बोलताना स्मिता तांबे म्हणते,बहिणींचं नातं खूप खास असतं.या नात्यात प्रेम असतं,भांडणं असतात, एकमेकींची काळजी असते आणि अनेकदा न बोलताही एकमेकींच्या मनातलं ओळखण्याची ताकद असते. बंधूमधून हे नातं साकारताना त्यातील विविध भावनांशी जोडून घेता आलं,याचा मला खूप आनंद आहे. हे नातं पडद्यावर साकारताना त्यातील हळवेपण आणि आपलेपणा जपण्याचा प्रयत्न केला आहे.

चित्रपटातील बंधू रामाचाहे पाळणागीत प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. निरागस प्रेमाची भावस्पर्शी अनुभूती देणारं हे पाळणागीत प्रेक्षकांना एका सुरेल भावविश्वात घेऊन जाणार आहे. या गाण्यात मृण्मयी आणि स्मिता पहायला मिळणार आहेत. अमिता घुगरी आणि शमिका भिडे यांच्या आवाजाने हे पाळणागीत अधिकच श्रवणीय झालं आहे.दोन कसलेल्या अभिनेत्रींचं सहजसुंदर अभिनय आणि बहिणींच्या नात्यातील भावनिक पदर यांमुळे बंधूमधील ही बहिणींची जोडी देखील प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.

इम्रान पुन्हा ॲक्शन मोडमध्ये!

आवारापन २'नंतर अभिनेता इम्रान हाश्मीच्या आगामी चित्रपटाची चाहत्यांना उत्सुकता लागली होती. अखेर त्याच्या आगामी 'गनमास्टर जी९' या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. ट्रेलरमध्ये इम्रानचा दमदार ॲक्शन अवतार पाहायला मिळत असून, त्याच्या या नव्या भूमिकेने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.



चित्रपटाच्या ट्रेलरची सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू आहे. इम्रान हाश्मीच्या चित्रपटांमधील गाण्यांना नेहमीच विशेष महत्त्व असते. त्याची झलक यावेळीही 'गनमास्टर जी९'च्या ट्रेलरमध्ये पाहायला मिळत आहे. दमदार ॲक्शन सीन्ससोबतच चित्रपटात एक भावनिक प्रेमकथाही उलगडणार असल्याचे ट्रेलरवरून स्पष्ट होते. ट्रेलरमधील दमदार संवाद विशेष लक्ष वेधून घेत आहेत. प्रेमासाठी कोणत्याही थराला जाणाऱ्या व्यक्तीची भूमिका इम्रान साकारताना दिसत आहे. अभिनेत्री जिनिलिया देशमुख मुख्य भूमिकेत असून, अपारशक्ती खुराना आणि अभिषेक सिंग यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत.

विशेष म्हणजे, ट्रेलरमध्ये हिमेश रेशमिया आणि असीस कौर यांच्या आवाजातील 'अफसाना बनाया आपने' हे गाणे आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. ॲक्शन आणि रोमान्सचा सुरेख मेळ या गाण्यामुळे पाहायला मिळतो.

एकूणच, ॲक्शन, रोमान्स, दमदार संवाद आणि सूडाची कथा अशा मनोरंजनाच्या सर्व घटकांनी 'गनमास्टर जी९'चा ट्रेलर सजला आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन आदित्य दत्त यांनी केले असून, येत्या २७ नोव्हेंबर रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामुळे इम्रान हाश्मीचा हा नवा ॲक्शन अवतार मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहचली आहे.

नटरंगच्या यशानंतर १७ वर्षांनी पुन्हा एकदा तोच ठेका! फुलवरा चित्रपटाची पहिली झलक,



कलावंत कोणत्याही प्रांतातील असो, कोणत्याही क्षेत्रातील असोः त्याच्या कलेच्या स्वप्नपूर्तीसाठी महत्त्वाचा असतो तो ध्यास. हा ध्यास कलावंताला अनेक अग्नीदिव्य पार करायला लावतो आणि यातून जो कलावंत तयार होतो..तो असतो कलेचा अस्सल उपासक. कलेच्या याच ध्यासाचं सार सांगताना, घुंगरु पायाला नाही गं, काळजाला बांधून नाचावं असं समर्पणाचं तत्व सांगणारा फुलवरा चित्रपटाचा टीझर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीस आला आहे. झी स्टुडिओज आणि अथांग कम्युनिकेशन्सची निर्मिती असलेला आणि रवी जाधव यांचं दिग्दर्शन असलेला फुलवरा हा चित्रपट १४ जानेवारी २०२७ रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या घोषणेपासूनच प्रेक्षकांमध्ये उत्सुकतेचं वातावरण तयार झालं आहे. ही उत्सुकता यातील कलाकारांविषयी, यातील संगीताबद्दल आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे या चित्रपटाची कथा काय असेल? याबद्दलची आहे. टीझरमध्ये कोणत्याही कलाकाराचा चेहरा रिव्हिल करण्यात आलेला नाही. हा प्रवास कुठे जल्लोषपूर्ण आहे, कुठे अडखळणारा आहे तर कुठे रस्ताने माखलेलाही आहे. या सगळ्यात कळस्याय्याय गाठणारं हर्ष , विजय यांचं संगीत. एकंदरीत लावणी कलावंतांच्या जीवनाचा एक मोठा प्रवास यातून पाहायला मिळणार याची प्रचिती या टीझरमधून येत आहे.

साधारण, १७ वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या नटरंग चित्रपटाने केवळ लावणीलाच नाही तर मराठी चित्रपटांनाही नवसंजीवनी देण्याचं काम केलं होतं. या चित्रटाने मराठी मनोरंजनविश्वात एक इतिहास रचला होता. आता पुन्हा एकदा लावणी आणि तमाशाच्या विश्वाचा प्रभावी अनुभव देण्यासाठी झी स्टुडिओज आणि रवी जाधव फुलवरा हा चित्रपट घेऊन येत आहेत.

फुलवराबद्दल दिग्दर्शक रवी जाधव म्हणतात, लावणीचा विचार करताना आपल्या डोळ्यांसमोर तिचा ठेका, रंगमंचावरची ऊर्जा आणि कलाकारांची अदाकारी येते, पण या प्रत्येक गोष्टीमागे असते ती वर्षानुवर्षांची मेहनत आणि कलेशी असलेली अतूट बांधिलकी. फुलवराच्या टीझरमधून आम्हाला हाच भाव पोहोचवायचा होता. वेगवेगळ्या वयोगटांतील मुलींच्या पायांतले घुंगरू आणि त्यांना लागलेले रक्त-माती ही त्या प्रवासाची प्रतीकं आहेत. घुंगरु पायाला नाही गं, काळजाला बांधून नाचावं!फ्हा ओळ आमच्यासाठी केवळ संवाद नाही, तर लावणी जगणाऱ्या प्रत्येक कलाकाराच्या भावनेचं प्रतिनिधित्व करते. महाराष्ट्राच्या या समृद्ध लोककलेमागची जिद्द, तिच्यावरचं प्रेम आणि ती जपण्यासाठी घेतले जाणारे कष्ट प्रेक्षकांपर्यंत पोहोचवीत, हा फुलवरामागचा प्रामाणिक प्रयत्न आहे.

लोककलेच्या विश्वात आपल्या वेगळ्या सादरीकरणाने लक्ष वेधून घेणाऱ्या द फोक आख्यानच्या हर्ष-विजय या संगीतकार जोडीने फुलवरात संगीत दिलं आहे. द फोक आख्यानचे लेखक आणि सादरकर्ते ईश्वर ताराबाई अंधारे यांनी चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद आणि गीते लिहिली आहेत. लोकसंगीताची परंपरा, त्यातील अस्सलपणा आणि आजच्या पिढीशी संवाद साधणारी मांडणी यांचा संगम या चित्रपटातून अनुभवायला मिळणार आहे. फुलवरा हा चित्रपट १४ जानेवारी २०२७ रोजी मकर संक्रांतीच्या मुहूर्तावर मोठ्या पडद्यावर दाखल होणार आहे.

आजोबा-मुलाचं नातं याविषयी दिलखुलास गप्पा मारल्या...

आजोबा आणि नातू यांच्यातील नातं हे प्रेम, विश्वास आणि निरपेक्ष मायेने विणलेलं असतं. आदि अनंतमधून अशाच जिव्हाळ्याचा नात्यांचं भावविश्व उलगडणार आहे. या चित्रपटातील कथा प्रेक्षकांना त्यांच्या स्वतःच्या कुटुंबाशी, बालपणीच्या आठवणींशी आणि आपुलकीच्या माणसांशी पुन्हा एकदा जोडणारी ठरणार आहे. या सिनेमाच्या निमित्ताने अशोक सराफ व संकर्षण कऱ्हाडे यांनी लोकसत्ता ऑनलाइनच्या डिजिटल अड्ड्याला उपस्थिती लावली होती. त्यांनी सिनेमाच्या शूटिंगचे किस्से, आजोबा-मुलाचं नातं याविषयी दिलखुलास गप्पा मारल्या.घरातील ज्येष्ठ व्यक्ती अर्थात आजोबा म्हणजे केवळ मार्गदर्शक नव्हे, तर कुटुंबाला एकत्र बांधून ठेवणारा प्रेमाचा धागा असतो. त्यांच्या सहवासातूनच मिळणारी शिकवण, छोट्या छोट्या गोष्टींतून व्यक्त होणारी माया आणि प्रत्येक प्रसंगी पाठीशी उभं राहण्याची भावना नात्यांना वेगळीच उब देतात. आदि अनंतमधून अशाच जिव्हाळ्याच्या नात्यांचं भावविश्व उलगडणार आहे. या चित्रपटातील कथा प्रेक्षकांना त्यांच्या स्वतःच्या कुटुंबाशी, बालपणीच्या आठवणींशी आणि आपुलकीच्या माणसांशी पुन्हा एकदा जोडणारी ठरणार आहे. दिग्दर्शक महेश लिमये म्हणतात, आजोबा आणि नातू यांच्यातील नातं हे प्रेम, विश्वास आणि निरपेक्ष मायेने विणलेलं असतं.या नात्यात निरागस हट्ट असतात, छोट्या-मोठ्या कुरबुरी असतात,तर कधी आयुष्यभर पुरेल असा भावनिक आधारही असतो. आदि अनंतमधून हे नातं सहज,सुंदर आणि भावनिक रूपात मांडण्याचा माझा प्रयत्न आहे. या चित्रपटातील प्रसंग पाहताना प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर हसू यावं,मनात जुन्या आठवणी जाग्या व्हाव्यात आणि आपल्या माणसांचं महत्त्व पुन्हा एकदा जाणवावं,अशी माझी इच्छा आहे.



दैनिक महासत्ता
॥ भक्ती ॥
३
शुक्रवार, दि.१३ नोव्हेंबर २०२६

नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी ।।

(पान४ वरून)

त्यांची स्वतःची जीवनकहाणीही ते अतिशय प्रांजलपणे वर्णन करतात. बालवयात त्यांच्या केलेल्या अपार विनवणीमुळे देवाने त्यांनी आणलेला नैवेद्य ग्रहण केला. त्यानंतर नामदेवांनी जणू स्वतःलाच देवाला वाहून दिले. सिंपियाचे कुळी जन्म माझा जाला। परि हेतु गुंतला सदासिवी।। राजिमाजी सिवी दिवसामाजी सिवि। आरणूक जीवी नोव्हे कदा।। सुई आणि सुतळी कात्री गज दोरा। मांडिला पसारा सदासिवी।। नामा म्हणे सिवी विठोबाची अंगी। म्हणोनिया जगी धन्य जालो।।

आपल्या व्यवसायानुसार नामदेव रात्रंदिवस शिवणकाम करीत होते, पण मन मात्र सदाशिवात म्हणजे आत्मारामात गुंतले होते. त्यांच्या कर्मात विठ्ठलच भरला असल्याने आपल्या हातून विठोबाचेच कपडे शिवले जात आहेत, असे त्यांना वाटत होते..! श्री नामदेवांच्या लौकिक चरित्रापेक्षा त्यांचे पारमार्थिक चरित्र कसे घडत गेले, याचे फार विलोभनीय चित्रण त्यांच्या अभंगगाथेतून दिसते. हे वर्णन कमालीचे पारदर्शी आहे. विठ्ठलाची अनन्यभावे भक्ती करताना त्यांच्या मनी भक्तपणाचीच सूक्ष्म अहंता नकळत आली होती. पण निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई या दैवी भावंडाचा तसेच गोरा कुंभार, विसोबा खेचर इ. एकनिष्ठ विठ्ठलभक्तांचा योग नामदेवांच्या भाग्यात होता, त्यामुळे या सर्व योगी संतांचा मेळा इंद्रायणीतील सिद्ध बेटावर जमला असता नामदेवही तेथे पोहोचले. संतमेळाव्यात सर्वच एकमेकांच्या पाया पडतात, सर्व संतमंडळी नामदेवांच्याही पाया पडली. पण आपण ज्येष्ठश्रेष्ठ विठ्ठलभक्त म्हणून नामदेवांनी कुणालाही वाकून नमस्कार केला नाही. त्यावेळचे छोट्याशा मुक्ताईचे बोल नामदेवांनीच आपल्या अभंगात लिहून ठेवले आहे, अखंड जयाला देवाचा शेंजारा। कां रे अहंकार नाहीं गेला।। मान अपमान वाढविसी हेवा। दिवस असतां दिवा हाती घेसी।।

मग मुक्ताईनेच गोरोबा कुंभारांना सर्वांचे ढोक्याचे मडके पक्के आहे ना, हे तपासायला सांगितले. गोरोबांच्या हातातले थापटणे सर्वांच्या माथ्यावर आले, तेव्हा सर्वजण संतत्वाच्या कसोटीस उतरले. पण नामदेवांच्या माथ्यावर थापटणे येताच त्यांना मात्र ते लागले. दुःख संतापाने त्यांचे मन भरून गेले. ते देवाजवळ येऊन संतांचे गाऱ्हाणे गाऊ लागतात, संतसमागम फळला रे मला'। सन्मानाचा जाला लाभ मोठा।। अतीथि आदर केला मुक्ताबाई। लांकडानें डोई फोडिली माझी।। नामदेवांचे गाऱ्हाणे ऐकून देव त्यांना समजावितात, जोडल्या सद्गुरुकृपालेश। मग सर्वत्र माझाचि प्रकाश।। तुज मज भेदाचा भाव। तो निरसोन जाईल।।

तेव्हा नामदेव देवाला म्हणतात, देवा, तुझ्या लाभासाठी सद्गुरुंची सेवा करतात, पण तू तर मला रोकडा भेटलेला आहेसच, तेव्हा सद्गुरूंची काय गरज? त्यानंतर मात्र विठोबा नामदेवांना परखडपणे सुनवतात की, मग श्रीहरी म्हणे अज्ञान। सांडून सेविजे गुरुचरण। तुझ्या प्रेमे माया सोंग धरून। लटिका तुजपाशी मी खेळे।। जंव सद्गुरूंचे नाही सेवन। तंव मी जैसे स्वप्नीचे धन।। तुझे न तुटे भवबंधन। सद्गुरुआज्ञेवाचूनी।।



''माझे तुला भेटणे, बोलणे ही माया होती'' हे देवाचे बोल ऐकून मात्र नामदेवांना गुरुकृपेच्या महात्म्याची तीव्र जाणीव झाली. त्यांच्या मनात सद्गुरूंच्या भेटीचे तीव्र आर्त उदयाला आले. अशा अवस्थेत फिरत असता नामदेवांना एका शिवालयात पिंडीवर पाय ठेवून पहुडलेले विसोबा खेचर दिसले. तेव्हा ''अहो, उठा, उठा... देवावर पाय का ठेवता?'' असे नामदेवांनी न राहवून रागाने विचारले, तेव्हा ''जेथे देव नसेल तेथे तू माझा पाय ठेव'' असे विसोबा म्हणाले. तेव्हा नामदेवांना देव नाही, अशी जागाच मिळेना..!

त्या क्षणी नामदेवांसाठी आत्मज्ञानसूर्याचा उदय होत होता. त्यांनी विसोबांना पूर्ण शरण जाऊन त्यांच्या पायाला मिठी मारली. तेव्हा विसोबांनी नामदेवांच्या माथ्यावर आपला कृपाहस्त ठेवून त्यांना गुरुपदेश केला.

(पान४ वरून)

याच प्रयत्नांना यशाचं फळ देणारी शिवाय जिथे धर्माचे पालनकर्ते आहेत, तिथे आदिलक्ष्मी आहे. आदिलक्ष्मी म्हणजे आजच्या युगात धर्माचं तेज पण, धर्म म्हणजे केवळ धार्मिक विधी नव्हेत, तर सत्याचं पालन, नैतिकता आणि जीवनाला अध्यात्मिक आधार देणे म्हणजे धर्म असतो. समाजात प्रामाणिकपणा, न्याय, आणि गुरुकृपेवर विश्वास ठेवणं ही आदिलक्ष्मीची आजची रूपं आहेत.भक्तीच्या मार्गावर चालताना, सत्याचं पालन करताना आणि गुरुकृपेच्या सावलीत राहिल्यावर तिचं तेज प्रकट होतं आणि जिथे प्रेम आहे, तिथे गजलक्ष्मी आहे. पण गजलक्ष्मी म्हणजे केवळ दांपत्यातील प्रेम नव्हे, तर संपूर्ण कुटुंबातली एकात्मता, परस्परांचा सन्मान आणि नात्यांमधील सौख्य. गजलक्ष्मी ही या घरात प्रकट होते जिथे आईच्या मायेचा स्पर्श आहे, वडिलांच्या मार्गदर्शनाची छाया आहे, भावंडांच्या हसण्यातला गोडवा आहे आणि मित्रांच्या नात्यातली निष्ठा आहे. गजलक्ष्मी म्हणजे नात्यांचा सुगंध जसा फुलांचा गंध संपूर्ण बागेला व्यापतो, तसा प्रेमाचा गंध संपूर्ण घराला व्यापतो. तीच घरी समृद्धी आहे जी पैशाने विकत घेता येत नाही. गजलक्ष्मी असलेल्या घरात वाद असले तरी ते लवकर मिटतात, गैरसमज असले तरी ते प्रेमाने दूर होतात आणि संकटं आली तरी एकमेकांच्या आधाराने ती सहज पेलली जातात. म्हणूनच गजलक्ष्मी ही महालक्ष्मीच्या सर्वात नाजूक पण सर्वात

एतेषु रूपेषु लक्ष्मीः

सामर्थ्यवान रूपांपैकी एक आहे. कारण प्रेमाशिवाय कोणतीही समृद्धी अपूर्ण आहे. जिथे गजलक्ष्मी आहे, तिथे घर हे फक्त चार भिंतींचं बांधकाम नसून, ते एक मंदिर असतं जिथे, प्रत्येक नातं दीपज्योतीसारखं उजळतं. गजलक्ष्मी म्हणजे प्रेम आणि नात्यांचा सुगंध. आजच्या युगात ती कुटुंबातील एकात्मता, मित्रांच्या नात्यातला निष्ठा आणि समाजातली परस्परांची काळजी आहे. सोशल मीडियाच्या गोंगाटातही जेव्हा खरी माया, खरी साथ मिळते, तेव्हा तीच गजलक्ष्मी प्रकट होते.म्हणजेच, लक्ष्मीची प्रत्येक रूपं आजच्या युगातही जिवंत आहेत मग त्यात अन्नसुरक्षा, आरोग्यसेवा, शिक्षण, संघर्ष आणि विजय, नैतिकता आणि प्रेमसर्व येत. याचं तत्त्वज्ञानात्मक सार असं की खरी समृद्धी ही पैशात नसून जीवनाच्या संतुलनात आहे.

म्हणूनच श्रीपाद श्रीवल्लभांनी म्हटलेलं वचन ''महालक्ष्मी नित्य संपूर्ण कलेने प्रकाशित असते'' याचा अर्थ असा की भक्ताच्या घरात सर्व रूपांची कृपा एकत्रितपणे असते. संकटं आली तरी त्या घराला सामर्थ्य मिळतं, कारण खरी गुरुकृपा ही महालक्ष्मीचा सर्वात मोठा आशीर्वाद आहे. संकटं ही जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. पण ज्या घरावर गुरुकृपेची सावली असते, त्या घराला संकटांचा सामना करण्याची शक्ती मिळते. हीच खरी समृद्धी आहे जी पैशात नाही, तर धैर्यात, समाधानात आणि भक्तीत आहे. महालक्ष्मी म्हणजे या अदृश्य शक्तीचं रूप, जी भक्ताला झुंझायला बळ देते, सोसायला धैर्य देते आणि शेवटी समाधानाची गोड झुळूक आणते.अखेरीस माझ्याच शब्दात सांगायचे झाले, तर जिथे अन्न, आरोग्य, ज्ञान, धर्म, धैर्य, प्रेम आणि संतुलन आहे, तिथेच लक्ष्मी प्रकट होते. तिच्या या रूपांनी जीवन संपूर्ण होतं आणि खरी समृद्धी म्हणजे सुखाचा प्रकाश मिळतो अर्थात... ''अन्नं च स्वास्थ्यं च विद्या च धर्मो वीर्यं च प्रेम च समत्वमेव । एतेषु रूपेषु लक्ष्मीः प्रकट्या संपूर्णजीवनं सुखं प्रकाशयति ।।''

आत्मपरिवर्तनाची पायरी

(पान४ वरून)

मानसशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर आत्मपरीक्षण हे भावनिक परिपक्वतेचे लक्षण आहे. स्वतःच्या भावना ओळखणे, राग किंवा दुःखामागील कारणांचा शोध घेणे, चुका मान्य करण्याची तयारी ठेवणे आणि त्यातून शिकणे– या सर्व गोष्टी मानसिक आरोग्यासाठी आवश्यक आहेत. आत्मपरीक्षण करणारी व्यक्ती परिस्थितीवर दोषारोप करण्यापेक्षा स्वतःच्या प्रतिसादाचे मूल्यमापन करते. त्यामुळे तिच्यात बदल स्वीकारण्याची क्षमता वाढते आणि नातेसंबंध अधिक सुदृढ होतात. आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक युगात आत्मपरीक्षणासाठी वेळ देणे कठीण होत चालले आहे. सामाजिक माध्यमांवरील प्रतिमा, बाह्य यशाची धडपड आणि सततची तुलना यांमुळे माणूस स्वतःच्या अंतरंगापासून दूर जात आहे. अनेकदा आपण इतरांच्या जीवनाबद्दल अधिक जाणतो; पण स्वतःच्या मनातील भीती, आकांक्षा किंवा अस्वस्थता यांचा विचार करण्यास वेळ देत नाही. परिणामी बाह्य यश मिळूनही अंतर्मनात रिक्तता जाणवते. अशा वेळी आत्मपरीक्षण ही केवळ वैचारिक प्रक्रिया राहत नाही; ती मानसिक संतुलन आणि जीवनातील अर्थ शोधण्याचे प्रभावी साधन ठरते.



आत्मपरीक्षणाचा अर्थ स्वतःमध्येच गुरफटून राहणे असा नाही. उलट, स्वतःला समजून घेतल्यावरच इतरांना समजून घेण्याची क्षमता विकसित होते. स्वतःच्या मर्यादा मान्य करणारा माणूस इतरांच्या चुका अधिक सहानुभूतीने स्वीकारतो. स्वतःच्या अपूर्णतेची जाणीव असलेली व्यक्ती अहंकारी होत नाही. म्हणूनच आत्मपरीक्षण हे वैयक्तिक विकासाबरोबरच सामाजिक सलोखा निर्माण करण्याचेही माध्यम आहे.आत्मपरीक्षण प्रभावी होण्यासाठी काही मूलभूत अटी आवश्यक असतात. त्यामध्ये प्रामाणिकपणा, संयम आणि सातत्य यांना विशेष महत्त्व आहे. एखाद्या दिवसाचे आत्मचिंतन पुरेसे नसते; जीवनातील प्रत्येक अनुभवातून शिकण्याची वृत्ती विकसित करावी लागते. यश मिळाले तर त्यामागील कारणांचा आणि अपयश आले तर त्यातून मिळालेल्या शिकवणीचा विचार करणे आवश्यक असते. तसेच विधायक टीका स्वीकारण्याची तयारीही आत्मपरीक्षणाचा महत्त्वाचा भाग आहे. कारण अनेकदा इतरांच्या निरीक्षणांतूनही आपल्याला स्वतःचे नवे पैलू समजतात.

आधुनिक नेतृत्वशास्त्र, व्यवस्थापन आणि शिक्षणशास्त्राहही आत्मपरीक्षणाला विशेष महत्त्व दिले जाते. प्रभावी नेता तोच ठरतो जो स्वतःच्या निर्णयांचे पुनर्मूल्यांकन करू शकतो. उत्तम शिक्षक तोच असतो जो स्वतःच्या अध्यापन पद्धतीचे परीक्षण करतो. उत्कृष्ट विद्यार्थी तोच असतो जो केवळ गुणांवर समाधान न मानता आपल्या शिकण्याच्या प्रक्रियेचे विश्लेषण करतो. यावरून आत्मपरीक्षण हे केवळ आध्यात्मिक साधना नसून प्रत्येक क्षेत्रातील गुणवत्तावाढीचे मूलभूत तत्त्व आहे.अखेरीस, आत्मपरीक्षण म्हणजे स्वतःच्या दोषांवर निराश होणे नव्हे, तर स्वतःच्या शक्यता ओळखण्याचा मार्ग आहे. बाह्य जग जिंकण्यापूर्वी अंतर्मन समजून घेणे आवश्यक आहे. स्वतःशी प्रामाणिक संवाद साधणारी व्यक्तीच जीवनातील बदलांना धैर्याने सामोरी जाऊ शकते, योग्य निर्णय घेऊ शकते आणि मूल्यनिष्ठ जीवन जगू शकते. आत्मपरीक्षण माणसाला परिपूर्ण बनवत नाही; परंतु तो सतत अधिक चांगला होण्याचा प्रयत्न करावा, अशी प्रेरणा देत राहते. म्हणूनच आत्मपरीक्षण ही एकदाच पूर्ण होणारी कृती नसून आयुष्यभर चालणारी जागरूक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेतून माणूस स्वतःचा शोध घेतो, स्वतःला घडवतो आणि अखेरीस अधिक सजग, अधिक संवेदनशील आणि अधिक अर्थपूर्ण जीवनाकडे वाटचाल करतो.

नको देवराया अंत आता पाहू । प्राण हा सर्वथा जाऊ पाहे ।।

कान्हो, ते तुझ्यासाठी केलेले दागिने काय पेटीत ठेवण्यासाठी केले आहेत? जरा अंगावर घाल, बिदरचे सरदार येणार आहेत आज आपल्याकडे, माझ्या कलिकेचा सुवास बादशहापर्यंत पोचलाय'' कान्होपात्राची आई शामाबाई कान्होपात्राशी बोलत होती. पण तिची ती कलिका – कान्होपात्रा – ही सरदार, बादशहा यांचे नाव ऐकताच कोमेजल्यासारखी झाली. तिचा मनातल्या मनात आक्रोश सुरू झाला... हा सरदार मला बादशहाकडे घेऊन जाण्यासाठीच येणार, तेव्हा आता मी काय करू, बादशहाने बोलावले म्हणून आईला केवढा आनंद झालाय, पण मला मात्र ही अशी तनामनाला विकण्याची कल्पनाही सहन होत नाहीय, हे नश्वर शरीरसुख नकोय मला, त्या अनादिअनंताशी तादात्म्य पावण्याचे आत्मसुख हवेय.

मंगळवेढे या गावी शामा नावाच्या एका अतिशय धनवान नायकिणीच्या पोटी कान्होपात्राचा जन्म झाला. जशी भागेत तुळस उगवली. एखाद्या प्रासादासारखा शामाचा भव्य वाडा होता. त्यात सेवेला तत्पर अशा अनेक दासी पदरी होत्या. पण त्या सुखोपभोगात कान्होपात्राचे मन रमत नव्हते. कान्होपात्राने आपल्यासारखाच गणिकेचा व्यवसाय पुढे चालू ठेवावा, म्हणून शामाने कान्होपात्रेला लहान वयापासूनच नृत्यगायनात प्रवीण केले होते.

कान्होपात्रा विलक्षण देखणी असल्याने त्या सौंदर्याच्या बळावर तिने आपल्यापेक्षाही अधिक धन मिळवावे, असे तिच्या आईला वाटे. पण कान्होपात्रेचे मन या बाजारू दुनियेत मुळीच रमणारे नव्हते. सर्व ऐहिक सुखाच्या राशी जरी प्राप्त झाल्या तरी आपल्याला हवे असणारे मानसिक समाधान त्यात लाभणार नाही, हे कान्होपात्रा जाणत होती. इंद्रिये, मन, बुद्धी यांच्या पल्याड असलेल्या आत्मिक सुखाची तिच्या जीवाला आंस लागली होती. बैचेन अवस्थेत ती आपल्या महालाच्या मागील अंगणात आली. ''जय जय विठोबा रखुमाई...'' असा गजर करीत पंढरीचे वारकरी जात असलेले तिला दिसले. त्यांचा तो गजर कान्होपात्रेच्या अंतःकरणालाच साद घालीत होता. घराद्याराच्या, रूपागुणांच्या पाशाला ओलांडून शुद्ध आनंद देणारा हा विठुनामाचा गजर आहे, हे कान्होपात्रेच्या ध्यानी आले. एका अनोख्या उत्कट भावनेने तिच्या नेत्रातून अश्रुधारा वाहू लागल्या. तिची ही अवस्था तिच्या हौसा नावाच्या एका प्रौढ दासीने ओळखली. तिने कान्होपात्रेचे उंची वस्त्रालंकार उतरवून तिला साधे कपडे घातले आणि त्या दोघी कोणाला नकळत चटकन त्या वारीमध्ये मिसळून गेल्या. वारकऱ्यांसह भजने गाऊ लागल्या. त्या भजनांतील गाढ भक्तिरसात चिंब होत त्या पंढरपूरला जाऊन पोहोचल्या. गरीब हौसा आता कान्होपात्रेची आईच झाली होती. विठ्ठल मंदिराजवळच्या दोघींनी एक झोपडी बांधली आणि पांडुरंगनगरीत त्या आनंदाने राहू लागल्या. कान्होपात्रेने आता आपले अवघे आयुष्य विठ्ठल मंदिराच्या सेवा-चाकरीत काढायचे, असा निश्चय केला होता. दिवसातून दोनदा ती विठ्ठलाचे संपूर्ण मंदिर झाडून-पुसून लख्ख करीत असे. ते काम करीत असताना तिला भक्तिमावयुक्त काव्य स्फूरू लागले. कान्होपात्रा स्वरचित अभंग गाऊ लागली. तिची ती भावपूर्ण मधुर भजने देवळात येणारी भक्तमंडळी तल्लीन होत ऐकू लागली.



कान्होपात्रा गात होत्या, सकळही सुरवर येथेचि लाधले । देवाचे देखिले चरणांबुज ।। १।। हरली ती भूक तहान निमाली । संतांची देखिली चरणांबुजे ।। २।। कीर्तनाचे रंगी आनंद नाचता । कान्होपात्रा चित्ता समाधान ।। ३।। या पंढरीला सगळ्या देवांचे दर्शन झाले कारण सर्वांना विठ्ठलाने आपल्यात सामावून घेतलेय. देवाधिदेव परमात्मा पांडुरंगाचे चरणकमल मी आज पाहिले. जीवभावाचा निरास करून ब्रह्ममय प्रदान करणाऱ्या संतांचे चरणकमल पाहिले. त्यांना शरण गेल्याने देहमान हरपून भूक-तहान आपोआपच निमाली. कान्होपात्रेचे मोजकेच अभंग उपलब्ध आहेत. पण त्यातून त्यांच्या पारमार्थिक साधनेचे पूर्ण दर्शन होते. त्या कृष्णाला पुढीलप्रमाणे आळवतात, माझ्या जीवीचे जीवलगे कृष्णाई कान्हाई ।। सावळे डोळस करुणा येऊ दे काही कान्होपात्रांचा पुढील अभंगही प्रसिद्ध आहे, ज्यात केवळ भगवंताला अंतःकरणापासून घातलेली साद आहे -- अगा वैकुंठीचा राया रे अगा विठ्ठल सखया.. अगा पुंडलिक वरदा । अगा विष्णू तू गोविंदा ।। कान्होपात्रांच्या अनन्य विठ्ठलभक्तीची साक्ष त्यांच्या पुढील शब्दाश्वद्वातून पटते, माझ्या जीवीचे जीवन । तो विठ्ठल निधान ।। उभा असे विटेवरी । वाटी प्रेमाची शिदोरी ।। माझ्या जीवाचे जीवनचैतन्य असलेला विठ्ठल म्हणजे आत्मसुखाचा ठेवा आहे, असे त्या म्हणतात. त्यांच्या अभंगातून त्यांचा विनम्र भाव विलोभनीयतेने प्रकट होतो. मी तो आहे यातिहीन । नकळे काही आचरण ।। मज अधिकार नाही । भेटी दे विठाबाई ।। मी हीन जातीची, थोरामोठ्यांशी कसे वागावे, मला माहीत नाही. अशा मला त्रैलोक्यनाथाला भेटण्याचा अधिकार कसा असेल, पण तरीसुद्धा माझी भोळीभाबडी भक्ती पाहून हे विठ्ठलमाऊली तू मला तुझी भेट दे. तुझ्या चरणापाशी स्थान दे, असे कान्होपात्रा विठ्ठलाला विनवितात. त्याचबरोबर इतर संसारी जनांनाही त्या सांगतात, घ्यारे घ्यारे मुखी नाम । अंतरी धरोनिया प्रेम ।। माझा आहे भोळा बाप । घेतो ताप हरोनि ।। संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांवरचा कान्होपात्रांचा अभंगही लक्षणीय आहे. कान्होपात्रा ज्ञानेश्वरांच्या अलौकिक भक्तिज्ञानाच्या कर्तृत्वाने भारावून गेल्या. तेव्हा पुढील अभंग यांच्या मुखातून बाहेर पडला, आलंकापुरी पुण्यठाव । तेथ समाधी ज्ञानदेव ।। १।। पांडुरंगे दीधला वर । भेटी निर्धार कृष्णपक्षी ।। २।। नित्य स्नानालागी जाणा । भागीरथी दिधली ज्ञाना ।। ३।। जेथे साक्षात पावनता निवास करते, अशा आळंदीनगरीत ज्ञानदेवांची समाधी आहे.

कृष्णपक्षात आपली नक्की भेट होणार, असा ज्ञानोबांना पांडुरंगाने वर दिला होता. त्याप्रमाणे कार्तिक वद्य त्रयोदशी, शके ९२९८ या परम मंगल दिवशी ज्ञानेश्वरमाऊली संजीवन समाधीद्वारा विठ्ठलपरमात्म्याशी एकरूप झाली! भागीरथीसमान पवित्र असलेल्या इंद्रायणी नदीकिनारी ज्ञानराजांची समाधी आहे. त्यामुळे कान्होपात्रा म्हणतात, ज्ञानदेवांना नित्य स्नानासाठी देवाने भागीरथी दिली! कान्होपात्रा घर सोडून गेली, हे पाहिल्यावर बादशहाने आपल्या शिपायांना तिचा माग काढण्यास धाडले. तिच्या विठ्ठलभक्तीची माहिती कळाल्याने ती नक्कीच पंढरपुरास गेली असणार, असा विचार करून ते शिपाई पंढरपुरास आले. कान्होपात्रा अगदी साध्या वेषात असली तरी तिचे सौंदर्य लपत नव्हते. बादशाहच्या शिपायांनी तिला हुडकून काढले. शिपाई तिला म्हणाला ''कान्होपात्रा, बादशाहचा हुकूम आहे, तू ताबडतोब आमच्याबरोबर चल, बऱ्या बोलाने आली नाहीस तर आम्हाला जबरदस्तीने तुला घेऊन जावे लागेल'' त्यावर कान्होपात्रा म्हणाली, ''भाईसाब, मी मंदिरात जाऊन विठोबाचा निरोप घेऊन येते''

शिपाई म्हणाला -- काहीही बकवास करू नकोस, विठोबाचा काय निरोप घेणार? कान्होपात्रा म्हणाली -- मी भाई म्हटलंय ना तुम्हाला, आपल्या बहिणीची एवढीही विनंती ऐकणार नाही का...? शिपाई -- हं ठीक आहे. पण बघ हं, काही दगाफटका केलास तर आम्च्याशी गाठ आहे. कान्होपात्रा मंदिरात गेली. काही वेळाने मंदिरातले पुजारी बाहेर आले. त्यांना पाहून शिपाई म्हणाला -- पुजारीजी, ही अजून बाहेर कशी आली नाही? आपल्याला माहीत आहे ना की बादशहाची मर्जी खप्पा झाली तर काय होईल...! पुजारी – हवालदारसाहेब, आत कान्होपात्रा नाहीय, आहे ते तिचे निष्प्राण शरीर... आपल्या तनामनाला अत्यंत शुद्ध ठेवीत विठ्ठलाशी एकरूप झालेल्या कान्होपात्राची एकनिष्ठ भक्ती पाहून बादशहाचा तो शिपाईही विस्मयाने थक्क झाला. कान्होपात्रेची ही कहाणी जीवाला चटका लावते. शिपायाच्या परवानगीने मंदिरात गेलेल्या कान्होपात्रेने केवढ्या आर्ततेने विठोबाला स्वतःत सामावून घेण्यासाठी विनविले असेल, हे तिच्या -- नको देवराया आंत आता पाहू । प्राण हा सर्वथा जाऊ पाहे ।। या हृदय पिवटळून म्हटलेल्या गीतावरून कळून येते. हरिणीच्या पाडसाला व्याघ्राने धरले असता त्या पाडसाची जी तगमग होत असेल, तेवढी तगमग असल्याशिवाय ईश्वरभक्ती पूर्णत्वास जात नाही. आपले रूपलावण्य, धनदौलत या कशाचाही मोह न धरता केवळ परम भक्तिभावाने विठ्ठलाशी एकरूप होणाऱ्या संत कान्होपात्रांना आपण नमन करू या.



बाळाच्या जन्मानंतर पाचविची पूजा आणि सहावीची पूजा का करतात?


बाळाच्या जन्मानंतर पाचव्या दिवशी पाचवीची पूजा म्हणजे रक्षण देवतेची,शस्त्र देवतेची पूजा करावयाची असते.एका पाटावर विड्याची पाने मांडावयाची त्यावरी पाच दिवे कणकीचे करून लावतात.कोरा कागद,पेन,खुरपे अगर सुरीला चुना लावून कापड गुंडाळून तांदळावर ठेवतात. नाडापुडी गुटीचे साहित्य म्हणजे लोणी, तांदूळ, खारीक, खोबरे, डिंक,ओवा, पान, सुपारी, हळद, कुंकू,गुळ खोबरे ठेवतात. पाटाभोवती गांगोळी काढतात.देवी बाळाच्या कपाळावर भविष्याचा आलेख लिहिते.अशी समजूत आहे.श्री गणेशाने स्वप्नात श्री गणेश मंदिरात ब्राम्हणाने ढोक्यावरी अक्षदा टाकूनी आशिर्वाद दिला मजला,देविने नातीच्या पाचवी



दिवशी कपाळावरी जगात येते वेळी पाचवी लिहिली.श्री गणेशाने चांगले लिहिण्याची सूचना केली.श्री दत्तरायाने(श्री स्वामी समर्थ) रूपाने भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे हे दाखविले मजला. सहावीची पूजा–सहाव्या दिवशी संध्याकाळी बाळाच्या वडिलांनी अगर मामांनी रक्षण देवतेची पूजा करावयाची या दिवशी सटवाईला थाक दाखविण्यासाठी म्हणजे बाळाचे भविष्य वेडेवाकडे वाईट लिहू नकोस म्हणून थाक बसावा म्हणून लोखंडी शस्त्र ठेवलेले असते. सुरीला चुना लावलेला असतो. चुना म्हणजे लक्ष्मी!शुभ लक्षणानी युक्त आणि लक्ष्मीचा आशिर्वाद बाळाला मिळावा.म्हणून चुना लावतात.नाडापुडी सोडून त्याची पूजा करून तो पिवळा लाल नाडा बाळाच्या कमरेला हातात–पायात बांधावयाचा. बाळाला दृष्ट लागत नाही.ही या मागची भावना असते.

–राजेंद्र शामराव महमदापुरे
कुरुंदवाड
मो.९४२३०८४२३०

दैनिक महासत्ता
॥ भक्ती ॥
४
शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर २०२६



छठ पूजेदरम्यान वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक वस्तूचे स्वतःचे महत्त्व असते. पूजेसाठी ठेकवा तयार करणे, फळे अर्पण करणे किंवा सूर्यदेवाला प्रार्थना करणे असो, या सर्व तयारीमध्ये बांबूच्या भांड्यांना आणि वाडग्यांना एक विशेष स्थान असते. छठ पूजेदरम्यान लोक पितळ, स्टील किंवा इतर धातूच्या भांड्यांपेक्षा बांबूच्या भांड्यांना आणि वाडग्यांना अधिक प्राधान्य देतात. यामागील नेमके कारण काय आहे? ही केवळ एक जुनी परंपरा आहे, की निसर्ग, लोकसंस्कृती आणि उपासना यांच्याशी संबंधित यामागे एखादे विशिष्ट तत्त्वज्ञान आहे? याबद्दल सविस्तर जाणून घेऊया

यावर्षी छठ पूजा १३ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबरपर्यंत साजरी केली जाणार आहे. हा चार दिवसांचा भव्य उत्सव कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षातील चतुर्थी ते सप्तमीपर्यंत चालतो. छठ पूजेदरम्यान, सूप आणि दौरा या दोन्हींचा उपयोग वेगवेगळ्या कारणांसाठी होतो. सूप हे बांबूच्या पातळ पट्ट्यांपासून बनवलेले एक रुंद, सपाट भांडे असते. त्यात ठेकुआ, फळे, नारळ, आले, हळद आणि इतर नैवेद्य सजवून ठेवले जातात. अर्घ्याच्या वेळी (सूर्य देवाला अर्पण करताना) हे सूप आदराने अर्पण केले जाते. तर, दौरा ही बांबूपासून बनवलेली एक टोपली असते, ज्यात पूजेचे साहित्य आणि नैवेद्य ठेवले जातात. कुटुंबातील सदस्य ते डोक्यावर घेऊन पूजास्थळी किंवा घाटावर जातात. नैवेद्य व भांड्यात सजवून मिरवणुकीत ठेवण्याची प्रथा आहे.

छठ पूजा हा निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा सण देखील आहे. या पूजेमध्ये सूर्य, पाणी आणि पृथ्वीवरील फळे व धान्य यांचा समावेश असतो. बांबूच्या टोपल्या आणि वाडग्यांचा वापर निसर्गाशी नाते जोडण्याची परंपरा पुढे चालू ठेवतो.

ग्रामीण बिहार आणि पूर्व उत्तर प्रदेशात बांबू हा फार पूर्वीपासून घरोघरी वापरला जाणारा एक महत्त्वाचा घटक आहे. त्याचा उपयोग चमचे, टोपल्या, चटई आणि इतर अनेक वस्तू बनवण्यासाठी केला जातो. त्यामुळे, छठसारख्या लोकनृत्य उत्सवांमध्ये बांबूच्या उत्पादनांचा वापर हळूहळू परंपरा आणि ओळखीचा एक भाग बनला आहे. बांबूचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वापरानंतर त्याच्या उत्पादनांचे नैसर्गिकरित्या विघटन होऊ शकते. प्लास्टिकपेक्षा हा एक अधिक चांगला पर्यावरणपूरक पर्याय मानला जातो.

छठ पूजेदरम्यान बांबूच्या भांड्यांचे आणि वाडग्यांचे महत्त्व केवळ धार्मिक परंपरेपुरते मर्यादित नाही. ती भांडी बनवणाऱ्या स्थानिक कारागिरांना त्यातून उपजीविकाही मिळते. बिहारच्या अनेक भागांमध्ये, कारागीर पिढ्यानपिढ्या बांबूच्या पट्ट्यांपासून भांडी, टोपल्या आणि वाडगे बनवत आले आहेत. छठ सण जवळ येताच या वस्तूंची मागणी वाढते. तथापि, आता पितळ, स्टील आणि इतर धातूंपासून बनवलेली भांडीदेखील बाजारात उपलब्ध आहेत. त्यांच्या वाढत्या वापरामुळे पारंपरिक बांबूच्या वस्तू बनवणाऱ्या कारागिरांच्या कामावरही परिणाम होत आहे.

यमराजाला सहाय्यकाची गरज का भासली?


भगवान चित्रगुप्त व्यक्तीच्या कर्मांची नोंद ठेवतात आणि त्या नोंदीच्या आधारावर त्यांचे नशीब ठरवले जाते. पण तुम्हाला माहीत आहे का की भगवान चित्रगुप्ताचा जन्म कसा झाला? पुराणांमध्ये वर्णन केलेल्या या कथेबद्दल अधिक जाणून घेऊया.

पौराणिक कथेनुसार, जेव्हा ब्रह्मदेवाने विश्व आणि सर्व सजीवांची निर्मिती केली, तेव्हा विश्वात सुव्यवस्था आणि संतुलन राखण्याचा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे, जन्म आणि मृत्यूचे चक्र सुरळीतपणे चालावे यासाठी ब्रह्मदेवाने यमराजाची निर्मिती केली. त्याने यमराजावर धर्मानुसार जीवांना त्यांच्या कर्मांचे फळ देण्याची आणि विश्वात संतुलन राखण्याची जबाबदारी सोपवली.



कालांतराने, विश्वाचा विस्तार झाल्यामुळे जीवांची संख्याही वाढली. यमराजाला एकट्याने सर्वांची नोंद ठेवणे अधिकाधिक कठीण होऊ लागले. तेव्हा यमराजाने ब्रह्मदेवाकडे एका सक्षम सहाय्यकाची मागणी केली. यमराजाची विनंती ऐकून ब्रह्मदेव ध्यान आणि तपश्चर्येत मग्न झाले. त्यांच्या तपश्चर्येतून भगवान चित्रगुप्त नावाचा एक तेजस्वी जीव जन्माला आला. आख्यायिकेनुसार, तेव्हापासून भगवान चित्रगुप्त हे यमराजाचे मुख्य सहायक आहेत, जे मानवांच्या जन्म-मृत्यूही, तसेच त्यांच्या पापांची आणि पुण्यांची संपूर्ण नोंद ठेवतात.

भगवान चित्रगुप्ताच्या जन्माची कथा ब्रह्मवैवर्त पुराण, पद्म पुराण आणि गरुड पुराणात सांगितलेली आहे. भगवान चित्रगुप्ताचे स्वरूप अत्यंत तेजस्वी आणि दिव्य मानले जाते. त्यांच्या चेहऱ्यावर गांभीर्य, न्याय आणि शांत तेज दिसून येते. भगवान चित्रगुप्तांची पूजा त्यांच्या चतुर्भुज रूपात केली जाते. त्यांच्या हातात लेखणी, शाईचे पात्र आणि कर्मांचे वही असते. त्यांनी राजेशाही पोशाख परिधान केलेला असतो. त्यांच्या डोक्यावर एक भव्य सोन्याचा मुकुट, कानांत कर्णभूषणे आणि गळ्यात दिव्य रत्नांचा हार असतो.



आत्मपरिवर्तनाची पायरी


मानवी जीवनातील सर्वांत गुंतागुंतीचा शोध कोणता, असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर बाह्य विश्वात नव्हे, तर स्वतःच्या अंतर्मनात सापडते. विज्ञानाने विश्वाची असंख्य रहस्ये उलगडली, तंत्रज्ञानाने जीवन अधिक सुलभ केले आणि समाजव्यवस्थेने प्रगतीची नवी क्षितिजे गाठली; परंतु माणूस स्वतःला कितपत ओळखतो, हा प्रश्न आजही तितकाच महत्त्वाचा आहे. आत्मपरीक्षण ही स्वतःच्या विचारांचे, भावनांचे, कृतींचे, मूल्यांचे आणि मर्यादांचे प्रामाणिक परीक्षण करण्याची प्रक्रिया आहे. ती केवळ आत्मचिंतन नसून आत्मपरिवर्तनाची पहिली पायरी आहे.

आत्मपरीक्षण म्हणजे स्वतःवर टीका करणे किंवा दोष शोधणे नव्हे. उलट, स्वतःकडे पूर्वग्रह, अहंकार आणि आत्मसमर्थन यांपासून मुक्त होऊन वस्तुनिष्ठपणे पाहण्याची क्षमता होय. प्रत्येक व्यक्तीला स्वतःविषयी काही ठाम समजुती असतात. आपण योग्यच आहोत, आपल्या निर्णयांमागे योग्य कारणे आहेत, आपले वर्तन परिस्थितीमुळे घडते– अशी भूमिका अनेकदा नकळत घेतली जाते. परंतु आत्मपरीक्षण या सोयीस्कर समजुतींना प्रश्न विचारते. ते विचारते– आपल्या कृतींचा इतरांवर काय परिणाम झाला? आपल्या यशामध्ये इतरांचे योगदान किती होते? आपल्या अपयशाला आपणच कितपत जबाबदार आहोत? अशा प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे व्यक्तिमत्त्वाला अधिक परिपक्व बनवतात. भारतीय तत्त्वज्ञानात आत्मपरीक्षणाला विशेष महत्त्व दिले गेले आहे. उपनिषदांपासून संतसाहित्यापर्यंत आणि योगपरंपरेपासून आधुनिक विचारवंतांपर्यंत आत्मज्ञान ही जीवनाची सर्वोच्च साधना मानली गेली आहे. स्वतःला जाणल्याशिवाय जगाला समजणे शक्य नाही, अशी भूमिका अनेक तत्त्वज्ञानपर परंपरांमध्ये दिसून येते. आत्मपरीक्षणामुळे माणूस आपल्या इच्छा, भीती, आसक्ती आणि अहंकार यांचे स्वरूप समजू लागतो. ही जाणीव त्याला अधिक विवेकी, संयमी आणि संवेदनशील बनवते.

(पान ३ वर)

नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी ।।

श्री नामदेवांच्या निरागस व प्रांजल स्वभावाप्रमाणे त्यांचे अभंगही अतिशय प्रासादिक आणि भावमधुर असल्याने ते अभंग जनमानसाच्या हृदयात अलगद शिरून बसलेले आहेत. विठ्ठलाच्या अनन्य भक्तीने कीर्तनाच्या रंगात बेभान होऊन नाचणाऱ्या नामदेवांचे बोल जगात ज्ञानदीप उजळविण्यासाठी समर्थ ठरतात. 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी' असे श्रीनामदेव म्हणतात. त्यांनी उभ्या महाराष्ट्राला कीर्तनरंगात रंगवून आपली भक्तिपरंपरा थेट पंजाबपर्यंत नेली. शिखांच्या अत्यंत पवित्र अशा 'ग्रंथसाहेब' या ग्रंथात श्री नामदेवांचेही काही हिंदी अभंग आहेत. अनेक संतांची चरित्रे श्री नामदेवांनी लिहिली असल्याने ते मराठी भाषेतील आद्य चरित्रकार ठरतात. श्री ज्ञानेश्वरांचे चरित्र तर अतिशय विस्तृतपणे श्री नामदेवांनी रेखाटले आहे. त्यांच्या या चरित्रलेखनाने ज्ञानदेवमाऊलीच्या संपूर्ण जीवनाचे हुबेहूब चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते. ज्ञानदेव व नामदेव हे दोन्ही महान संत समकालीन असल्याने त्यांच्या सहवासाचा, संवादांचा पावनकाळ आपणही नामदेवांच्या अमृतमय शब्दांतून अनुभवू शकतो. त्यात नामदेवांनी कुठेही विठ्ठलाला विसंबलेले नाही. नामदेवांनी लिहिलेल्या ज्ञानदेव चरित्रात तसेच नामदेवांच्या आत्मचरित्रात विठोबा–रखुमाईच्या प्रत्यक्ष उपस्थितीचे चित्रण नामदेव करतात. विठ्ठलाशी तर नामदेवांचे प्रत्यही संभाषण घडत असते. याला व्यावहारिक तर्काची कसोटी कोणी लावू नये. विठुमाउली नामदेवांच्या अंतरंगात तर ठासून भरलेली आहेच, पण त्यांना बाह्य विश्वातही विठ्ठलच आपला सांगाती असल्याचे अखंड जाणवते. हा श्री नामदेवांच्या निर्व्याज अपार प्रेमाचा चमत्कार आहे. नामदेवांच्या संतत्वाचा स्तरच वेगळा आहे. त्यात कोरड्या वास्तवाचे बंध नाहीत. त्यांचे निष्कपट हृदय विठ्ठलाशी पूर्ण एकनिष्ठ होते. त्या एकनिष्ठेनेच त्यांच्या समुग पभक्तीला विलक्षण ताकद दिली होती. संकल्परूप अशी जी परावाणी त्यातच त्यांचा विठ्ठल भरला असल्याने त्यांचा व



विठ्ठलाचा आपोआप संवाद होतो. त्यांच्या दृष्टीतच विठ्ठल असल्याने, त्यांनी वर्णन केलेल्या प्रसंगात विठ्ठल असतोच. श्री नामदेवांच्या अभंगगाथेत श्री ज्ञानेश्वरांची आदि, तीर्थावळी, श्री ज्ञानेश्वरसमाधीचा महिमा आणि श्री ज्ञानेश्वरांची समाधी अशी चार प्रकरणे ज्ञानेश्वर चरित्राना वाहिलेली आहेत. यावरूनच या चरित्राचे किती बारीक सारिक पदर नामदेवांनी अतिशय भावपूर्णतेने उलगडले आहेत, हे लक्षात येते. ज्ञानेश्वर समाधीचे स्थळकाळ, त्यावेळी उपस्थित असलेला संतमेळावा यांचे प्रत्यक्षदर्शी वर्णन आपल्याला नामदेवगाथेतून मिळते. हे स्थळकाळ श्री ज्ञानश्वर माऊलीच्या संजीवन समाधीच्या लोकविलक्षण प्रसंगाचे जिवंत चित्रण श्री नामदेव महाराजांनी विलक्षण जिव्हाळ्याने केले आहे. त्यांच्या साध्यामोळ्या शब्दांतून त्या अनन्यसाधारण घटनेचे नुसते बाह्य वर्णन नाही, तर त्या घटनेचे साक्षीदार असलेल्या व्यक्तींच्या आंतरिक घालमेलीचेही श्री नामदेव महाराज प्रत्ययकारी वर्णन करतात. नदीच्या पाण्यात विष मिसळल्यावर मासे जसे तडफडतील तसा जनसमुदास तळमळू लागला...

देव निवृत्ती यांनी धरिले दोन्ही कर। जाती ज्ञानेश्वर समाधीसी।। नदीचिया माशा घातले माजवण। तैसे जनवन कालविले।। दाही दिशा धुंद उदयास्ताविण। तैसेचि गगन कालविले।। जाऊनि ज्ञानेश्वर बैसले आसनावरी। पुढे ज्ञानेश्वरी टेवियेली।। ज्ञानदेवे म्हणे सुखी केले देवा। पादपद्मी ठेवा निरंतर।। तीन वेळा जेव्हा जोडिले करकमळे। झाकियेले डोळे ज्ञानदेवे।। भीममुद्रा डोळा निरंजनी लीन। जाले ब्रह्म पूर्ण ज्ञानदेव ।। नाम म्हणे आता लोपला दिनकर। बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ ।।

श्री निवृत्तिनाथांनी जरी ज्ञानेशांचा हात धरून त्यांना समाधीस्थळापर्यंत आणले होते, ज्ञानोबा आत उतरून गेले तेव्हा त्या विवरावर निवृत्तिनाथांनीच पाषाण ठेवला होता, तरी या प्रसंगी निवृत्तिनाथांची स्वतःची काय मनोवस्था असेल, त्याचे वर्णन नामदेव करतात, ''तळ्याचा बांध फुटून पाणी बारा वाटा धावावे, गवताच्या पेंढीचा दोर सुटून अबधे गवत इतस्ततः व्हावे, वाघाच्या तावडीत सापडल्यामुळे जी घरी परतू शकली नाही अशा हरिणीच्या पाडसांनी जसे कावरेबावरे होऊन दशदिशा भटकावे तसे निवृत्तिनाथांचे चित्त थाऱ्यावर येत नव्हते...'' नामदेव निवृत्तिनाथांचे हृदभाव प्रकट करतात की आईवडील त्यांना सोडून गेले तेव्हाही आताएवढे संकट वाटले नाही, आता मात्र कारुण्याचा हुताशन पेटला आहे...!! मायबापे आम्हा त्यागियेले जेव्हा। ऐसे संकट तेव्हा झाले नाही।। नामा म्हणे देवा पेटला हुताशन। करा समाधान निवृत्तीचे।। असे हे श्रीनामदेवांचे हृदयात हात घालणारे अभंगबोल आहेत.

(पान ३ वर)

एतेषु रूपेषु लक्ष्मीः

कसं आहे ना की, जिथे औषधाच्या कडवट चवीतही जीवनाचं गोड आश्वासन दडलेलं असतं, तिथे आरोग्यलक्ष्मी प्रकट होते. खरंतर आरोग्यलक्ष्मी ही शरीराचं बळच नव्हे, तर मनःशांती आणि जीवनाचा आनंद आहे. तिथे ती फक्त गोळ्या वा औषधांच्या बाटल्यांत नसते, तर डॉक्टरांच्या हसऱ्या चेहऱ्यात, सेवाभावी परिचारिकेच्या स्पर्शात आणि रुग्णाच्या मनात निर्माण होणाऱ्या आशावादात तिचं वास्तव्य असतं. आरोग्यलक्ष्मी म्हणजे आधुनिक आरोग्यसेवा. हॉस्पिटल्स, औषधं, डॉक्टरांचा सेवाभाव आणि मानसिक आरोग्याची काळजी ही तिची आजची रूपं आहेत. कोविडसारख्या संकटात जेव्हा आरोग्यसेवा जीवन वाचवते, तेव्हा तीच आरोग्यलक्ष्मी प्रकट झालेली जाणवते.

जिथे ज्ञान आहे, तिथे विद्यालक्ष्मी आहे. पुस्तकांच्या पानांत, गुरुंच्या शिकवणीत आणि विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत चमकणाऱ्या उद्याच्या पूर्ण होऊ घातलेल्या स्वप्नांमध्ये तिचं दर्शन होतं. ज्ञानाशिवाय कोणतीही समृद्धी टिकत नाही, म्हणूनच विद्यालक्ष्मी ही जीवनाची खरी दिशा दाखवते. म्हणूनच विद्यालक्ष्मी ही ज्ञानाचं तेज आहे. पुस्तकांच्या पानांत, गुरुंच्या शिकवणीत, आणि विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत चमकणाऱ्या उत्सुकतेत तिचं दर्शन होतं. ज्ञानाशिवाय कोणतीही समृद्धी टिकत नाही, म्हणूनच विद्यालक्ष्मी ही जीवनाची खरी दिशा दाखवते. ती अंधारात दीपज्योतीसारखी आहे, जी मार्गदर्शन करते आणि संस्कारांची बीजं पेरते. विद्यालक्ष्मी आजच्या युगात म्हणजे शिक्षणाचा प्रकाश. शाळा, महाविद्यालयं, डिजिटल शिक्षण आणि ज्ञानसंपन्न समाज ही तिची रूपं आहेत. इंटरनेटवर उपलब्ध असलेलं ज्ञान, संशोधन आणि नवकल्पना ही विद्यालक्ष्मीची आधुनिक अभिव्यक्ती आहे. तसेच जिथे भक्ती आहे किंवा पाहिलेली स्वप्ने पूर्ण करण्याची जिद्द आहे तिथे आदिलक्ष्मी आहे. म्हणूनच आदिलक्ष्मी ही धर्माचं तेज आहे. भक्तीच्या मार्गावर चालताना, सत्याचं पालन करताना आणि गुरुकृपेच्या सावलीत राहिल्यावर तिचं दर्शन होतं. ती जीवनाला आध्यात्मिक आधार देते आणि मनाला स्थैर्य देते. आदिलक्ष्मी म्हणजे जीवनाला दिशा देणारी शक्ती, जी भक्ताला धर्माच्या मार्गावर स्थिर ठेवते. ती स्वप्ने पूर्ण करताना येणारे अडथळे पार करण्याची जिद्द आणि धैर्य आहे, तिथे वीरलक्ष्मी आहे. संकटांचा सामना करताना, अन्यायाविरुद्ध उभं राहताना आणि सत्यासाठी झुंजताना तिचं सामर्थ्य जाणवतं आणि सरतेशेवटी जेव्हा विजय मिळतो तेव्हा तीच विजयलक्ष्मी बनते, वीरलक्ष्मी आणि विजयलक्ष्मी आजच्या काळात म्हणजे संघर्ष आणि यश.



अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारे लोक, समाजासाठी झुंजणारे कार्यकर्ते आणि प्रयत्नांनी मिळवलेलं यश ही तिची रूपं आहेत. खेळाडूंचा विजय, संशोधकांची शोधयात्रा आणि सामान्य माणसाचा संघर्ष हीच तिची आधुनिक छटा आहे.

(पान ३ वर)